CMYK

सोलापूर

# तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | सोमवार, १२ जुलै २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४१ वे अंक २४५ । पाने १२ । किंमत रु. ६/-


| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com




## विचारपुष्प



वस्तुत: आपले प्रेमरज्जूने गुंफलेले कौटुंबिक जीवन हे आपल्या समाजरचनेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. व्यक्ती, कुटुंब, समाज, राष्ट्र आणि विश्व असे व्यापकतेकडे जाणारे हे एक कुटुंबच आहे. व्यक्तीकडून व्याप्तीकडे असा याचा प्रवास आहे आणि त्याच भावनेचे प्रतिबिंब 'वसुधैव कुटुंबकम्' या आपल्या संकल्पनेत उमटलेले आहे. आणि म्हणूनच प्रत्येक व्यक्तीने, कोणतेही कार्य करताना आपण ज्याप्रमाणे कुटुंबाचा एक घटक आहोत, त्याचप्रमाणे समाजाचेही एक घटक आहोत, या भावनेतून कार्य केले पाहिजे.

**- लक्ष्मणराव भिडे**
रा. स्व. संघाच्या विश्व विभागाचे पूर्व संयोजक आणि दीनदयाल शोध संस्थानचे पूर्व अध्यक्ष

# संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांना फासले काळे

## ● छत्रपती संभाजी महाराज व स्वामी समर्थांचा एकेरी उल्लेख केल्याचा परिणाम





**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि.१३ जुलै**

छत्रपती संभाजी महाराजांचा संघटनेच्या नावातून ऐकेरी उल्लेख करणाऱ्या संभाजी ब्रिगेडला इशारा देऊन, पुणे, सातारा, कोल्हापूर, सांगली, सोलापूर व पावसाळी आधिवेशनाच्या पहिल्या दिवशी विधानभवन समोर भव्य मोर्चा काढूनही छत्रपती संभाजी महाराजांच्या नावाचा एकेरी उल्लेख न थांबावल्यामुळे संतप्त शिवधर्म फाउंडेशनचे कार्यकर्ते व शिवभक्तांनी संभाजी ब्रिगेडच्या महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष प्रविण गायकवाड यांना अक्कलकोट येथे एका कार्यक्रमासाठी आले असता घेराटा घालून त्यांना काळे फासून निषेध व्यक्त करत घोषणा देण्यात आल्याने अक्कलकोट शहरात खळबळ माजली आहे.

संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष गायकवाड आज अक्कलकोट येथे फत्तेसिंह शिक्षण संस्था आणि सकल मराठा समाजाच्या कार्यक्रमासाठी आले होते. छत्रपती संभाजी महाराजांचा एकेरी उल्लेख केल्याने तसेच स्वामी समर्थांचा एकेरी उल्लेख करून त्यांचा अवमान केल्याचा देखील राग शिवधर्म फाउंडेशन संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या मनात होता. यापूर्वी शिवधर्म फाउंडेशनने संभाजी ब्रिगेडच्या विरोधात उपोषणदेखील केले होते. शिवधर्म फाऊंडेशनच्या कार्यकर्त्यांनी काळं फासल्यानंतर प्रवीण गायकवाड हे कारमध्ये जाऊन बसले.

**प्रवीण गायकवाड यांना मारहाण?** : प्रवीण गायकवाड यांनी आपल्या संघटनेच्या नावामध्ये छत्रपती संभाजी महाराजांचा एकेरी उल्लेख केल्याने शिवधर्म फाउंडेशन आक्रमक होते. शिवधर्म फाऊंडेशनच्या कार्यकर्त्यांनी काळं फासल्यानंतर प्रवीण गायकवाड हे कारमध्ये जाऊन बसले. पण शिवधर्म फाऊंडेशनचे कार्यकर्ते आक्रमक झाले होते. त्यांनी कारमध्ये घुसून गायकवाड यांना मारहाण केली. त्यानंतर रस्त्यावरही त्यांना मारहाण झाल्याचे समोर आले.

**सत्कार समारंभ आयोजित केला होता, पण..**

दरम्यान आज अक्कलकोट मध्ये प्रवीण गायकवाड यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी त्यांना काळं फासण्यात आलं. हे प्रकरण घडल्यानंतर अद्याप प्रवीण गायकवाड यांनी कोणताही प्रतिक्रिया दिलेली नाही. या प्रकरणावर गायकवाड नेमकी काय भूमिका घेणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### शिवधर्म फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांवर गुन्हा

शिवधर्म फाउंडेशनचे अध्यक्ष दिपक काटे, (रा.इंदापूर, जि.पुणे), कार्यकर्ते किरण साळुंखे (रा. भवानी नगर, इंदापुर, जि. पुणे), भैय्या ढाणे (रा. भवानी नगर, इंदापुर, जि.पुणे), कृष्णा क्षिरसागर (रा. कसबा बारामती, जि. पुणे), अक्षय चव्हाण (रा. तांदुळवाडी,बारामती, जि.पुणे), बाबु बिहारी (रा. तांदूळवाडी, ता. बारामती, जि.पुणे),भवानेश्वर बबन शिरगिरे (रा. इंदापुर, जि.पुणे) यांनी गैरकायद्याची मंडळी जमवुन प्रविण गायकवाड व फिर्यादीचे अंगावर शाई वंगण टाकुन श्री. छत्रपती संभाजी महाराज की जय अशा मोठमोठ्याने घोषणा देवून सर्वांना धक्काबुक्की करुन हाताने मारहाण केली तसेच इनोव्हा गाडीच्या समोरच्या काचेवर दाड मारून नुकसान केले बाबत अक्कलकोट उत्तर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून या बाबत अधिक तपास स.पो.नि बागाव यांनी करीत आहे.

### कारवाई करा; वंचित बहुजन आघाडी

वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जाहीर निषेध करून संभाजी ब्रिगेडचे सोलापूर जिल्हा अध्यक्ष संभाजी भोसले, शहराध्यक्ष जगदाळे आणि अक्कलकोटचे बाळासाहेब मोरे यांच्या समवेत आज अक्कलकोट विभागाचे डीवायएसपी यामावार, पोलीस निरीक्षक टाकणे यांची भेट घेऊन सदर घटनेमध्ये सहभागी असलेले आरोपी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. या आरोपींना तत्काळ अटक करावी आणि त्यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी उत्तर पोलीस स्टेशन येथे वंचित बहुजन आघाडी सोलापूर जिल्हा अध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे यांनी केली आहे. यावेळी अक्कलकोट शहराध्यक्ष विशाल ठोंबरे, शहर उपाध्यक्ष शिवाजी चौगुले, विद्यार्थी संघटनेचे प्रवक्ते रवी पोटे आदी उपस्थित होते.

# ॲड.उज्वल निकम राज्यसभेवर

## ● राष्ट्रपतींनी चार सदस्यांना केले नामनिर्देशित
## ● सी सदानंद, शृंगला आणि मीनाक्षी जैन यांचाही समावेश

◆ **नवी दिल्ली, १३ जुलै**

ज्येष्ठ विधिज्ञ आणि भाजपचे नेते ॲड. ॲड.उज्ज्वल निकम यांची राज्यसभेवर नियुक्ती करण्यात आली आहे. निकम यांच्याबरोबरच केरळचे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि शिक्षणतज्ज्ञ सी. सदानंदन मास्टर, भारताचे माजी परराष्ट्र सचिव हर्षवर्धन श्रृंगला आणि सुप्रसिद्ध इतिहासकार आणि शिक्षणतज्ज्ञ मीनाक्षी जैन यांनाही राज्यसभेवर नामांकित करण्यात आले आहे. राष्ट्रपतींनी या सर्वांची नियुक्ती केली आहे.

निकम हे अजमल कसाबसह अनेक हाय-प्रोफाइल फौजदारी खटल्यांमध्ये सरकारी वकील होते. त्यांच्याशिवाय, या नियुक्त्या त्या जागांसाठी करण्यात आल्या आहेत, ज्या पूर्वी नामांकित सदस्यांच्या निवृत्तीमुळे रिक्त



होत्या. राष्ट्रपतींना राज्यसभेत १२ सदस्यांची नियुक्ती करण्याचा अधिकार आहे. हे सदस्य कला, साहित्य, विज्ञान, समाजसेवा यासारख्या क्षेत्रात विशेष योगदानासाठी निवडले जातात. राज्यसभेच्या एकूण सदस्यांची संख्या २५० आहे, ज्यामध्ये २३८ निवडून आलेले आणि १२ नामांकित सदस्य आहेत.

ॲड. निकम देशातील सर्वात प्रसिद्ध आणि प्रतिष्ठित सरकारी वकिलांमध्ये गणले जातात. ॲड. निकम यांना २०१६ मध्ये पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांनी २०२४ ची लोकसभा लढविली होती. ◂(वृत्तसंस्था)

### 'हिंदीत बोलू की मराठीत...'



**मुंबई** : ॲड. उज्ज्वल निकम यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वत: दूरध्वनीद्वारे शुभेच्छा देत अभिनंदन केले. विशेष म्हणजे, या संभाषणाची सुरुवात करण्याआधी पंतप्रधानांनी त्यांना मोकळेपणाने विचारले की, हिंदीत बोलू की मराठीत...त्यावर दोघेही दिलखुलास हसले. ■

**देशाच्या परराष्ट्र धोरणाला आकार देणारे हर्षवर्धन शृंगला**
(वृत्त पान ३ वर) ▸

# बिहारच्या मतदारयादीत घुसखोरांचा समावेश

◆ **पाटणा, १३ जुलै**

बिहारमधील मतदारयादीच्या पुनरावलोकन मोहिमेदरम्यान निवडणूक आयोगाने धक्कादायक माहिती उघड केली आहे. निवडणूक आयोगातील वरिष्ठ सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या मोहिमेअंतर्गत घरोघरी जाऊन केलेल्या सर्वेक्षणात बूथ लेव्हल अधिकाऱ्यांना (बीएलओ) नेपाळ, बांगलादेश आणि म्यानमारमधून अवैधपणे आलेल्या व्यक्ती मोठ्या संख्येने आढळून आल्या आहेत.

निवडणूक आयोगाच्या सूत्रांनुसार, अशा लोकांची १ ऑगस्टनंतर चौकशी केली जाईल. ३० सप्टेंबर रोजी प्रसिद्ध होणाऱ्या अंतिम मतदारयादीत बेकायदेशीर स्थलांतरितांची नावे समाविष्ट केली जाणार नाहीत. योग्य तपासणीअंती अशा व्यक्तींची नावे ३० सप्टेंबरला प्रसिद्ध होणाऱ्या अंतिम मतदारयादीतून वगळण्यात येतील. ३० सप्टेंबरनंतर आयोग या घुसखोरांची नेमकी आकडेवारीही जाहीर करेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. बिहारमध्ये मतदारयादीच्या पुनरावलोकन अंतर्गत मतदारांकडून गणना अर्ज जमा करण्याचे काम आता अंतिम टप्प्यात आले आहे.

**८० टक्क्यांहून अधिक मतदारांचे गणना अर्ज जमा**

भारतीय निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, शनिवार सायंकाळपर्यंत बिहारमधील ८०.११ टक्के मतदारांनी आपले गणना अर्ज जमा केले आहेत. २५ जुलै २०२५ या निर्धारित वेळेपूर्वी गणना अर्ज संकलित करण्याचे काम पूर्ण करण्यासाठी आयोग वेगाने कार्यरत आहे. या कामासाठी ७७,८९५ बीएलओ आणि नव्याने नियुक्त केलेल्या २०,६०३ बीएलओंच्या मदतीने २५ जुलै २०२५ या अंतिम मुदतीपूर्वी अर्ज संकलनाचे काम पूर्ण करण्याच्या दिशेने आयोग वाटचाल करत आहे. या प्रक्रियेवर मुख्य निवडणूक अधिकारी लक्ष ठेवून आहेत. ◂(वृत्तसंस्था)




# ज्येष्ठ अभिनेते कोटा श्रीनिवासराव यांचे निधन

**हैद्राबाद, दि. १३ जुलै-**



तेलुगुतील ख्यातनाम अभिनेते व भाजपाचे माजी आमदार राजकारणी कोटा श्रीनिवासराव यांचे वयाच्या ८३ व्या वर्षी हैदराबादी येथील त्यांच्या निवासस्थानी निधन झाले आहे. त्यांच्या निधनाने तेलगू सिनेसृष्टीवर शोककळा पसरले आहे. कोटा श्रीनिवासराव यांनी जवळपास ७५० हून अधिक चित्रपटात आपल्या कसदार भूमिका बजावली. तेलुगु, हिंदी, तामिळ, कन्नड, मल्याळम अशा विविध भाषांमध्ये त्याने आपले भूमिका साकारली आहे. खलनायक असो पात्र अभिनेता असो किंवा सहाय्यक अभिनय असो त्यांनी आपल्या विविधांगी कौशल्याने प्रेक्षकांची मने जिंकली. कोटा श्रीनिवासराव यांना नऊ राज्य नंदी पुरस्कार मिळाले.

# लाडक्या बहिणींमुळे इतर योजनांना निधी मिळण्यास विलंब : मंत्री भरणे

**इंदापूर, दि. १३ जुलै-**

राज्याचे कॅबिनेट मंत्री दत्तात्रय भरणे यांनी निधी वितरणात होणाऱ्या विलंबावर भाष्य करताना लाडकी बहीण योजनेला कारणीभूत ठरवलं.



मंत्री दत्तात्रय भरणे पुढे बोलताना म्हणाले की, मी सातत्याने पाठपुरावा करत असतो, मग मी कुठेही असलो तरी इंदापूरसाठी अधिकाधिक निधी मिळवण्याचा प्रयत्न करतो. मात्र सध्या लाडकी बहीण योजनेमुळे निधी वितरणात उशीर झालेला आहे. आता मात्र परिस्थिती सुधारत आहे. यापूर्वीही भरणे यांनी लाडकी बहीण योजनेमुळे इतर विकासकामांमध्ये अडथळा येत असल्याचे सूचित केले होते. आता पुन्हा त्यांनी योजनेचा उल्लेख केल्यामुळे राजकीय वतुर्ळात चर्चा सुरू झाली आहे. काही महिन्यांपूर्वी सुरू झालेल्या या योजनेमुळे शासनाच्या तिजोरीवर मोठा ताण आल्याचे बोलले जात होते. त्यामुळे इतर विकास कामांमध्ये निधी वाटप विलंबित झाल्याच्या चर्चांना आता अधिकृत छाप मिळाल्याचे विरोधकांचे म्हणणे आहे. भरणे यांच्या विधानामुळे या मुद्द्यावर विरोधकांना हत्यार मिळाले आहे.

दत्तात्रय भरणे म्हणाले की, इतर जिल्ह्यांमध्ये निधी कमी मिळतो, मग इंदापूरलाच कसा मिळतो, असा सवाल विचारला जातो. म्हणूनच मी बातम्या देत नाही, व्हिडीओ वा शो करत नाही. विरोधक व्हॉट्सॲपवर काय टाकतात याचा फरक पडत नाही.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### शरद पवारांच्या राष्ट्रवादीची उद्या बैठक

**मुंबई** : प्रदेशाध्यक्ष बदलण्याच्या चर्चा राज्यात जोरात सुरू असताना मंगळवारी राष्ट्रवादी काँग्रेसने (शरद पवार) मंगळवारी आपली बैठक बोलावली आहे. या बैठकीकडे सर्वांचे लक्ष लागले असून जयंत पाटील कायम राहणार की बदलले जाणार याची सर्वांना उत्सुकता लागली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी पदाचा राजीनामा दिला आणि पक्षाचे आमदार शशिकांत शिंदे त्यांच्याकडून पदभार स्वीकारतील, अशा वावड्या उठल्या होत्या. दरम्यान, जर मला संधी मिळाली, तर हा माझ्यासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरेल, असे शिंदे म्हणाले होते. १५ जुलै रोजी सर्व पक्ष नेते भविष्यातील कृतीवर चर्चा करण्यासाठी भेटणार आहे, असे त्यांनी पत्रकारांना सांगितले. पाटील २०१८ पासून अविभाजित राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (एनसीपी) प्रदेशाध्यक्ष आहेत. अजित पवार व इतर आमदारांनी बंड केल्यानंतर जुलै २०२३ मध्ये पक्ष फुटल्यानंतर, पाटील यांनी शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस गटात तेच पद भूषवले. शनिवारी एका निवेदनात पाटील यांच्या राजीनाम्याचे वृत्त चुकीचे असल्याचे राकाँचे (शरद पवार गट) मुख्य राष्ट्रीय प्रवक्ते जितेंद्र आव्हाड यांनी म्हटले. १५ जुलै रोजी बैठक बोलावण्यात आली आहे. काय होते ते पाहूया, असे आव्हाड यांनी रविवारी वृत्तसंस्थेला सांगितले.

### एचडीएफसी, श्रीराम फायनान्सवर आरबीआयची कारवाई

**मुंबई** : भारतीय रिझर्व्ह बँकेने एचडीएफसी बँक आणि श्रीराम फायनान्सवर मोठी कारवाई केली. ही कारवाई नियमांचे उल्लंघन केल्यामुळे केल्याचे समोर आले आहे. खाजगी क्षेत्रातील एचडीएफसी बँकेला ४.८८ लाख रुपये आणि नॉन-बँकिंग फायनान्स कंपनी श्रीराम फायनान्स लिमिटेडला २.७० लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. ग्राहकांना कर्ज देताना एचडीएफसी बँकेने भारतातील परकीय गुंतवणुकीशी संबंधित काही नियमांचे उल्लंघन केल्याचे आरबीआयला आढळले. यासाठी बँकेला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली. बँकेने लेखी आणि तोंडी आपली बाजू मांडली, परंतु केंद्रीय बँकेने चौकशीनंतर नियमांचे उल्लंघन झाल्याचे समोर आले. यानंतर दंड ठोठावण्याचा निर्णय घेतला.

### मायक्रोसॉफ्टने एआय वापरून वाचवले ४२०० कोटी

**नवी दिल्ली** : दिग्गज टेक कंपनी मायक्रोसॉफ्टने आर्टिफिशियर इंटेलिजन्सचा (एआय)वापर करून स्वत:चा मोठ्या प्रमाणात फायदा करून घेतला आहे. एआय टूल्समुळे विक्री, ग्राहकी सेवा आणि सॉफ्टवेअर इंजिनीयरिंगमध्ये उत्पादकता वाढल्याचे कंपनीचे चीफ कमर्शियल ऑफिसर जडसन अल्थॉफ यांनी सांगितले. एआयच्या मदतीने मायक्रोसॉफ्टने मागील वर्षी ४२०० कोटी रुपयांपेक्षा जास्त बचत केली आहे. दुसरीकडे, कंपनीने यावर्षी १५ हजाराहून अधिक कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकले आहे. मायक्रोसॉफ्टची कर्मचारी कपातीची ही मागील वर्षापासूनची तिसरी वेळ आहे.

### इस्रायली हल्ल्यात इराणचे राष्ट्रपती जखमी

**तेहरान** : गेल्या महिन्यात इराण आणि इस्रायलमध्ये १२ दिवसांचे युद्ध झाले. या काळात १६ जून रोजी इस्रायली हल्ल्यात इराणचे अध्यक्ष मसूद पाझिश्कयान जखमी झाले. इराणी वृत्तसंस्थेने ही माहिती उघड केली आहे. अहवालानुसार, इस्रायलने १६ जून रोजी तेहरानच्या पश्चिम भागातील एका इमारतीवर ६ क्षेपणास्त्रांनी हल्ला केला. त्यावेळी इमारतीत देशाच्या सर्वोच्च राष्ट्रीय सुरक्षा मंत्रिमंडळाची बैठक सुरू होती. त्यांच्यासोबत इराणच्या संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बाघेर गालिबाफ, न्यायपालिका प्रमुख गुलाम-होसेन मोहसेनी एजेई आणि इतर अनेक वरिष्ठ अधिकारी बैठकीला उपस्थित होते. तथापि, इराणी अधिकारी इमारतीच्या खालच्या मजल्यावर उपस्थित होते, त्यामुळे हल्ल्याचा त्यांच्यावर फारसा परिणाम झाला नाही. ते आपत्कालीन गेटमधून पळून जाण्यात यशस्वी झाले.



### तापमान/पर्जन्यमान

| | कमाल | मिमी |
|---|---|---|
| सोलापूर | ३३.४ | २३.४ |
| अमरावती | ३०.६ | २२.७ |
| भंडारा | ३२.० | २५.० |
| बुलडाणा | २९.६ | २२.८ |
| चंद्रपूर | ३४.४ | २४.८ |
| गडचिरोली | ३२.६ | २४.४ |
| गोंदिया | ३२.९ | २४.२ |
| नागपूर | ३३.६ | २५.६ |
| वर्धा | ३३.० | २५.५ |
| वाशीम | ३१.० | २३.२ |
| यवतमाळ | ३१.४ | २३.६ |

# छांगुर बाबा आयएसआयच्या संपर्कात

## नेपाळच्या पाकिस्तान दूतावासात झाली बैठक, १००० मुस्लिम तरुणांची फौज केली तयार

**लखनौ, १३ जुलै**

धर्मांतरासाठी हिंदू मुलींना जाळ्यात ओढणारा आणि त्यासाठी परदेशातून मोठ्या प्रमाणात निधी जमा करणाऱ्या छांगुर बाबा पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआयच्या संपर्कात असल्याची माहिती उत्तर प्रदेश एटीएस आणि ईडीने केलेल्या तपासात समोर आली आहे. भारताविरोधात कटकारस्थान रचणे, हिंसाचार घडवून आणण्यासाठी पैसा पुरविणे यामध्ये त्याचा सहभाग होता. यासाठी त्याने हजार मुस्लिम तरुणांची फौज तयार केली होती अशी धक्कादायक माहिती चौकशीतून उघड झाली आहे.

एका तपास अधिकाऱ्याने सांगितले की, छांगुर बाबा भारतात



जातीयवादाचे विष पसरवण्याचा कट रचत होता. धर्मांतराच्या नावाखाली उभारलेल्या नेटवर्कचा वापर करून तो आयएसआयशी थेट संपर्कात होता. नेपाळची राजधानी काठमांडू येथील पाकिस्तानी दूतावासात आयएसआय एजंट्सोबत त्याची गुप्त बैठक झाली होती. मुस्लिम तरुणांना भडकवून भारतात हिंसाचाराच्या घटना घडवून आणण्यासंदर्भात बैठकीत चर्चा झाल्याची माहिती चौकशीत समोर आली. छांगूर बाबाच्या वैयक्तिक खात्यातून ६७ कोटी रुपयांचे व्यवहार झाले, त्याचा तपास ईडीकडून केला जात आहे. आर्थिकदृष्ट्या कमकुवत हिंदू कुटुंबातील महिलांना फसवून त्यांचे धर्मांतर करणे आणि त्यानंतर त्यांचे लग्न नेपाळमधील आयएसआय एजंट आणि स्लीपर सेलशी लावायचे हा त्याच्या रणनीतीचा भाग होता.

**संवादासाठी कोड वर्डचा वापर**

कोडद्वारे टोळीतील सदस्यांशी छांगुर बाबा संवाद साधायचा. छांगूर बाबा धर्मांतराला मिट्टी पलटण असा पर्यायी शब्द वापरायचा. मुलींना प्रोजेक्ट म्हटले जात असे, तर ब्रेनवॉश करण्याच्या प्रक्रियेला काजल कर्ण आणि बाबांशी मुलींची भेट घडवून आणणे याला दीदार कर्ण असे म्हटले जात असे. त्याने लव्ह जिहादसाठी मुस्लिम तरुणांची फौज तयार केली होती. गेल्या तीन वर्षांत या कामासाठी १००० हून अधिक मुस्लिमांना रोख रक्कम देण्यात आली. (वृत्तसंस्था)

### महाराष्ट्र ते बंगालपर्यंत नेटवर्क

हिंदू महिलांचे आयएसआय एजंटसोबत लग्न लावून त्यांचा वापर हेरगिरी करण्यासाठी केला जात होता. विशेष असे की, यासाठी एक योग्य कोडवर्ड प्रणालीदेखील विकसित करण्यात आली. चांगूर बाबाचे नेटवर्क उत्तर प्रदेशशिवाय महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू, बिहार आणि पश्चिम बंगालमध्ये पसरले होते. परदेशी निधीद्वारे हे संपूर्ण नेटवर्क मजबूत करत होता.

### नसरीनचा कटात सहभाग

छंगूर बाबाची सर्वात मोठी विश्वासपात्र नीतू वोहरा उर्फ नसरीन होती, ती स्वतः धर्मांतर करून या कटात सहभागी झाली. चार महिन्यांत तिच्या खात्यात १४ कोटी रुपये आले.ही रक्कम तत्काळ बँकेतून काढण्यात आली. तिचा पती नवीन वोहरा याच्या खात्यात १८ कोटी रुपयांची नोंद देखील आढळून आली आहे. बाबांनी त्यांच्या नेटवर्कला कायदेशीर स्वरूप देण्यासाठी चार वेगवेगळ्या संघटना स्थापन केल्या होत्या.




# कोचिंग सेंटर संस्कृती धोकादायक

### उपराष्ट्रपती धनकड यांचे प्रतिपादन

### मुलांच्या विकासासाठी अडथळा

**कोटा, १३ जुलै**

कोचिंग सेंटर संस्कृती ही राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या पूर्णपणे विरुद्ध असून मुलांच्या भविष्यासाठी धोकादायक आहे आणि ती मुलांच्या विकासात अडथळा निर्माण करते. कोचिंग सेंटरमध्ये शिकणाऱ्या मुलांचा भविष्यासंदर्भातील दृष्टीकोन मर्यादित असतो, त्यांच्या बुद्धिचा विकास होत नाही, असे उपराष्ट्रपती जगदीप धनकड म्हणाले.

राजस्थान येथील एका विद्यापीठात दीक्षांत समारंभ आयोजित करण्यात आला, यावेळी राज्यपाल हरिभाऊ बागडे उपस्थित होते. यावेळी उपराष्ट्रपती म्हणाले, शिक्षण संस्था आणि कोचिंग सेंटरला व्यवसाय म्हणून पाहिले जात आहे, हा प्रकार एखाद्या कारखाना चालविण्यासारखा आहे.

शाळा आणि महाविद्यालयांमधील शिक्षणाचा दर्जा सुधारल्यास लोकांची मानसिकता बदलेल आणि कोचिंग सेंटरची संस्कृतीला आळा घातला येऊ शकतो. आपल्या शिक्षणासाठी हा प्रकार धोकादायक आहे आणि विकास आणि प्रगतीला अडथळा आणणारा आहे.

कोचिंग सेंटर्सच्या जाहिरातींवर होणाऱ्या मोठ्या खर्चावर टीका करताना ते म्हणाले, जाहिराती आणि होर्डिंग्जवर खूप पैसा खर्च केला जातो. हे पैसे कर्ज घेतलेल्या किंवा त्यांच्या शिक्षणाचा खर्च भागवण्यात मोठ्या अडचणी येत असलेल्या विद्यार्थ्यांकडून येतात. (वृत्तसंस्था)

### कौशल्य आधारित शिक्षणाची गरज

देशाची संस्कृती गुरुकुलला प्राधान्य देणारी आहे. आपण नेहमीच ज्ञान देण्यावर विश्वास ठेवला आहे. प्रशिक्षण केंद्रांनी त्यांच्या पायाभूत सुविधांचा वापर कौशल्य केंद्रांमध्ये रूपांतरित करण्यासाठी करायला हवा. बदलत्या काळात कौशल्य आधारित शिक्षणाची आवश्यकता आहे. समाज आणि लोकप्रतिनिधींना या समस्येचे गांभीर्य समजून घ्यायला हवे.२१ व्या शतकातील युद्धभूमी आता जमीन किंवा समुद्र राहिलेली नाही. पारंपारिक युद्ध आता भूतकाळातील गोष्ट आहे. आज आपली शक्ती आणि प्रभावी रणनीती, क्लाउड आणि सायबरद्वारे निश्चित केली जाते.

# गोंदियाच्या सुहानीची 'अमेरिकेच्या आकाशात भरारी'

### जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा

**गोंदिया, १३ जुलै**

जिद्द व मेहनतीच्या बळावर मोठ्यात मोठे शिखर गाठून यश प्राप्त करता येते, याची प्रचिती जिल्ह्यातील देवरी येथील व सद्या गोंदिया शहरातील रहिवासी असलेली सुहानी विजय अग्रवाल या विद्यार्थीनीने करून दिली आहे. पायलट होण्याचे आपले स्वप्न साकार करीत सुहानीने थेट अमेरिकेच्या आकाशात झेप घेतली असून, ऐतिहासिक कामगिरी करीत गोंदिया जिल्ह्याच्या शिरपेक्षात मानाचा तुरा रोवला आहे.

आदिवासीबहूल व नक्षलग्रस्त जिल्हा म्हणून गोंदियाची ओळख आहे. त्यात जिल्ह्याच्या शेवटच्या




टोकावर देवरी तालुका असून, सुहानी अग्रवाल ही मूळची देवरी येथील रहिवासी आहे. प्राथमिक शिक्षण देवरी येथे पूर्ण केल्यानंतर वडील गोंदियात स्थायिक झाल्याने इयत्ता १२ वीपर्यंतचे शिक्षण तिने गोंदियात पूर्ण केले. यानंतर उच्च शिक्षणासाठी ती अमेरिकेत गेली. उच्च शिक्षण पूर्ण केल्यानंतर सुहानीने आपल्या स्वप्नांना साकार करण्यासाठी तेथील वैमानिक प्रशिक्षण केंद्रात प्रवेश घेतला.

दीड वर्ष वैमानिकाचे प्रशिक्षण घेतल्यानंतर १२ जुलै रोजी तिला वैमानिकाचा परवाना देण्यात आला. सुहानी देवरी तालुक्यातील पहिली महिला पायलट ठरली आहे.

सुहानीचे काका दीपक अग्रवाल यांनी सांगितले की, सुहानीचे लहानपणापासून विमान उडवण्याचे स्वप्न होते आणि आता तिचे हे स्वप्न पूर्ण झाले आहे. वडील विजय अग्रवाल यांनी नेहमीच तिचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रेरित केले आहे. सुहानी १५ दिवसांनंतर भारतात परतणार असून, तिला भारतात प्रशिक्षण पूर्ण करायचे आहे. सुहानीच्या यशाबद्दल तिचे आजोबा विष्णू अग्रवाल, वडील विजय अग्रवाल, काका दीपक अग्रवाल, राकेश अग्रवाल यांच्यासह देवरी व गोंदिया येथील कुटुंबातील सर्व सदस्यांनी, मित्रमंडळींनी तिचे अभिनंदन केले आहे. (तभा वृत्तसेवा)

### स्पाइसजेटच्या विमानात फ्री फॉल प्रवाशाने बनवला व्हिडीओ

**श्रीनगर** : दिल्लीहून श्रीनगरला जाणारे स्पाइसजेटचे विमान शनिवारी फ्री फॉल झाला. त्यामुळे विमानात २३ सेकंदांसाठी घबराटीचे वातावरण निर्माण झाले. एसजी-३८५ या फ्लाईटमध्ये बसलेल्या एका प्रवाशाने हा व्हिडीओ रेकॉर्ड केला. ज्यामध्ये एक क्रू मेंबर विमानाच्या फ्लोअरवर गुडघ्यावर बसलेली दिसत आहे. तर उर्वरित प्रवासी खुर्च्या धरून आहेत. सीट बेल्ट बांधण्याच्या सूचनाही व्हिडीओमध्ये ऐकू येतात. अर्जिमंद हुसेन नावाच्या एक्स अकाउंटवर पोस्ट केलेल्या व्हिडीओमध्ये असेही लिहिले आहे की, बनिहाल खिंडीवरून जाताना विमान काहीशे मीटर खाली आले. हुसेनने लिहिले आहे की, तो या फ्री फॉलचे शेवटचे क्षणच टिपू शकला.

# दुधाने आंघोळ करून साजरा केला घटस्फोटाचा आनंद!

**गुवाहाटी, १३ जुलै**

आसाममधून एक विचित्र घटना समोर आली आहे. घटस्फोटानंतर एका तरुणाने आनंद व्यक्त करत चक्क दुधाने आंघोळ केली. आता मुक्त झालोय्...मी खूप आनंदी आहे, असे तो म्हणाला. सध्या या घटनेचा व्हिडीओ व्हायरल होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ही अनोखी घटना आसामच्या नलबारी जिल्ह्यातून समोर आली आहे. या तरुणाचे माणिक अली असे नाव आहे. त्याने सांगितले की, त्याची पत्नी वारंवार प्रियकरासोबत पळून जायची. याला कंटाळून त्याने तिला अखेर घटस्फोट दिला. त्यानंतर आनंद साजरा करण्यासाठी चक्क दुधाने अंघोळ केली. व्हायरल होत असलेल्या व्हिडीओमध्ये, माणिक अली त्याच्या घराबाहेर दुधाने भरलेल्या चार बादल्या अंगावर ओतून घेताना दिसतोय.



**आता मी मुक्त झालो...**

दूध अंगावर ओतताना म्हणतो, माझी पत्नी फारच विचित्र वागायची. तिला तिच्या प्रियकराचाच ध्यास होता. मी फक्त कुटुंबामुळे शांत होतो. काल माझ्या वकिलाने मला सांगितले की, घटस्फोट निश्चित झाला आहे.

म्हणूनच आज मी दुधाने आंघोळ करून स्वातंत्र्य साजरे करतोय. आजपासून मी मुक्त झालो आहे. ज्या नात्याने मला केवळ मनस्ताप दिला त्यातून आता माझी सुटका झाली आहे.

स्थानिकांच्या मते, त्याची पत्नी यापूर्वी दोनदा घर सोडून पळून गेली होती. अखेर दोघांनीही परस्पर संमतीने घटस्फोट घेतला आहे. (वृत्तसंस्था)

# मराठी बोलण्यास नकार, परप्रांतीय नागरिकास मारहाण

## मनसे-उबाठा आक्रमक, जाहीर माफी मागायला लावली

**मुंबई, १३ जुलै**

मराठी बोलण्यास नकार देणाऱ्या परप्रांतीय रिक्षाचालकाला विरारमध्ये उबाठा गट आणि मनसेच्या कार्यकर्त्यांनी चोप दिला. तसेच त्याने केलेल्या गैरवर्तनाबद्दल जाहीर माफी मागण्यास भाग पाडले. हिंदी किंवा भोजपुरीमध्ये बोल, अशी मुजोरी करत एका स्थानिक तरुणाशी अरेरावी केल्याने त्याला मारहाण करण्यात आल्याचे मनसेने म्हटले आहे.

विरार रेल्वे स्थानक परिसरात एका स्थानिक तरुणाने एका रिक्षाचालकाशी मराठीत संवाद साधण्याचा प्रयत्न केला. मात्र, संबंधित रिक्षाचालकाने मराठीत बोलण्यास स्पष्ट नकार दिला. येथे राहायचे असेल तर हिंदीत बोलावे लागेल, अशा शब्दात त्याने तरुणाला दमदाटीही केली. याशिवाय हिंदी व भोजपुरी भाषेत बोलण्यास त्याला भाग पाडले. या घटनेचा व्हिडीओ एका नागरिकाने आपल्या मोबाईलमध्ये चित्रित केला आणि तो समाज माध्यमावर प्रसारित केला. व्हिडीओची दखल घेत उबाठा आणि मनसेच्या कार्यकर्त्यांनी रिक्षाचालकाचा शोध घेतला. विरार रेल्वे स्थानकावर त्याला पकडले आणि कार्यकर्त्यांनी त्याला भररस्त्यात चोप दिला. या कारवाईनंतर, कार्यकर्त्यांनी त्याला ज्या तरुणाशी गैरवर्तन केले होते, त्याची आणि समस्त महाराष्ट्राची माफी मागण्यास सांगितले आणि रिक्षाचालकाने सार्वजनिकरित्या माफी मागितली. (वृत्तसंस्था)



### शिवसेना स्टाईलनेच उत्तर देऊ : उदय जाधव

उबाठा पक्षाचे विरार शहरप्रमुख उदय जाधव म्हणाले, महाराष्ट्रामध्ये राहून मराठी भाषेचा, महाराष्ट्राचा किंवा येथील मराठी माणसाचा कोणीही अपमान करत असेल, तर त्याला शिवसेना पद्धतीनेच प्रत्युत्तर दिले जाईल. ही मुजोरी यापुढे खपवून घेतली जाणार नाही.

# ब्राझीलचा भारताला धक्का, करार रद्द

## आकाश क्षेपणास्त्र खरेदी प्रक्रिया थांबवली

**ब्रासिलिया, १३ जुलै**

लॅटिन अमेरिका खंडातील सर्वांत मोठा देश असलेल्या ब्राझिलने भारताचे स्वदेशी 'आकाश' हवाई संरक्षण क्षेपणास्त्र खरेदी करण्याची प्रक्रिया थांबवली आहे आणि भारतासोबतचा १ अब्ज डॉलर्सचा (अंदाजे ८३०० कोटी रुपये) करार रद्द करण्याची घोषणा केली.

भारताच्या संरक्षण उत्पादन क्षेत्रासाठी आणि आत्मनिर्भर भारत मोहिमेसाठी हा मोठा धक्का मानला जात आहे. या निर्णयामागे आकाश प्रणालीचे काही ऑपरेशनल बाबतीतील अपयश असल्याचे सांगितले जात आहे. ब्राझिलच्या दौऱ्यावरून नुकतेच परतलेले




पंतप्रधान मोदी यांना सर्वोच्च पुरस्कार देऊन गौरविले होते. अशातच ब्राझिलने घेतलेल्या या निर्णयाने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. ब्राझिल भारताऐवजी युरोपमधील नामांकित संरक्षण क्षेत्रातील कंपनी एमबीडीएकडून एन्हांस्ड मॉड्यूलर एअर डिफेन्स सोल्युशन्स ही हवाई संरक्षण क्षेपणास्त्र प्रणाली खरेदी करणार असल्याची माहिती आहे. ही प्रणाली नाटो देशांमध्ये वापरली जाते आणि ती अत्यंत सक्षम असल्याची मानली जाते. (वृत्तसंस्था)

### आकाश प्रणालीवर काय आहे आक्षेप ?

हायब्रिड युद्ध, ड्रोन हल्ले आणि स्मार्ट बॉम्बच्या युगात भारताचे आकाश क्षेपणास्त्र तितकेसे प्रभावी नाही. अशा परिस्थितीत, ब्राझीलला आता नाटो मानक संरक्षण प्रणाली हवी आहे. आकाश प्रणाली हाय-स्पीड आणि लो-अल्टिट्यूड (कमी उंचीवरून येणारे) हल्ले हाताळण्यात फारशी सक्षम नाही. आधुनिक युद्धपद्धतींमध्ये ड्रोन्स, क्रूझ मिसाईल्स, आणि स्मार्ट बॉम्स यांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. अशा वेळी एका एअर डिफेन्स सिस्टीमकडून वेगवान प्रतिसादाची अपेक्षा असते. पण आकाश या अपेक्षांवर खरी उतरत नाही, असा ब्राझीलच्या सैन्याचा निष्कर्ष आहे.

# बिहारप्रमाणे देशभरात मतदारयाद्या तपासणार

### निवडणूक आयोगाची तयारी पूर्ण

### सुप्रीम कोर्टात सुनावणीनंतर निर्णय

**नवी दिल्ली, १३ जुलै**

बिहारनंतर, निवडणूक आयोग आता देशभरात स्पेशल इंटेंसिव रिवीजन करणार आहे. या अंतर्गत, मतदार यादीची कसून तपासणी आणि अद्ययावतीकरण केले जाते. ते ऑगस्टपासून सुरू होऊ शकते.

निवडणूक आयोगाने सर्व राज्यांमध्ये आपली निवडणूक यंत्रणा सक्रिय केली आहे. सर्वोच्च न्यायालयाने १० जुलै रोजी बिहारमध्ये स्पेशल इंटेंसिव रिवीजन सुरू ठेवण्याची परवानगी दिल्यानंतर आयोगाचा हा निर्णय आला. न्यायालयाने ते घटनात्मक घोषित केले होते.

तथापि, अनेक विरोधी पक्ष आणि लोक या सुधारणांच्या विरोधात आहेत. त्यांनी याला सर्वोच्च न्यायालयात आव्हानही दिले आहे. स्पेशल इंटेंसिव रिवीजनमुळे पात्र नागरिक त्यांच्या मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहतील, असा दावा केला जात आहे.

निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यानुसार, बिहार स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयात पुन्हा सुनावणी होणार असल्याने निवडणूक अधिकारी २८ जुलै नंतर एसआयआरवर अंतिम निर्णय घेतील.

त्याच वेळी, काही राज्यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी त्यांच्या राज्यांमध्ये मागील एसआयआर नंतर प्रकाशित झालेल्या मतदार याद्या आधीच प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली आहे. (वृत्तसंस्था)

# 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये ब्रह्मोसने दाखवली कमाल : राजनाथसिंह

### १५ देशांकडून होतेय् मागणी

**लखनौ, १३ जुलै**

ब्रह्मोस क्षेपणास्त्र ऑपरेशन सिंदूरमध्ये महत्त्वाचे ठरले आणि तेव्हापासून एक डझनहून अधिक देशांनी ते घेण्यासाठी मागणी केली आहे, असे प्रतिपादन संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी केले.

लखनौ येथे एका कार्यक्रमात ते बोलत होते. संरक्षणमंत्री म्हणाले की, काही दिवसांपूर्वीच मी लखनौत ब्रह्मोस एअरस्पेस इंटिग्रेशन आणि परीक्षण केंद्राचे उद्घाटन केले होते. ऑपरेशन सिंदूरमध्ये ब्रह्मोस क्षेपणास्त्राने कमाल केली. ती कामगिरी पाहता जगातील १४ ते १५ देशांनी भारताकडे ब्रह्मोसची मागणी केली आहे. ब्रह्मोस क्षेपणास्त्र आता लखनौमधूनही निर्यात केले जाईल. ही यंत्रणा आपल्या संरक्षण क्षेत्राला आणि देशाच्या आत्मनिर्भरतेला मजबूत करेल. सोबतच रोजगारही निर्माण करेल. (वृत्तसंस्था)

### तोंडात लपवून १५ लाखांचे सोने चोरले

**कानपूर** : सोनाराकडील एका कारागिराने तोंडात १५० ग्रॅम सोने भरून फरार झाला. जेव्हा कारागीर दोन दिवस दागिन्यांच्या दुकानात आला नाही तेव्हा मालकाला संशय आला. त्याने दुकानातील सीसीटीव्ही फुटेज पाहिले आणि नंतर त्याला चोरीची घटना कळली. सोन्याची किंमत १५ लाख रुपये आहे. कारागीर दुकानातून बाहेर पडला आणि त्याचा मोबाईल बंद केला. दागिन्यांच्या दुकानाचा मालक आरोपीच्या घरी पोहोचला, पण तो तिथेही सापडला नाही. त्यानंतर त्याने अखिल भारतीय ज्वेलर्स असोसिएशनच्या राष्ट्रीय अध्यक्षांना घटनेची माहिती दिली. त्याने १२ जुलै रोजी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# रेल्वे सर्व डब्यांमध्ये बसवणार सीसीटीव्ही

### प्रत्येक डब्यात चार डोम टाईप कॅमेरे

**नवी दिल्ली, १३ जुलै**

भारतीय रेल्वेने प्रवाशांच्या सुरक्षेसाठी मोठा निर्णय घेतला आहे. रेल्वे मंत्रालयाने जाहीर केले आहे की लवकरच देशातील सर्व ७४,००० डब्यांमध्ये आणि १५,००० इंजिनांमध्ये अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे बसवले जाणार आहेत.

सध्या ही यंत्रणा प्रायोगिक स्वरूपात उत्तर रेल्वेमध्ये वापरली जात होती आणि त्याचे परिणाम सकारात्मक आढळले. वंदे भारत, अमृत भारत आणि वंदे मेट्रो या गाड्यांमध्येच ही सोय आहे. रेल्वे



मंत्रालयाने स्पष्ट केले आहे की यापुढे प्रत्येक डब्यामध्ये चार डोम टाईप कॅमेरे बसवले जातील. दोन समोरील व दोन मागील दरवाजांजवळ हे सीसीटीव्ही असतील.

इंजिनमध्ये सहा कॅमेरे असतील. यात पुढे, मागे, दोन्ही बाजूंना आणि दोन्ही कॅबिनमध्ये प्रत्येकी एक कॅमेरा तसेच दोन डेस्क-लावलेले मायक्रोफोनदेखील बसवले जातील.

रेल्वे प्रशासनाने स्पष्ट केले की, या निर्णयामुळे विशेषतः महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न अधिक प्रभावीपणे हाताळला जाईल.

एकट्या किंवा इतर प्रवाशांसोबत प्रवास करणाऱ्या महिलांना अनेकदा असुरक्षित वाटते. आता २४ बाय ७ ऑनलाइन निगराणी होईल, असे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. प्रवाशांच्या गोपनीयतेचा विचार करताना, कॅमेरे केवळ डब्यांच्या सामान्य हालचाली क्षेत्रात (दरवाज्याजवळ) लावले जाणार आहेत. यामुळे डब्यांमधील खाजगी भाग किंवा शयनक्षेत्र सुरक्षित राहील. (वृत्तसंस्था)

### तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर

रेल्वे प्रशासनाने जाहीर केले आहे की हे सर्व कॅमेरे प्रमाणित असतील आणि कमी प्रकाशातही स्पष्ट चित्रफिती मिळतील. अगदी १०० किमी प्रतितासह वेगाने धावणाऱ्या गाड्यांमध्येही हे सीसीटीव्ही उत्तमरित्या काम करू शकतील. याशिवाय, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी या कॅमेऱ्यांद्वारे मिळणाऱ्या डेटावर मिशनच्या सहकार्याने कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) वापरण्याच्या शक्यतेचाही विचार करण्याचे आदेश दिले आहेत.

# भारताला मिळाले आणखी एक अस्त्र

## सुखोई लढाऊ विमानातून हवेतून हवेत मारा करण्याची क्षमता, हाय स्पीड ड्रोन लक्ष्यांवर अचूक मारा

**नवी दिल्ली, १३ जुलै**

डीआरडीओ आणि भारतीय हवाई दलाने ओडिशाच्या किनाऱ्याजवळ अस्त्र क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी केली. सुखोई-३० एमके-१ लढाऊ विमानातून हवेतून हवेत मारा करणारे क्षेपणास्त्र डागण्यात आले. या चाचणीत, क्षेपणास्त्राने वेगवेगळ्या अंतरावरील हाय स्पीड ड्रोन लक्ष्यांवर अचूकपणे मारा केला. या कामगिरीबद्दल संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी डीआरडीओ, हवाई दलाचे अभिनंदन केले.

संरक्षण मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, परफ्यूम चाचणी श्रेणी अंतर्गत अस्त्र क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी केली. हे क्षेपणास्त्र अचूक आणि हवेतून हवेत मारा करणारे आहे. क्षेपणास्त्राला सुखोई ३० एमके १ लढाऊ विमानातून प्रक्षेपित करण्यात आले. हे क्षेपणास्त्र स्वदेशी बनावटीचे असून ड्रोन हल्ल्याला प्रत्युत्तर देण्यास सक्षम आहे. या क्षेपणास्त्रात स्वदेशी रेडिओ फ्रिक्वेन्सी बसविण्यास आली. वेगवेगळ्या लक्ष्यांवर मारा करण्यात ते सक्षम आहे. चाचणीवेळी वेगवेगळ्या अंतरावर, दिशांवर, परिस्थितीत उडणाऱ्या हायस्पीड ड्रोन लक्ष्यांवर दोन क्षेपणास्त्रे डागण्यात आली. दोन्ही वेळा दोन्ही क्षेपणास्त्रे त्यांचे लक्ष्य अतिशय अचूकतेने नष्ट करण्यात यश आले. (वृत्तसंस्था)



### १०० किमीपेक्षा जास्त मारा करण्याची क्षमता

अस्त्र क्षेपणास्त्रात १०० किमीपेक्षा जास्त अंतरावर मारा करण्याची क्षमता आहे आणि ते अत्याधुनिक मार्गदर्शन आणि नेव्हिगेशन सिस्टमने सुसज्ज आहे. डीआरडीओच्या अनेक प्रयोगशाळांव्यतिरिक्त, हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेडसह ५० हून अधिक सार्वजनिक आणि खाजगी कंपन्यांनी ते बनवण्यात योगदान दिले.

स्वदेशी बनावटीच्या अस्त्र क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी ही संरक्षण तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात एक मोठे आणि महत्त्वाचे पाऊल आहे. मी यासाठी डीआरडीओ, हवाई दल आणि या प्रकल्पाशी संबंधित सर्व उद्योगांचे अभिनंदन करतो.
**-राजनाथ सिंह,** संरक्षण मंत्री

### हवामानाचा परिणाम नाही

चांदीपूरमधील एकात्मिक चाचणी श्रेणीत बसवलेल्या ट्रॅकिंग उपकरणांनी उड्डाण डेटाद्वारे त्याच्या यशाची पुष्टी केली. संरक्षण मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, या चाचणीवरून असे दिसून येते की स्वदेशी असललेले अस्त्र क्षेपणास्त्र प्रणाली केवळ अचूकच नाही तर अतिशय विश्वासार्ह देखील आहे आणि कुठल्याही हवामानात मारा करण्यात सक्षम आहे.



दहशतवादी हल्ल्यात जीव गमावलेल्या व्यक्तीच्या नातेवाईकाला जम्मू-काश्मीर सरकारने शासकीय सेवेत घेतले आहे. नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांच्या हस्ते नियुक्तिपत्रे देण्यात आली. नियुक्तिपत्र मिळाल्यानंतर सिन्हा यांच्यावर प्रेम आणि आशीर्वादाचा वर्षाव करताना काश्मिरी महिला

# अमेरिकेत आठ खलिस्तानी दहशतवाद्यांना पकडले

## एफबीआयची कारवाई, भारतातील पवित्र सिंग बटालाचा समावेश

### एनआयएच्या यादीत मोस्ट वॉन्टेड

**वाशिंग्टन, १३ जुलै**

अमेरिकेची गुप्तचर संस्था फेडरल ब्युरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन अर्थात् एफबीआयने ८ खलिस्तानी दहशतवाद्यांना अटक केली. यात एनआयएच्या मोस्ट वॉन्टेड यादीत समाविष्ट असलेला पवित्र सिंग बटाला याचाही समावेश आहे.

एका टोळीशी संबंधित अपहरण प्रकरणात एफबीआयने ही कारवाई केली आहे. सॅन जोक्विन काउंटी शेरीफ कार्यालयाने शनिवारी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, एफबीआयच्या स्वाट पथकाच्या सहकार्याने दिलप्रीत सिंग, अर्शप्रीत सिंग, अमृतपाल सिंग, विशाल, पवित्र सिंग, गुरताज सिंग, मनप्रीत रंधावा आणि सरबजीत सिंग या खलिस्तानी दहशतवाद्यांना अपहरणाच्या आरोपाखाली अटक करण्यात आली. त्यांच्याकडून ५ पिस्तूल, एक असॉल्ट रायफल, शेकडो राउंड दारूगोळा, मासिके आणि १५,००० अमेरिकन डॉलर्सपेक्षा जास्त रोख जप्त करण्यात आली. अटक केलेले सर्व दहशतवादी एका दहशतवादी नेटवर्कशी जोडलेले आहेत. यातील पवित्र सिंग बटाला हा पंजाबचा असून प्रतिबंधित दहशतवादी संघटना बब्बर खालसा इंटरनॅशनलचा सदस्य आहे. एनआयएने बटालाविरुद्ध आरोपपत्र देखील दाखल केले आहे. (वृत्तसंस्था)



# बीएलएफचे पाकच्या लष्करी तळांवर हल्ले

## ५० सैनिक मारले, ५१ पेक्षा अधिक जखमी, सरकारी मालमत्तेचे नुकसान

**क्वेट्टा, १३ जुलै**

बलुचिस्तान लिबरेशन फ्रंट अर्थात् बीएलएफने पाकिस्तान लष्कराविरोधात सूरू केलेल्या बाम ऑपरेशन अंतर्गत बलुचिस्तान प्रांतातील पाकिस्तानातील लष्करी तळे, प्रतिष्ठाने आणि सरकारी इमारतींसह ८४ ठिकाणी हल्ले केले, यात ५० सैनिकांचा मृत्यू, तर ५१ पेक्षा अधिक जखमी झाले. या हल्ल्यात शासकीय मालमत्तेचे प्रचंड नुकसान झाल्याचा दावा बीएलफने केला आहे.

बीएलएफचे प्रवक्ते मेजर ग्वाहराम बलोच यांनी जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, मागील चार दिवसांपासन पाकिस्तानी लष्कराविरोधात बलुचिस्तानमध्ये ऑपरेशन राबविण्यात आले. यात लष्कर आणि फ्रंटियर कॉर्प्सचे किमान ५० सैनिक मारले गेले आणि ५१ हून अधिक जखमी झाले. मुसाखेल परिसरातील एका चौकीवर नऊ कथित गुप्तचर एजंट मारण्यात आले. गेल्या दोन दिवसांत मोठ्या प्रमाणात ८४ समन्वित हल्ले केले. या हल्ल्यांमध्ये पाकिस्तानी लष्करी कर्मचारी, गुप्तचर यंत्रणा आणि प्रमुख राज्य पायाभूत सुविधांना लक्ष्य केले गेले. गॅस टँकर आणि खनिज वाहतूक ट्रकसह २५ वाहने नष्ट करण्यात आली. याशिवाय हल्ल्यात सात मोबाईल टॉवर जाळण्यात आली आणि पाच पाळत ठेवणारे ड्रोन उद्ध्वस्त करण्यात आले. (वृत्तसंस्था)

### २२ तात्पुरत्या चौक्याही उभारल्या

या भागात बीएलएफने अनेक मोक्याच्या ठिकाणी २२ तात्पुरत्या चौक्याही उभारल्या. यामध्ये, मकुरन, रक्षन, सरवान, झालावान, कोह-ए-सुलेमान, बेला आणि काची येथील पाकिस्तानी लष्करी चौक्यांवर नियंत्रण स्थापित करण्यात आले आणि मोठ्या प्रमाणात पाकिस्तान लष्कर आणि पोलिसांची शस्त्रास्त्रे आणि दारूगोळा ताब्यात घेण्यात आल्याचे बलोच यांनी निवेदनात म्हटले आहे.



# पाटण्यात भाजपा नेत्याची हत्या

**पाटणा, १३ जुलै**

बिहारमध्ये भाजपा नेत्याची भरदिवसा गोळ्या घालून हत्या करण्यात आली. सुरेंद्र केवट असे या नेत्याचे नाव आहे.

५२ वर्षीय सुरेंद्र केवट शेखपुरा जिल्ह्यातील शेतात काम करत असताना दुचाकीवर आलेल्या दोन अज्ञात हल्लेखोरांनी त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. गंभीर जखमी स्थितीत त्यांना पाटणा एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. केवट यांचे शव उत्तरीय तपासणीसाठी पाठविण्यात आले आहे. हत्येनंतर काँग्रेस आणि राजद नेत्यांनी राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेबाबत प्रश्न उपस्थित करत याच्या सखोल चौकशीची मागणी केली आहे. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### सुखदाच्या पायाला मोठी दुखापत

**मुंबई :** अभिनेत्री सुखदा खांडकेकर ही उत्तम नृत्यांगना आहे. मात्र, अलिकडेच तिला मोठ्या शारीरिक त्रासाला सामोरे जावे लागले. सुखदाचा नाचताना गुडघा वळला आणि त्यातून झालेल्या दुखापतीमुळे तिला शस्त्रक्रियेला सामोरे जावे लागले. आता तिला वॉकरच्या सहाय्याने चालावे लागत आहे. याविषयीचा एक व्हिडीओ तिने समाज माध्यमांवर शेअर केला आहे. तिने लिहिले, आराम कोणाला आवडत नाही? पण सक्तीचा आराम....नको रे बाबा. नाचताना गुडघा वळल्याचे निमित्त झाले आणि थेट ऑपरेशनचीच वेळ आली. बरे व्हायला तीन महिने लागणार असे डॉक्टरांनी आणि मी दोन महिन्यांनंतरचे कार्यक्रम घेतले होते. त्यामुळे तीन महिन्यांतील सुधारणा तिने अवघ्या दोन महिन्यात दाखवली. उपचार, कुटुंबीयांची सोबत याद्वारे हे शक्य झाल्याचे ती सांगते.



### कधीकाळी अभिनेत्रीच्या प्रेमात होता रोहित शेट्टी

**मुंबई :** रोहित शेट्टी हा बॉलिवूडमधील लोकप्रिय दिग्दर्शक. रोहित काही वर्षांपूर्वी एका बॉलिवूड अभिनेत्रीच्या अफेअर प्रकरणामुळे चर्चेत आला होता. रोहित शेट्टी एका ३६ वर्षीय अभिनेत्रीच्या प्रेमात होता. रोहित या अभिनेत्रीच्या प्रेमात इतका आकंठ बुडाला होता की, तो त्याच्या पत्नी आणि मुलाला सोडायलाही तयार होता. ही अभिनेत्री होती प्राची देसाई. २०१२ साली रिलीज झालेल्या बोल बच्चन सिनेमाच्या सेटवर त्यांच्या प्रेमकहाणीला सुरुवात झाली. रोहित प्राचीच्या प्रेमात इतका बुडाला होता की तो पत्नीपासून वेगळे राहण्याचा निर्णय घेणार होता. इतकेच नव्हे मुलाकडे सुद्धा रोहितचे अजिबात लक्ष नव्हते. परंतु काहीकाळ प्राचीसोबत राहिल्यानंतर रोहितला त्याची चूक उमगली. तो प्राचीला सोडून पुन्हा पत्नीसोबत राहायला गेला. यानंतर रोहित-प्राचीने कधीही एकमेकांसोबत काम केले नाही. रोहित-प्राचीने कधीही त्यांच्या रिलेशनशीपचा जाहीर खुलासा केला नाही. याशिवाय ब्रेकअप झाल्यावर एकमेकांची बदनामीही केली नाही. त्यांनी कायम त्यांचे नाते कायम मनातच ठेवले.



### शनाया कपूरचा पहिला चित्रपट आपटला

**मुंबई :** राजकुमार रावचा मालिक चित्रपट, शनाया कपूर-विक्रांत मेस्सीचा 'आँखों की गुस्ताखियां' आणि हॉलिवूडचा 'सुपरमॅन' हा चित्रपट ११ जुलै रोजी एकाच वेळी प्रदर्शित झाला. शुक्रवारपासून या चित्रपटांमध्ये जोरदार स्पर्धा सुरू आहे. 'सुपरमॅन'ने रिलीजच्या पहिल्या दिवशी ७ कोटी आणि दुसऱ्या दिवशी ९.२५ कोटी कमावले, ज्यामुळे दोन दिवसांत १६.२५ कोटींचा गल्ला जमवला. प्रेक्षकांना हा चित्रपट आवडला आहे आणि तो हॉलिवूडमधील मागील रिलीज एफ आणि जुरासिक वर्ल्ड: रिबर्थ लाही स्पर्धा देत आहे. त्या तुलनेत, 'आँखों की गुस्ताखियां' बॉक्स ऑफिसवर पूर्णपणे फ्लॉप झाला आहे. शनाया कपूर आणि विक्रांत मेस्सी यांच्या चित्रपटाने दुसऱ्या दिवशी फक्त ४३ लाख कमावले. दोन दिवसांत त्याचे एकूण कलेक्शन फक्त ७३ लाख आहे. चित्रपटातील शनायाच्या अभिनयाचे काही कौतुक झाले, परंतु केमिस्ट्रीबद्दल टीका झाली.



# बलुचिस्तान पाकिस्तानमध्ये कदापि समाविष्ट होणार नाही

## बलुच नेत्याचा दावा

**लाहोर, १३ जुलै**

बलुचिस्तान पाकिस्तानचा भाग कधीच नव्हता आणि कधीच होणार नाही, असा ठाम दावा बलुच नॅशनल मूव्हमेंटचे माहिती सचिव काझी दाद मोहम्मद रेहान यांनी वृत्तसंस्थेला दिलेल्या खास मुलाखतीत केला आहे. त्यांनी 'ऑपरेशन बाम'च्या पृष्ठभूमीवर हा गौप्यस्फोट केला आहे.

'ऑपरेशन बाम' हे बलुच लिबरेशन फ्रंट या सशस्त्र संघटनेने सुरू केलेले एक समन्वयित लष्करी अभियान आहे. मंगळवारी रात्रीपासून सुरू झालेल्या या कारवाईत पांजगूर, सुराब, केच आणि खराण या बलुचिस्तानमधील प्रमुख जिल्ह्यांमध्ये पाकिस्तानच्या लष्करी आणि प्रशासकीय ठिकाणांवर एकत्रितपणे १७ हल्ले करण्यात आले. या हल्ल्यांमुळे कम्युनिकेशन नेटवर्क्स, प्रशासनिक इमारती आणि लष्करी चौक्यांचे मोठे नुकसान झाले.

### आम्हाला पाक संसदेत स्थान नको

बीएनएमचे रेहान यांनी सांगितले की, आम्ही पहिली संघटना आहोत जिने पाकिस्तानच्या संसदीय प्रक्रियेला स्पष्ट विरोध केला आहे. आमचा लढा कोणत्याही प्रकारच्या स्वायत्ततेसाठी नाही, तर पूर्ण स्वातंत्र्यासाठी आहे. त्यांनी असेही स्पष्ट केले की, बलुच जनता आता आपला निर्णय स्वतः घेण्यास सज्ज आहे.

### बलुचिस्तानचा इतिहास आणि नवा लढा

रेहान यांनी बलुचिस्तानचा पाकिस्तानमध्ये १९४८ मध्ये जबरदस्तीने समावेश झाल्याची आठवण करून दिली. त्यांनी सांगितले की, तेव्हापासूनच आमचा संघर्ष सुरू झाला आहे. पूर्वी हा लढा जमात प्रमुखांच्या नेतृत्वाखाली होता, परंतु आजचा लढा सामान्य बलुच जनतेचा आहे. आजची बलुच लढवय्ये पिढी केवळ पारंपरिक पद्धतीने नव्हे, तर आधुनिक गनिमी युद्ध तंत्रज्ञान आणि रणनीतीचा वापर करत आहे, असेही त्यांनी नमूद केले. (वृत्तसंस्था)

# नेपाळ-चीन सीमेवर पूर, मानसरोवर यात्रेला फटका

**काठमांडू, १३ जुलै**

नेपाळ-चीन सीमेवरील रसुवागढी गावाजवळील मितेरी पूल पुरामुळे कोसळल्याने कैलास मानसरोवरला जाणाऱ्या यात्रेकरूंना अडचणी येत आहे. या भागातील वाहतूक विस्कळीत झाली असून डोंगराळ प्रदेशातील व्यवसायही ठप्प झाला आहे.

नेपाळी सरकारचे अधिकारी सोनम ग्यालझेन शेर्पा म्हणाले की, लेहेंडे नदीत आलेल्या पुरामुळे मितेरी पूल वाहून गेला. त्यामुळे कैलास मानसरोवरला जाणारा रस्ता बंद झाला आहे आणि यात्रेकरू अडकले. चीन सरकारला तातोपानी, कोरोला, हिल्सा आणि इतर मार्गांनी यात्रेकरूंची वाहतूक सुलभ करण्याचे आवाहन केले आहे. यासाठी त्वरित राजनैतिक चर्चा आवश्यक आहे. चीनच्या तिबेट प्रदेशात असलेल्या कैलास मानसरोवरला जाणाऱ्या नेपाळी आणि परदेशी यात्रेकरूंना मितेरी पूल तुटल्यामुळे आता अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. हा पूल नेपाळ आणि चीनमधील एक महत्त्वाचा मार्ग होता. (वृत्तसंस्था)

# देशाच्या परराष्ट्र धोरणाला आकार देणारे हर्षवर्धन शृंगला

**नवी दिल्ली, १३ जुलै**

राष्ट्रपती द्रौपती मुर्मू यांनी राज्यसभेवर चार जणांची नियुक्ती केली आहे. त्यामध्ये ज्येष्ठ विधिज्ञ उज्ज्वल निकम, माजी परराष्ट्र सचिव हर्षवर्धन शृंगला, डॉ. मीनाक्षी जैन आणि शिक्षणतज्ज्ञ सी. सदानंदन मास्टर यांचा समावेश आहे.

हर्षवर्धन श्रृंगला १९८४ च्या बॅचचे भारतीय परराष्ट्र सेवेचे अधिकारी आहेत. हर्षवर्धन श्रृंगला यांनी अमेरिका, बांगलादेश आणि थायलंडमध्ये भारताचे राजदूत म्हणून काम केले आहे. ते २०२० ते २०२२ पर्यंत भारताचे परराष्ट्र सचिव होते आणि भारताच्या धोरणात्मक परराष्ट्र धोरणाला आकार देण्यात त्यांची भूमिका उल्लेखनीय आहे. अलिकडेच, हर्षवर्धन श्रृंगला भारताच्या जी-२० अध्यक्षपदाच्या काळात मुख्य समन्वयक म्हणून भूमिका बजावली. (वृत्तसंस्था)



### इतिहासकार आणि शिक्षिका डॉ. मीनाक्षी जैन



डॉ. मीनाक्षी जैन प्रसिद्ध इतिहासकार आणि शिक्षिका आहेत. त्यांनी दिल्ली विद्यापीठाच्या गार्गी कॉलेजमध्ये इतिहास शिकवला आहे आणि भारतीय सांस्कृतिक वारशावरील त्यांच्या संशोधन कार्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली आहे. मीनाक्षी जैन सती, राम आणि अयोध्या आणि देवतांची उड्डाण यासारख्या प्रसिद्ध पुस्तकांच्या लेखिका आहेत. २०२० मध्ये मीनाक्षी जैन यांना पद्मश्रीने पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मीनाक्षी जैन भारतीय इतिहास आणि परंपरांवरील संशोधनासाठी ओळखल्या जातात.

### सी. सदानंदन मास्टर, सामाजिक कार्यकर्ते आणि शिक्षणतज्ज्ञ



सी. सदानंदन मास्टर केरळमधील एक ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि शिक्षणतज्ज्ञ आहेत. ते राष्ट्रीय शिक्षक संघाचे केंद्रीय उपाध्यक्ष आणि नॅशनल टीचर्स न्यूजचे संपादक देखील आहेत. १९९४ मध्ये राजकीय हल्लयात दोन्ही पाय गमावले असले तरी, सी. सदानंदन मास्टर यांनी समाजसेवा आणि शिक्षणाला आपल्या जीवनाचे ध्येय बनवले. त्यांच्या नियुक्तीकडे सामाजिक सेवेतील योगदानाचे कौतुक म्हणून पाहिले जात आहे.

# इअरबड्स, हेडफोन्स कानासाठी धोकादायक

## बहिरेपण येण्याची शक्यता, युवकांसाठी सावधानतेचा इशारा

**नवी दिल्ली, १३ जुलै**

स्मार्टफोन प्रत्येकाची गरज बनला असतानाच त्याच्यासोबत येणारी साधनेही तितकीच प्राधान्याने वापरली जात आहेत. त्यात इअरबड्स आणि हेडफोन्स हेदेखील येतात. बहुतांश लोक याचा वापर करतात. मात्र, याचा अतिवापर कानांसाठी धोकादायक असून यामुळे निकटच्या भविष्यात श्रवणशक्ती बाधित होऊ शकते, असा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे.




यासंदर्भात तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, कानातली उपकरणे थेट कानात आवाज पाठवतात. जर त्यांचा वापर जास्त आवाजात आणि बराच काळ केला तर त्यामुळे तात्पुरते किंवा कायमचे ऐकण्याची क्षमता कमी होऊ शकते.

खरे तर, दररोज ८५ डेसिबलपेक्षा जास्त आवाज जास्त वेळ ऐकल्याने कानाच्या आत असलेल्या नाजूक केसांच्या पेशी खराब होऊ शकतात. या पेशी मेंदूला ध्वनी सिग्नल प्रसारित करण्याचे काम करतात. एकदा त्या खराब झाल्या की त्या पुन्हा वाढत नाहीत. या कारणास्तव, सतत मोठा आवाज ऐकण्याच्या सवयीमुळे कायमचे श्रवणशक्ती कमी होऊ शकते, ज्याला वैद्यकीय भाषेत सेन्सोरिनल हिअरिंग लॉस म्हणतात.

मेयो क्लिनिकच्या मते, १२ ते ३५ वयोगटातील सुमारे २४ टक्के लोक खूप मोठ्याने संगीत ऐकतात, ज्यामुळे श्रवणशक्ती कमी होण्याचा धोका वाढतो. अचानक सेन्सोरिन्यूरल श्रवणशक्ती कमी होणे ही अशी स्थिती आहे ज्यामध्ये एका किंवा दोन्ही कानात अचानक श्रवणशक्ती कमी होते. ही श्रवणशक्ती कमी होणे सहसा तीन दिवसांत होते आणि बहुतेक प्रकरणांमध्ये फक्त एका कानावर परिणाम होतो. यामध्ये, कानातील श्रवण तंत्रिका किंवा कोक्लियाच्या नाजूक केसांच्या पेशी खराब होतात. एका कानात अचानक ऐकू येणे, कानात आवाज येणे किंवा टिनिटस होणे,चक्कर येणे किंवा संतुलन बिघडणे अशी त्याची लक्षणे असतात. (वृत्तसंस्था)



### इअरबड्सचा आवाज कारच्या हॉर्नइतकाच

नोएडाच्या शारदा हॉस्पिटलच्या हेड अँड नेक सर्जरी विभागातील ईएनटी प्रमुख डॉ. रोहित सक्सेना म्हणतात की इअरबड्ससारखी उपकरणे १०० डेसिबलपर्यंत आवाज निर्माण करू शकतात, जो मोटारसायकल किंवा कारच्या हॉर्नइतका मोठा असतो. तर सामान्य संभाषण फक्त ६० डेसिबलच्या आसपास असते. फक्त ५० मिनिटांसाठी ९५ डेसिबलचा आवाज (मोटारसायकलचा आवाज) देखील श्रवणशक्तीला हानी पोहोचवू शकतो. १०० डेसिबलचा आवाज (ट्रेन किंवा कारच्या हॉर्नचा आवाज) फक्त १५ मिनिटांत परिणाम करू शकतो.

# ड्रॅगन यान ६० हून अधिक प्रयोगांचा डेटा घेऊन परतणार

**नवी दिल्ली, १३ जुलै**

अमेरिकेची अंतराळ संस्था नासाने शनिवारी सांगितले की, ड्रॅगन अंतराळयान आयएसएसवरून चार अंतराळवीरांव्यतिरिक्त ५८० पाउंड (सुमारे २६३ किलो) पेक्षा जास्त सामान, नासाचे हार्डवेअर आणि ६० हून अधिक वैज्ञानिक प्रयोगांचा डेटा घेऊन १५ जुलै रोजी पृथ्वीवर परतणार आहे.

एक्सिओम-४ मिशनच्या कमांडर पेगी व्हिटसन यांनी आपल्या सोशल मीडिया हँडलवरील एका पोस्टमध्ये सांगितले की, त्या आणि त्यांची टीम आयएसएसवरील शेवटच्या दिवसाचा आनंद घेत आहेत. त्यांनी म्हटले की, शुक्ला यांनी आणलेल्या गाजराच्या हलव्याने आणि आमरसाने सर्वांची मने जिंकली आहेत.

### शुभांशुची प्रकृती कशी आहे ?

भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने (इस्रो) सांगितले की, अंतराळातून परतणारे शुभांशु शुक्ला यांची प्रकृती उत्तम असून ते उत्साहाने भारलेले आहेत. सात दिवसांच्या पुनर्वसन काळात फ्लाइट सर्जन त्यांच्या शारीरिक आणि मानसिक स्थितीवर लक्ष ठेवतील. विशेष म्हणजे, इस्रोने या मोहिमेसाठी सुमारे ५५० कोटी रुपये खर्च केले आहेत. हा अनुभव २०२७ मध्ये सुरू होणाऱ्या महत्त्वाकांक्षी गगनयान मोहिमेच्या तयारीसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे. आयएसएस ताशी २८,००० किलोमीटर वेगाने पृथ्वीची परिक्रमा करते. क्रू ड्रॅगन यान स्वयंचलितपणे स्टेशनपासून वेगळे होईल आणि हळूहळू वेग कमी करून पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करेल. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## अग्रलेख...

# छांगुर बाबाचा पाश

ज्या धर्माला हजारो वर्षांचा समृद्ध इतिहास राहिलेला आहे, ज्या धर्माने संकटावर संकटे सोसली, झेलली आणि सहन केली, त्या हिंदू धर्मावरील आक्रमणे अजूनही संपलेली नाहीत. भला मोठा डोंगर उंदरांनी पोखरून काढावा आणि कालांतराने तो धराशायी व्हावा, अशी स्थिती सध्या हिंदू धर्माची झाली आहे, असे मोठ्या खेदाने म्हणावे लागत आहे. असेच चालत राहिले तर तो दिवस दूर नाही जेव्हा हिंदूंची स्थिती इराणमधील पारशांसारखी होईल किंवा स्वत:चे अस्तित्व गमावलेले असेल. ज्या धर्माच्या आधारावर १९४७ मध्ये देशाची फाळणी झाली, पुन्हा देश त्याच दिशेने हळूहळू जात असल्याच्या घटना सातत्याने घडत आहेत. सर्वच बाजूंनी हिंदू धर्माचे लचके तोडण्याचे प्रकार देशात सुरू आहेत. एका बाजूने ख्रिश्चन मिशनरीज कधी गोड बोलून तर कधी पैशाचे आमिष देत हिंदूंमधील गरीब, निर्धन कुटुंबीयांना धर्मांतरित करीत आहेत, तर दुसऱ्या बाजूने छांगुर बाबासारखे कडवे, धर्मांध मुस्लिम पद्धतशीरपणे केवळ हिंदू मुलींचे जबरदस्तीने धर्मांतर करीत आहेत. उत्तर प्रदेशातील बलरामपूर जिल्ह्यातील जलालुद्दीन नावाचा माणूस जो पाच-सात वर्षांपूर्वी रस्त्यावर भीक मागायचा, पाच ते दहा रुपयात अंगठ्या विकून पोट भरायचा, आज त्याच्याकडे कोट्यवधींची संपत्ती जमा झाली आहे. मधपूर गावचा रहिवासी असलेल्या जलालुद्दीनने हाजी पीर जलालुद्दीन बाबा हे नाव धारण करून आपल्या भागातील गरीब, मजूर, असहाय, विकलांग आणि घटस्फोटितांना हेरत असे आणि त्यांना आपल्या जाळ्यात ओढत असे. मुंबईतील एका सधन सिंधी कुटुंबाला छांगुरने आपल्या जाळ्यात ओढले आणि इस्लाममध्ये आणले.

नवीन रोहरा, त्याची पत्नी नीतू व मुलगी समाले यांचे धर्मपरिवर्तन केले. एवढेच नव्हे तर नीचपणाचा कळस गाठणाऱ्या या ढोंग्याने नीतूला नसरीन नाव दिले. मुलीच्या वयाची असणाऱ्या या महिलेसोबत पत्नीसारखे वागायचा. अगदी २०२० पर्यंत छांगुर हा सर्वसाधारण होता. तो सातत्याने मुंबईतील हाजी अली दर्गा येथे भेट देत असे. येथेच त्याच्या जाळ्यात सिंधी कुटुंब अडकले आणि त्याचे नशीब फळफळले. पाच वर्षांतच त्याने असे कोणते कष्ट केले की त्याच्याकडे कोट्यवधींची माया जमा झाली? मधपूर येथे त्याने ७० खोल्यांचा आलिशान महालही उभारला. यातील ४० खोल्या अतिक्रमण करून सरकारी जमिनीवर बांधल्या. या खोल्या आता जमीनदोस्त करण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे हे घर नीतू ऊर्फ नसरीनच्या नावावर आहे. हिंदू धर्माला स्वकीयांनीच जास्त पोखरल्याची उदाहरणे इतिहासात आहेत. नीतू ऊर्फ नसरीनही त्याला अपवाद नाही. फक्त सातवा वर्ग शिकलेली नसरीन हीच हिंदू मुलींना जाळ्यात ओढत असे. कामाच्या अथवा आर्थिक मदतीच्या नावावर नीतू मुलींना बंगल्यात नेत असे. ज्यांनी मुस्लिम धर्म स्वीकारला त्यांची ओळख छांगुरशी करून दिली जाई. ज्या मुलींनी नकार दिला त्यांना धमकावत अथवा पोलिस ठाणे आणि खोट्या खटल्यात अडकवून इस्लाम स्वीकारण्यास कबूल करण्यास भाग पाडले जाई. नीतूचा पती नवीननेही जमालुद्दीन हे नाव धारण करून व्याजाच्या व्यवसायात लागला. खरे तर व्यवसाय हा नावापुरताच होता. धर्मांतराच्या या कटात जमालुद्दीनही सहभागी होता. अशा धर्मांधांना ना नीतीची चाड असते ना शरम. अटक होण्यापूर्वी छांगुर आणि नसरीन हे लखनौ येथील हॉटेलमध्ये एकत्र राहत होते. नीतू ही पती नवीनसोबत २०१५ मध्ये दुबईला गेली होती. परत आल्यानंतर २०१६ मध्ये दोघेही मुसलमान झाले आणि छांगुरच्या टोळीचे सदस्य झाले. २०२१ मध्ये नीतूच्या कुटुंबातील सर्व सदस्यांनी मुस्लिम धर्म स्वीकारला. नीतू छांगुरच्या मोहपाशात एवढी अडकली की तिने छांगुर हा माझा गुरू असल्याचे प्रतिज्ञापत्र उतरौला तहसील कार्यालयात सादर केले. २०१४ ते २०१९ या काळात नीतू आणि नवीन १९ वेळा आखाती देशात जाऊन आल्याचे पोलिसांच्या तपासात उघड झाले आहे. खरे तर दुबईतील अरब मुस्लिम हे धर्मांतरात सहभागी नसतात. जे बाटगे हिंदुस्थानातून दुबईत राहायला गेले आहेत ते धर्मांतराचे रॅकेट चालवीत असतात. नीतू, नवीन आणि तिची मुलगी समाले यांनी भारतात नव्हे तर दुबईतील अल फारूख उमर बीन खताब सेंटरमध्ये इस्लाम धर्म स्वीकारला आहे आणि दुबई सरकारच्या धार्मिकविषयक विभागाने त्यांना धर्मांतर केल्याचे प्रमाणपत्रही दिले आहे. यावरून धर्मांतराचे काळे कृत्य आंतरराष्ट्रीय पातळीवरून सुरू असल्याचे उघड झाले आहे.

या देशाचे आणि हिंदूचे दुर्दैव म्हणजे छांगुर आणि त्याच्या टोळीने हिंदू मुलींचा बाजार मांडला होता. धर्मांतरासाठी जातीनुसार दर ठरले होते. ब्राह्मण, क्षत्रिय आणि शीख धर्मातील मुलींचे धर्मांतर केल्यास १५ लाख, मागास वर्गातील मुलींसाठी १२, तर अतिमागास जातीतील मुलींसाठी ८ ते १० लाख रुपये दिले जात असत. छांगुर आणि टोळीचा हा धंदा गेल्या अनेक वर्षांपासून सुरू होता. त्याने एकट्या बलरामपूर परिसरात ४० मुलींचे धर्मांतर केले. देशभरातील आकडा हा दीड हजारांपेक्षा जास्त असल्याचे उत्तर प्रदेश पोलिसांनी सांगितले आहे. याहीपेक्षा मोठे दुर्दैव म्हणजे एवढी वर्षे स्थानिक राजकीय पदाधिकारी, पोलिस आणि सामान्य नागरिक छांगुरकडे दुर्लक्ष करीत होते. हिंदू जर एवढे षंढासारखे वागले आणि हातावर हात धरून बसले तर हा सनातन धर्म रसातळाला गेल्याशिवाय राहणार नाही. हिंदू आपल्या धर्माविषयी उदासीन आणि निष्क्रिय राहिल्यास छांगुर बाबासारखे आणखी धर्मांध निर्माण होणार आहेत. छांगुर नुसता धर्मांतरच करायचा नाही तर धर्मांतराचे जाळे देशभरात निर्माण करण्यासाठी संपत्तीही खरेदी करीत असे. जसजशी चौकशी पुढे जात आहे तसतसे नवीन खुलासे होत आहेत. छांगुरने लोणावळ्यात १६ कोटींची संपत्ती विकत घेतली आहे. नेपाळातील बँकांमध्ये खाती उघडून त्यात मुस्लिम देशांमधून कोट्यवधी रुपये आले आहेत. नसरीन आणि तिचा पती जलालुद्दीन यांची ४० पेक्षा जास्त बँक खाती आढळली आहेत.

विश्व हिंदू परिषदेचे नेते गोपाल राय यांनी हे प्रकरण उचलले नसते तर छांगुरने कितीतरी हिंदू मुलींना नरकासमान जीवनात ढकलले असते. असे छांगुर बाबा केवळ उत्तर प्रदेशातच नाहीत तर देशभरात पसरले आहेत. देवभूमी उत्तराखंडमध्ये जमीन जिहादच्या नावावर हिंदूंना लक्ष्य केले गेले. अशा बाबांना रोखण्याची आणि कारागृहात डांबण्याची जबाबदारी समस्त हिंदूंची आहे. आज केंद्रात सनातन धर्माविषयी प्रेम आणि कळवळा असणारे सरकार गेल्या ११ वर्षांपासून असल्याने कुठेतही बहुसंख्यकांमध्ये सुरक्षिततेची भावना आहे. सरकार आपल्या परीने कार्य करीत असताना हिंदू धर्मात ज्यांनी सवतेसुभे तयार केले आहेत, त्यांनी आता सनातन रक्षणाची जबाबदारी घेणे आवश्यक आहे. नुसते १२ वर्षांतून एकदा येणाऱ्या कुंभमेळ्यात शक्तिप्रदर्शन करणे आणि त्यानंतर गुमनाम होणे देशाला आणि धर्माला परवडणारे नाही. देशाच्या चार कोपऱ्यांत चार शंकराचार्य हातात धर्मदंड घेऊन नुसतेच बसले आहेत. हिंदू धर्म आणि सनातन संस्कृतीचे संवर्धनात त्यांचे काहीच योगदान सामान्यांना दिसत नाही. एकीकडे इतर धर्मांचे धर्मगुरू आपापल्या धर्माचा प्रसार आणि प्रचारासाठी कार्यरत असताना आपले शंकराचार्य मात्र मठात निद्रावस्थेत आहेत. नुसत्या होमहवनांनी आणि प्रार्थना केल्याने सनातन वाचणार नाही तर गल्लीबोळात जाऊन नागरिकांना विश्वास देणे आवश्यक आहे. स्वत:ला धर्मगुरू, पीठाधीश मानणारे कर्मकांडात गुंतून राहिल्यानेच समाजात छांगुर बाबा तयार होत आहेत. हिंदूंच्या मुलींची धर्मांतरासाठी बोली लावली जात असतानाही जर हे पीठाधीश चवताळून उठत नसतील तर तुमच्या असण्याला काहीच अर्थ उरत नाही.

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# भारतमुक्त नवा 'सार्क'!

'नशा' कशी असते याची एक गोष्ट सांगितली जाते. एकदा एका व्यक्तीने एका मडक्यात हात घातला. तेथे दडून बसलेल्या सापाने त्या व्यक्तीला दंश केला. त्या व्यक्तीने हे दोन-तीन वेळा केले. प्रत्येक वेळी सापाने त्या व्यक्तीला दंश केला. मग त्याला सापाच्या विषाची नशा चढू लागली. ती त्याला आवडू लागली आणि मग ती व्यक्ती दररोज त्या मडक्यात हात घालू लागली. त्यात साप आहे हे माहीत असूनही ती हे करू लागली. हा परिणाम होता त्या व्यक्तीला जडलेल्या सापाच्या विषाच्या नशेचा! त्या नशेसाठी ती व्यक्ती वारंवार मडक्यात हात घालू लागली.

**अमेरिकेची नशा :** अमेरिकेलाही पाकिस्तानसोबत मैत्री करण्याची अशीच नशा जडली आहे. पाकिस्तान कसा आहे- काय आहे हे अमेरिकेला चांगले ठावूक आहे. पण, पाकिस्तानसोबत मैत्री करण्याची नशा जणू अमेरिकेला जडली आहे. अमेरिका पुन्हा पुन्हा पाकिस्तान नावाच्या फुटक्या मडक्यात हात घालून त्या नशेचा आनंद घेत आहे .

**'क्वाड'ची बैठक :** अमेरिका, जपान, भारत, ऑस्ट्रेलिया या चार देशांच्या संघटनेची नुकतीच वॉशिंग्टनमध्ये बैठक झाली. त्यात दहशतवादाच्या विरोधात प्रस्ताव पारित झाला. पहलगामचा उल्लेख करण्यात आला. पण, पाकिस्तानचा उल्लेख करून त्याचा निषेध करण्यास अमेरिकेने नकार दिला.

अमेरिकेच्या इतिहासात या देशावर सर्वांत मोठा दहशतवादी हल्ला करणाऱ्या ओसामा बिन लादेनला पाकिस्तानने आश्रय दिला होता हे माहीत असूनही अमेरिका पाकिस्तानचा निषेध करण्याचे टाळीत आहे. उलट भारत-पाकिस्तान दोघांनाही एकाच पारड्यात टाकून त्यांना समान लेखण्याचे अमेरिकेचे नवे धोरण असल्याचे दिसते. याच अमेरिकेच्या एका राष्ट्रपतींनी- जॉर्ज बुश यांनी, पाकिस्तानने दहशतवादाच्या विरोधात अमेरिकेला सहकार्य न केल्यास त्या देशास 'पाषाणयुगात' पोहोचविण्याची भाषा उच्चारली होती. 'एक तर तुम्ही आमच्या बाजूने आहात वा मग दहशतवादाच्या बाजूने' असा सज्जड दम बुश यांनी दिल्यानंतर पाकिस्तानचे लष्करी शासक जनरल मुर्शरफ यांनी नरमाईची भूमिका घेत, अमेरिकेला सहकार्य करण्याची भूमिका घेतली होती. विशेष म्हणजे बुश व ट्रम्प एकाच रिपब्लिकन पक्षाचे आहेत. आता पुन्हा अमेरिकेला पाकिस्तान हवा आहे. कारण, अमेरिकेला पाकिस्तानसोबत मैत्री करण्याची नशा जडली आहे, ही नशा या देशाला आवडू लागली आहे.



**भारतमुक्त 'सार्क' :** दरम्यान, चीनने भारताविरोधात एक नवा उद्योग सुरू केला आहे. १९८७ मध्ये भारताच्या पुढाकाराने 'सार्क' म्हणजे 'साऊथ एशियन असोसिएशन फॉर रिजनल को-ऑपरेशन' नावाची संस्था स्थापन करण्यात आली. स्व. राजीव गांधी त्यावेळी देशाचे पंतप्रधान होते. अफगाणिस्तान, बांगलादेश, भूतान, भारत, मालदीव, नेपाळ, पाकिस्तान आणि श्रीलंका या आठ देशांनी एकत्र येत परस्पर सहकार्यासाठी सार्कची स्थापना केली होती. मागील काही वर्षांपासून सार्क पूर्णपणे निष्क्रिय आहे.

सार्कच्या घटनेनुसार एखादाही देश सार्क बैठकीला येणार नसेल तर सार्कची बैठक बोलविता येत नाही. भारताने पाकिस्तानसोबत चर्चा न करण्याचे धोरण राबविले आहे. त्यामुळे सार्कची बैठक आयोजिणे शक्य नव्हते. सार्क परिषद ठप्प झाली.

आता चीनची नजर सार्कवर गेली असून, सार्कला सक्रिय करण्यात चीन पुढाकार घेत आहे. अर्थात भारताला डावलून. सार्क देशांपैकी पाकिस्तान, अफगाणिस्तान, बांगलादेश, भूतान, श्रीलंका, नेपाळ, मालदीव हे सातही देश चीनच्या बाजूने गेले आहेत. त्यामुळे भारताला बाजूला करा आणि नवे सार्क स्थापन करा असा प्रयत्न चीनने सुरू केला आहे. अर्थात सार्कऐवजी दुसरे नाव ठेवले जाईल. याला अमेरिकेचाही पाठिंबा असल्याचे म्हटले जाते. दक्षिण आशियात स्थिरता निर्माण करणारा घटक म्हणून पाकिस्तानकडे पाहिले जात आहे. पाकिस्तान स्वत: याचा दावा करीत आहे. ज्या देशात कधी स्थिरता नांदली नाही, त्या देशाला दक्षिण आशियाचा नेता करण्याचे चीनचे स्वप्न आहे. यातील पाकिस्तान, मालदीव, बांगलादेश व अफगाणिस्तान हे चार देश मुस्लिम आहेत हे विशेष. चीनच्या आशीर्वादाने लवकरच हे होण्याची शक्यता आहे. नवा सार्क स्थापन करून भारताला शह देण्याचा प्रयत्न चीन यातून करणार आहे. चीनने हे करावे यात काहीच नवल नाही. भारताने लडाखचे कलम ३५ अ रद्द केल्यापासून चीन जणू बिथरला आहे. त्याचेच परिणाम सध्या दिसत आहेत.

**अमेरिकेचे दुर्दैव :** जार्ज वॉशिंग्टन, अब्राहम लिंकन, थॉमस जेफरसन यासारखे महान व दिग्गज राष्ट्रपती मिळालेल्या अमेरिकेचे दुर्दैव म्हणजे आज या देशाला डोनाल्ड ट्रम्प नावाचा राष्ट्रपती लाभला आहे. ट्रम्प हे स्वत: मोठे उद्योगपती आहेत. आज ते केवळ व्यापाराबाबत बोलत आहेत. चीन आपले हातपाय कसे पसरत आहे याची त्यांना जराही चिंता नाही. अन्यथा त्यांनी पाकिस्तानला चुचकारण्याचे धोरण स्वीकारले नसते. पाकिस्तानी जनरल आसिफ मुनीरसाठी व्हाईट हाऊसमध्ये लाल पायघड्या घातल्या नसत्या.

**नवा भस्मासुर :** चीन व अमेरिका दोघेही पाकिस्तानला साथ देत नवा भस्मासुर तयार करीत आहेत. एक दिवस हा भस्मासुर अमेरिकेसाठी डोकेदुखी ठरणार आहे.

राष्ट्रपती ट्रम्प यांनी आपले एक मित्र एलन मस्क यांना जणू डोक्यावर घेतले होते. त्यांना सरकारमध्ये नियुक्त केले होते. मस्क यांची लहान मुले व्हाईट हाऊसच्या ओव्हल कार्यालयात धुडगूस घालीत आहेत आणि ट्रम्प त्यांच्याकडे कौतुकाने पाहात आहेत अशी छायाचित्रे जगभर प्रसिद्ध झाली. लवकरच ट्रम्प-मस्क यांच्यात वाद होणार हे स्पष्ट दिसत होते. आणि अपेक्षेपेक्षा ते लवकर झाले. आता राष्ट्रपती ट्रम्प, एलन मस्क यांना दक्षिण आफ्रिकेत, या त्यांच्या मायदेशी परत पाठविण्याची भाषा बोलू लागले आहेत.

पाकिस्तानबाबतही अमेरिकेचा पुन्हा भ्रमनिरास होणार आहे. पण, त्यापूर्वी अमेरिकेने व जगाने याची मोठी किंमत मोजलेली असेल. जागतिक राजकारणात अमेरिकेचे पहिल्या क्रमांकाचे स्थान चीनने घेतलेले असेल आणि चीनने पाकिस्तानला डोक्यावर बसविल्याने भारताची डोकेदुखी वाढलेली असेल.

**चीनला आवरण्यासाठी :** चीनला वेसण घालण्यासाठी भारतापेक्षा चांगला मित्र व सहकारी नाही याची कल्पना राष्ट्रपती ट्रम्प यांना असावयास हवी होती. भारत आणि अमेरिका यांची मूलभूत मूल्ये सारखी आहेत. लोकशाही, वृत्तपत्र स्वातंत्र्य, मानवाधिकारांचे संरक्षण व कायद्याचे राज्य या भक्कम मूल्यांवर दोन्ही देशांची अढळ निष्ठा आहे. आणि दुसरीकडे चीन-पाकिस्तान! दोन्ही देशांत हुकूमशाही, लष्कराचे शासन, मानवी अधिकारांचे उल्लंघन, हिंसेचा पुरस्कार.

जगात चीनचे प्रस्थ वाढत असताना, अमेरिकेने पाकिस्तानचेही प्रस्थ वाढविण्याचा प्रयत्न करावा? अमेरिका व ट्रम्प यांनी पाकिस्तानच्या नादी लागावे?

**मर्चंट ऑफ अमेरिका :** एका व्यापाऱ्याकडून यापेक्षा दुसरी कोणती अपेक्षा करता येईल? डोनाल्ड ट्रम्प हे राष्ट्रपती असले तरी ते अमेरिकेच्या इतिहासातील सर्वांत श्रीमंत राष्ट्रपती आहेत. काही दशकांपूर्वी एक इंग्रजी पुस्तक फार गाजले होते, 'मर्चंट ऑफ व्हेनिस'! डोनाल्ड ट्रम्प यांचा इतिहासात उल्लेख 'मर्चंट ऑफ अमेरिका' असाच केला जाईल.

## वेध

पुंडलिक आंबटकर

# सरकारी नोकरीचा अट्टहास कशासाठी?

महाराष्ट्रात बेरोजगारीचा दर कमी होत आहे, ही समाधानाची बाब असली तरी बहुतांश तरुणाईचा कल सरकारी नोकऱ्यांकडे आहे. सध्या राज्यातील बेरोजगारीचा दर ३ टक्क्यांच्या आसपास स्थिरावला आहे. खाजगी क्षेत्रातही अनेक मानाची पदे व भरघोस पगाराच्या नोकऱ्या असतात. परंतु, तरीही बहुतांश उमेदवारांना सरकारी नोकरीच हवी असते. ही कोंडी फोडणे काळाची गरज आहे. पूर्वीच्या तुलनेत प्राध्यापक होण्यासाठी आता वेगवेगळे निकष पूर्ण करावे लागतात. राज्यातील १५ विद्यापीठांमध्ये एकूण २,५३४ प्राध्यापक पदे मंजूर असून १,३६८ पदे भरल्याचे एका अहवालात म्हटले आहे. राज्यात अनुदानित महाविद्यालयांमध्ये प्राचार्यांची ३७० आणि सहायक प्राध्यापकांची २,०८८ पदे रिक्त आहेत. सरासरी विचार केला तर प्राध्यापकांना दरमहा ९०,६२० रुपये पगार मिळतो. काहींना वर्षाला लाखो रुपये मिळतात. मात्र, यातील किती प्राध्यापक आपल्या कामाला न्याय देतात, हा खरा प्रश्न आहे. प्राध्यापकांनी आपले काम राष्ट्रीय कर्तव्य म्हणून पार पाडले तर विद्यार्थ्यांना खाजगी शिकवणी लावण्याची गरज उरणार नाही. अशाही परिस्थितीत काही कर्तव्यदक्ष प्राध्यापक आपल्या पदाला न्याय देतात. प्रसंगी ते विद्यार्थ्यांच्या हितासाठी झटतात आणि अशाच प्राध्यापकांच्या भरवशावर शिक्षण विभागाने कात टाकली आहे. दीड दशकापूर्वीपर्यंत डोनेशनच्या नावावर नोकऱ्या बहाल करण्यात आल्याने गुणवंतांना डावलून दुय्यम उमेदवारांना संधी देण्यात आली. परिणामी, राज्याची आणि पर्यायाने देशाची मोठ्या प्रमाणात सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक हानी झाली. (ही परिस्थिती आजही काही प्रमाणात असू शकेल?) केवळ शिक्षण क्षेत्रातील नोकरदारांना दोष देऊन चालणार नाही. बहुतांश क्षेत्रात अशीच स्थिती आहे आणि ही बाब नाकारणे खूपच धाडसाचे ठरेल!

कृषी क्षेत्रातील अधिकारी-कर्मचाऱ्यांचा संबंध थेट शेतकऱ्यांशी येतो. परंतु, या विभागातील अनेक अधिकारी-कर्मचारी केवळ खुर्चीवर बसून अहवाल तयार करतात. नुकसानग्रस्तांची यादी शेतशिवाराला भेट न देताच तयार करतात. त्यामुळे अनेकदा नुकसानग्रस्तांच्या जागी भलत्याच शेतकऱ्यांना मदतीची रक्कम दिली जाते. तलाठी जनतेचा नोकर असतो. परंतु, या लोकांची शेतकऱ्यांशी वागणूक मालकासारखी असते. सेवाज्येष्ठता ध्यानात घेतली तर तलाठ्यांना भरघोस पगार मिळतो. तरीही हे लोक चार-दोन हजारांत महिना काढणाऱ्या गोरगरीब शेतकऱ्यांकडून शे-पाचशे रुपयांची अपेक्षा करतात! हे चित्र बदलले पाहिजे. त्याशिवाय गावांच्या विकासाची आणि पर्यायाने देशाच्या विकासाची कल्पना करता येत नाही. महाराष्ट्रातील बहुतांश ग्रामपंचायतींच्या निवडणुका शेष असल्याने ग्रामसेवकांच्या हातात दीर्घकाळापासून कारभार एकवटला आहे. परंतु, अनेक ठिकाणचे ग्रामसेवक महिनोमहिने गावात येतच नाही. आठवडी बाजाराच्या दिवशी दोन-तीन तास दिसतात आणि एक दोन फाईल्स पुढे सरकवून निघून जातात! ग्रामसेवकांनाही चांगला पगार मिळतो. सरकारी नोकरदारांना काम कमी असते, असेही नाही. काही विभागांत मनुष्यबळाअभावी कामाचा प्रचंड ताण असतो. जिल्हा परिषदांचे शिक्षक आणि पोलिस प्रशासनातील अधिकारी-कर्मचाऱ्यांना नेहमी अधिक वेळ कामे करावी लागतात. जिल्हा परिषद क्षेत्रात भ्रष्टाचाराचे प्रमाण कमी असले तरी पोलिस प्रशासनात आजही भ्रष्टाचार चालतो. परंतु, आता देशप्रेमी तरुणाईची संख्या पोलिस प्रशासनातही वाढू लागल्याने बऱ्याचअंशी वातावरण निवळू लागले आहे. पूर्वी या क्षेत्रात वशीला आणि पैशांची देवाण-घेवाण केल्याशिवाय नोकऱ्याच मिळत नव्हत्या. त्यामुळे रुजू झाल्यानंतर नोकरीसाठी लागलेला खर्च वसूल करण्याकडे कल असायचा.

आता पोलिस भरतीत पारदर्शकता आल्याने तळागाळातील उमेदवारांना संधी मिळत आहे. त्यामुळे भ्रष्टाचाराचे प्रमाणही कमी होऊ लागले आहे. २०११ च्या जनगणनेत महाराष्ट्राची लोकसंख्या ११.२४ कोटी होती. ती आता १२.८३ कोटींवर गेली आहे. यात तरुणाईची संख्या प्रचंड आहे. त्यामुळे ठरवूनही सर्वांना रोजगार देता येत नाही. त्यामुळेच राज्य सरकारने सुशिक्षित बेरोजगारांसाठी अनेक योजना आणल्या. यापैकी बीज भांडवल ही एक प्रमुख योजना होय. परंतु, तरुणाईला केवळ नोकरी हवी आहे आणि तीसुद्धा सरकारी! देशातील अनेक गुणवंत न्याय मिळत नसल्याने विदेशात जातात. हे उमेदवार गुणवत्ता असूनही विविध सबबींखाली संधी डावलली जात असल्याने विदेशात जातात, ही एक प्रकारची राष्ट्रीय हानीच आहे. त्यामुळे या विषयावर सरकार आणि सामाजिक स्तरावर विचारमंथन होणे गरजेचे आहे.

९८८१७१६०२७

## कानोसा

अमोल पुसदकर

# धर्मांतरण हे राष्ट्रांतरणच

जलालुद्दीन ऊर्फ छांगुर बाबा याला नुकतीच उत्तर प्रदेशमधील बलरामपूर जिल्ह्यातून अटक झाली. आता तपासात असे निष्पन्न झाले आहे की, मागील पंधरा वर्षांपासून हा जलालुद्दीन उत्तर प्रदेशमध्ये धर्मांतरणाचे योजनापूर्वक काम करीत होता. नेपाळमधील वेगवेगळ्या लोकांच्या नावावरील शंभर बँक खात्यांमधून याच्याकडे इस्लामी देशातून ५०० कोटींपेक्षा अधिक रक्कम पाठविण्यात आलेली आहे. यावरून हे स्पष्ट होते की धर्मांतरण करणारे हे गुन्हेगारी प्रवृत्तीचे आहे. यांचा उद्देश आध्यात्मिक प्रगती हा नसून देशामध्ये लोकसंख्येचा असमतोल निर्माण करण्याचा आहे. यांचा उद्देश लोकांना अराष्ट्रीय बनविण्याचा आहे.

स्वामी विवेकानंद म्हणायचे की, ज्या वेळेस एक हिंदू परधर्मात जातो त्यावेळेस हिंदूंची संख्या केवळ एकने कमी होते असे नाही तर हिंदू धर्माचा एक शत्रू सुद्धा वाढतो. आपल्या देशामध्ये धर्मांतरणाचे कार्य करणारे इस्लाम आणि ख्रिश्चन हे दोन धर्म आहेत. या दोन्ही धर्मांना जगामध्ये आपला धर्म व्याप्त करणे हे ईश्वरी कार्य वाटते. त्यासाठी त्यांचे सातत्यपूर्ण प्रयत्न सुरू असतात. मुसलमान कधीच ख्रिश्चन धर्मात जात नाही व ख्रिश्चन लोक सुद्धा फारच अपवादाने मुसलमान धर्मात प्रवेश करतात. एखाद्याने स्वखुशीने इस्लामचा किंवा ख्रिश्चन धर्माचा स्वीकार करणे याबद्दल कोणीही त्यांच्याबद्दल फारसे बोलणार नाही. परंतु भारतामध्ये जे धर्मांतरण सुरू आहे यामध्ये लक्ष्य हिंदू धर्म आहे. हिंदू धर्मातील अनुसूचित जाती व जमातींना नेहमीच लक्ष्य केले जाते.

आमच्या धर्मामध्ये तुम्ही आल्यास तुम्हाला उच्च स्थान प्राप्त होईल असे या जमातींच्या लोकांना सांगण्यात येते. परंतु वस्तुस्थिती मात्र निराळीच आहे. हिंदू धर्मातील अनुसूचित जाती जमातीचे लोक ख्रिश्चन किंवा मुस्लिम धर्मात प्रवेश करतात त्यांना इतर उच्चवर्णीय मुस्लिम किंवा ख्रिश्चनांचा दर्जा मिळत नाही. भारतातून १९४७ साली पाकिस्तानात गेलेला समाज आजही त्यांना मुहाजीर म्हणजे शरणार्थी संबोधले जाते. पंजाबमध्ये सुद्धा ख्रिश्चन धर्मीयांचे धर्मांतरणाचे खूप काम सुरू आहे. एकट्या तरणतारण जिल्ह्यामध्ये ख्रिश्चन धर्मीयांची संख्या १०२ टक्क्यांपेक्षा अधिकने वाढलेली आहे. तिथे शीख धर्मामध्ये जे मागासवर्गीय शीख आहेत त्यांना ख्रिश्चन धर्मामध्ये धर्मांतरित करण्याचे फार मोठे कारस्थान सुरू आहे. परंतु जे ख्रिश्चन भारतामध्ये धर्मांतरणाचे कार्य करीत आहेत त्यांच्या इंग्लंडमध्ये मात्र आग लागलेली आहे व तेथेच अल्पसंख्य होण्याची वेळ त्यांच्यावर येणार आहे. लंडन आणि बकिंगहॅम येथे त्यांच्यावर अल्पसंख्य होण्याची वेळ आलेली आहे. येणाऱ्या काळामध्ये ब्रिटनचा महापौर सुद्धा मुस्लिम होऊ शकतो अशी त्यांच्यावर परिस्थिती आहे. असे असताना सुद्धा या संकटाला न ओळखता ख्रिश्चन मात्र भारतामध्ये धर्मांतरणाचे आपले काम करीत आहे. पंजाबमधील जे लोक धर्मांतरित होत आहेत त्यांच्यावर पाकिस्तानची आयएसआय किंवा खलिस्तानवादी शीख फॉर जस्टिस अशा संघटनांचा डोळा असतो व याच लोकांना भारतविरोधी कारवायांसाठी निवडले जाते. जलालुद्दीन ऊर्फ छांगुर बाबा जे कार्य करीत होता ते कार्य करण्यासाठी त्याला सौदी अरेबिया आणि इतर मुस्लिम राष्ट्रांतील धनाढ्य मुस्लिमांची मदत होती. भारतामध्ये लव्ह जिहाद काही नवीन नाही. भोळ्याभाबड्या अल्पवयीन मुलींना फसवून, त्यांच्यासोबत प्रेमाचे नाटक करून कधी आपली ओळख लपवून त्यांच्याशी लग्न करण्याचे प्रकार घडतात आणि त्यानंतर त्यांना इस्लाम धर्म स्वीकारावा लागतो. अशा पद्धतीने हिंदूंची संख्या मुस्लिम व ख्रिश्चन या दोघांच्याही धर्मांतरणवादी कारवायांमुळे कमी होत आहे. नुकताच जागतिक लोकसंख्या दिवस साजरा करण्यात आलेला आहे. यामध्ये वेगवेगळ्या धर्मांच्या लोकसंख्येचा आढावा घेण्यात आलेला आहे. यामध्ये हिंदूंचा जन्मदर हा स्थिर दाखवण्यात आलेला आहे. तर मुसलमानांच्या जन्मदरामध्ये वाढ झालेली आहे असे प्यु रिसर्च सेंटरतर्फे २७०० सर्वेक्षणांचा अभ्यास करून सांगण्यात आलेले आहे. हिंदूंचा जन्मदर हा आता खूप कमी होत चाललेला आहे म्हणजे तो ६.१८ वरून १.२९ इतका कमी झालेला आहे. सुशिक्षित जोडप्यांचे विचार मुलं होऊ देण्याबाबत सकारात्मक नाही. त्यामुळे येणाऱ्या काळामध्ये जगातील इतर देशांसारखा भारत हा सुद्धा वृद्धांचा देश होईल का असाही प्रश्न आहे. हिंदू अल्पसंख्य होतील का असाही प्रश्न आहे.

मागील जून महिन्यात सांगली येथील ऋतुजा नावाच्या विवाहित गरोदर महिलेने आत्महत्या केली. तिचे आत्महत्या करण्याचे कारण काय होते, तर ज्या परिवारामध्ये तिचा विवाह लावून देण्यात आला होता त्या लोकांनी आम्ही हिंदू धनगर आहोत असे सांगितले. परंतु लग्नानंतर ऋतुजाच्या लक्षात आले की हे लोक धर्मांतरित झालेले ख्रिश्चन आहेत. तिच्या सासरच्या लोकांनी तिच्या हिंदू धर्मातील देवी-देवतांच्या पूजेला विरोध केला व तिला जबरदस्तीने चर्चमध्ये जाणे, बायबल वाचणे इत्यादी गोष्टींची सक्ती केली. तिने हे आपल्या आई-वडिलांना सांगितले. शेवटी ज्यावेळेला तिच्यावरचा धर्मांतरणासाठीचा दबाव वाढत गेला त्यावेळेस सात महिन्यांची गरोदर असताना सुद्धा तिने आत्महत्या केली.

म्हणूनच आपण हे समजून घेतले पाहिजे की भारतात चालणारे धर्मांतरण हे आध्यात्मिक परिवर्तन नाही तर हे राष्ट्रांतरणाचे षडयंत्र आहे. लोकसंख्येचा असमतोल निर्माण करून या देशांमध्ये इस्लामी राजवट निर्माण करता येईल असे काही लोकांना वाटते. मणिपूर, नागालँड, मिझोरमसारख्या प्रदेशांमध्ये जिथे मोठ्या प्रमाणावर ख्रिश्चनीकरण झालेले आहे, तिथे त्यांच्या निष्ठा या भारत सरकारबद्दल कमी व भारताबाहेरच्या लोकांप्रति जास्त असतात. पंजाबमध्ये कार्य करणारी शीख फॉर जस्टिस ही खलिस्तानवादी संघटना मणिपूरच्या लोकांना सुद्धा भारत सरकारविरुद्ध भडकवण्याचे कार्य करीत असते. इस्लामी दहशतवाद तर आपल्याला माहीतच आहे. याच दहशतवादामुळे व लोकसंख्येच्या असमतोलामुळे भारताचे विभाजन झाले व पाकिस्तानचा जन्म झाला. ९० च्या दशकामध्ये काश्मीरमधून याच लोकसंख्येच्या असमतोलामुळे व जिहादी प्रवृत्तींमुळे तेथील तीन लाख काश्मिरी हिंदूंना भारताच्या इतर प्रांतांमध्ये आश्रय घ्यावा लागला होता. गैरहिंदू लोकांची संख्या वाढल्यामुळे भारताच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होत आहे. त्याचबरोबर भारताची धार्मिक, सांस्कृतिक, ओळख सुद्धा समाप्त होऊ शकते. एकीकडे हिंदू संतती नियमन करतो आहे आणि दुसरीकडे धर्मांतरणाच्या माध्यमातून हिंदू परधर्मात चाललेले आहेत. याचा परिणाम एकगठ्ठा मतदानावर सुद्धा होतो व अहिंदू लोक आपल्या पसंतीचे राष्ट्रीय विचारांच्या विरोधात जाणारे सरकार सुद्धा निवडून आणू शकतात. अहिंदू लोकांची संख्या वाढणे म्हणजे भारतामध्ये कोण पंतप्रधान होणार हे सुद्धा भविष्यात हे लोक ठरवू शकतील. हा देश बायबलच्या नियमानुसार चालणार की शरीयतनुसार चालणार हे सुद्धा हे लोक ठरवतील. हा भारतातल्या शांतताप्रिय परंतु बेसावध व झोपाळू हिंदू समाजासाठी मोठा धोक्याचा इशारा आहे.

हिंदूंनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, धर्मांतरणाचे कार्य हे राजकीय आहे. त्यांना तुमची आध्यात्मिक प्रगती करायची नसून तुमचा देश हस्तगत करायचा आहे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### आपण खाये वांगे, अन् चातुर्मास सांगे

मुंबईच्या वरळी येथे उबाठाचे उद्धव ठाकरे आणि मनसेचे राज ठाकरे यांनी 'विजयी' सभा आयोजित केली होती. या सभेला प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांनी जरा जास्तच प्रसिद्धी दिली असे वाटते. कारण या दोन्ही पक्षांची महाराष्ट्रात 'एक्सपायरी डेट' केव्हाचीच संपलेली आहे. पक्षाचे अस्तित्व टिकविण्याचा हा त्यांचा केविलवाणा प्रयत्न आहे. जनतेने सपशेल नाकारलेले हे दोन्ही नेते एका साध्या विषयाला विजय मानत आहे. विधानसभेत उद्धव यांच्या उबाठाचे २० आमदार, तर राजच्या मनसेला भोपळाही फोडता आला नाही. खुद्द राज ठाकरे आपल्या मुलाला मुंबईतून आमदार म्हणून निवडून आणू शकले नाही. यावरून या पक्षाची मुंबईत किती ताकद आहे ते कळते. यांची मुलं, नातवंडं इंग्रजी माध्यमांच्या शाळात शिकणार तरी हे आम्ही मराठीचे कसे रक्षणकर्ते आहोत ते सांगणार हा प्रकार म्हणजे 'आपण खाये वांगे, अन् चातुर्मास सांगे' असा आहे. मुंबई महापालिकेच्या येत्या निवडणुकीत सत्ता जाण्याचा, मुंबई म्हणजे हे आपली जहांगिरी समजतात काय? यांनी एकत्र येऊन मुंबईत ठिकठिकाणी कितीही राजकीय पथनाट्ये केली, कितीही भावनिक साद घातली तरीही हे सत्तेत येणे नाही.

**गजेंद्र डोळके**/नागपूर

●● ●●

### आरोग्यदायी चातुर्मास

चातुर्मास (चार मासांचा कालावधी) हा हिंदू धर्मात खूप पवित्र आणि महत्त्वाचा मानला जातो. हा काळ आषाढ शुद्ध एकादशी म्हणजे देवशयनी एकादशीपासून सुरू होतो आणि कार्तिक शुद्ध एकादशी म्हणजे प्रबोधिनी एकादशीपर्यंत चालतो. इंग्रजी महिन्यानुसार जुलै ते नोव्हेंबर सुमारे चार महिने असतो.

आषाढ शुद्ध एकादशीला भगवान श्रीविष्णू क्षीरसागरात शयन करतात. हा काळ चार महिन्यांचा असतो आणि कार्तिक शुद्ध एकादशीला ते पुन्हा जागृत होतात. या काळाला 'देवशयन' आणि 'देव जागृती' यामध्ये विभागले जाते. या काळात वातावरणात खूप रजतम वाढलेले असते. म्हणूनच चातुर्मासात, सण व्रतवैकल्ये उपासतापास, ग्रंथांचे पारायणे केली जातात. अनेक जण या काळात व्रत, नियम, संकल्प, उपवास करतात. चातुर्मासामध्ये धार्मिक कथा, प्रवचन, हरिपाठ, कीर्तन, भजन यांचे आयोजन केले जाते. चातुर्मासाचे आध्यात्मिक सोबत आरोग्यादायी सुद्धा महत्त्व आहे. पावसाळ्यात शरीरातील अग्नी मंदावतो. पचनशक्ती कमी झालेली असते. त्यामुळे वातुळ, जड पदार्थ खाल्ल्याने ते शरीराला हानिकारक ठरतात. त्यामुळे या काळात कांदा, लसूण, तेलकट पदार्थ, दही, जड पदार्थ टाळतात. उपवास, एकादशी व्रतांचे पालन केले जाते. वाईट सवयींवर संयम ठेवला जातो. या काळात सात्त्विक आणि हलका आहार घेतला जातो. चातुर्मासात साधुसंत एका ठिकाणीच स्थिर राहून प्रवचन, ध्यान, उपासना करतात. सत्संग, हरिपाठ, भजन-कीर्तनात सहभागी होणे, नामस्मरण करणे, साधना करणे, आध्यात्मिक उन्नतीसाठी फायद्याचे ठरते.

चातुर्मास म्हणजे केवळ एक धार्मिक परंपरा नसून, तो आपल्या मन, शरीर आणि आत्म्याच्या शुद्धीकरणासाठी हिंदू धर्माने दिलेली एक सुवर्णसंधी आहे.

**रेवती मुकुंद भोपी**/खामगाव

●● ●●

### परिवर्तनीय कायदा

कायदे बनताना तात्कालिक परिस्थिती लक्षात घेऊन भविष्यवेधाची कारणमीमांसा आणि त्यावर उपाय आणि शिथिल करण्याची तरतूद याच्याही नोंदी महत्त्वाच्या आहेत. पहिल्या पंचवार्षिक योजनेत कुळ कायदा अमलात आणताना त्याचा फटका अल्प भूधारक शेतकऱ्यांना बसला आणि ज्यांनी कुळ नाकारले तरी त्यांचे नावे कुळ सात-बारावर आजही असणे म्हणजे कायद्याचा हा दुरुपयोग आणि सामाजिक अप्रतिष्ठेचा कारण ठरतो. या अधिवेशनात तुकडाबंदी कायदा रद्द झाल्याने अल्पभूखंडाची खरेदी-विक्री करणे सोपे झाले असली तरी जुन्या कायद्यातील कारणमीमांसा का करण्यात आली नाही? की हा बिल्डरांच्या फायद्याचा बनाव तर नाही? कारण महसूल कायद्यान्वये एक हेक्टरच्या आतील जमीन ही तुकडाबंदी कायद्यांतर्गत आहे. संयुक्त कुटुंबात ही तुकडाबंदी हिस्सा वाटणीस अडचणीची होती आणि आजोबाच्या नावावरील सात-बारावर नातू शेतकरी शेती करीत आहेत. महसूल कायदा बनविताना त्याची कारणमीमांसा लोकांना माहीत असणे गरजेचे आहे. कारण उठसूट कायद्याला न्यायालयात आव्हान देणारे महाभाग या देशात आहेत. आताच मंजूर झालेला जनसुरक्षा कायदा हा न्यायालयाच्या उंबरठ्यावर आहे, जसे निस्तार हक्क कायदा १९६६, पेसा कायदा १९९६ आणि वनहक्क कायदा २००६. यामुळे सामाजिक अनुकूल व प्रतिकूल परिणाम यांची जाणीव ठेवून होणारा राष्ट्रीय सद्भाव जोपासला जाणे ही कायद्याची अंमलबजावणी असावी.

**वि. ल. उईके**/८२७५५२८०१६

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

## महत्वाचे...

## रोटरी क्लब ऑफ सोलापूर एमआयडीसी अध्यक्षपदी कमटम, कुंटला सचिव


**सोलापूर, दि. १३ जुलै-**

अक्कलकोट एमआयडीसी येथील रोटरी क्लब ऑफ सोलापूरच्या अध्यक्षपदी रमेश कमटम व सेक्रेटरी काशिनाथ कुंटला यांची निवड झाली. सन २०२५-२६ सालाकारिता ही निवड सर्वानुमते करण्यात





आली. शुक्रवारी १८ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता अक्कलकोट रोड एमआयडीसी येथील टीडीएफ हॉलमध्ये माजी प्रांतपाल मोहन देशपांडे व उपप्रांतपाल ज्योती चिडगुपकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पदग्रहण सोहळा होणार आहे. अन्य पदाधिकारी याप्रमाणे : उपाध्यक्ष व प्रेसिडेंट इलेक्ट नरसिम्हा कनकी, सहसचिव - श्रीनिवास नंदाल,खजिनदार -नरहरी कौकुंटला, आयपीपी - अंबादास गड्डम, क्लब लर्निंग फॅसिलीटीटेटर - चार्वाक बुर्गूल, पब्लिक इमेज डायरेक्टर सत्यनारायण गुर्रम सार्जंट ॲट आर्म्स - व्यंकटेश मेरगू, संचालक- सदानंद चिंता, श्रीनिवास बिंगी, व्यंकटेश बिटला, शेखर चिट्याल, अनिल गुजराती, महेश घोडके, श्रीनिवास कटकुर, कालिदास माणेकरी, श्रीनिवास इट्टम, श्रीनिवास शेराल, स्वामीनाथ कलशेट्टी, , नागनाथ बुरा, लत्ता चन्ना, गिता जक्कन, नवनाथ इंदापुरे, बुच्चय्या गुंडेटी, मासिक संपादक गणेश इराबत्ती, गोवर्धन चव्हाण.



नॅशव्हिल एससी विरुद्धच्या मेजर लीग फुटबॉल सामन्याच्या उत्तरार्धात गोल करताना इंटर मियामीचा लियोनेल मेस्सी

## मेस्सीचे सलग पाचव्या सामन्यात गोल

**फोर्ट लॉडरडेल, १३ जुलै-**

इंटर मियामिचा स्टार फुटबॉलपटू लियोनेल मेस्सीने सलग पाच सामन्यात गोल करण्याचा पराक्रम केला. मेस्सीच्या या विक्रमी काम गिरीच्या बळावर इंटर मियामी संघाने नॅशव्हिल स्पोर्ट्स क्लबवर २-१ असा विजय नोंदविला. या विजयाबरोबरच इंटर मियामीने नॅशव्हिल एससीची १५ सामन्यांची अपराजित मालिका खंडित केली. इंटर मियामीने (११-३-५) सलग पाचवा सामना जिंकला आणि दुसऱ्या सलग हंगामात जेतेपद जिंकण्याचे ध्येय ठेवून सपोर्टर्स शील्ड क्रमवारीत पाचव्या स्थानावर झेप मारली. बुधवारी न्यू इंग्लंड रिव्होल्यूशनवर मियामीच्या विजयात दोन गोल केल्यानंतर मेस्सीने शनिवारी मेजर लीग सॉकरच्या इतिहासात सलग चार बहु-गोल सामन्यांसह एकमेव खेळाडू म्हणून प्रवेश केला.३८ वर्षीय खेळाडूने १७ व्या मिनिटाला फ्री किकवर गोल करून सुरुवात केली. त्यानंतर उत्तरार्धाच्या सुरुवातीला नॅशव्हिलने बरोबरी साधल्यानंतर, मेस्सीने ६२ व्या मिनिटाला एक गोल करून आपल्या संघाला पुन्हा अव्वल स्थानावर आणले. या हंगामात मेस्सीने १६ एमएलएस सामन्यांमध्ये १६ गोल केले असून त्याने नॅशव्हिलच्या सॅम सरिज (२१ सामन्यांमध्ये १६ गोल) याच्या कामगिरीशी बरोबरी साधली आहे.

# राज्यात ३२८ मद्यविक्री परवान्यांची खिरापत?

### महसूलवाढीसाठी सरकार अनकुल

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि. १३ जुलै-**

महसूल वाढीसाठी राज्य सरकारने गेल्या ५० वर्षांपासून स्थगिती असलेल्या मध्य विक्री परवान्यांवरअसलेली स्थगिती उठवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यातर्गत ३२८ नवीन वाईन शॉप परवाने लवकरच जारी करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे विदेशी मद्यनिर्मिती परवाने देण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली एक समिती स्थापन करण्यात येणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हे ३२८ नवे परवाने थेट दुकानांना नव्हे, तर कंपन्यांना दिले जाणार आहेत. प्रत्येक कंपनीला ८ परवाने मिळणार असून, हे परवाने भाड्याने देण्याची परवानगीही असेल. या परवाना वितरणासाठी स्थापन होणाऱ्या समितीत अजित पवार यांचा सम विशे आहे. मात्र, कॅपोव्हिटेज या मद्यनिर्मिती कंपनीच्या संचालकपदी जय पवार असल्याने हितसंबंधाचा मुद्दा उपस्थित होऊ शकतो, असा आरोप विरोधकांनी केला आहे.



राज्यात ३२८ नवे मद्यविक्री परवाने दिले जाणार आहेत. हे परवाने दुकानांना नव्हे तर कंपन्यांना दिले जाणार आहेत. प्रत्येकी एका कंपनीला मद्यविक्रीचे ८ परवाने दिले जातील. राज्यावर हजारो कोटीचे कर्ज असताना विधानसभा निवडणुकीत गेम चेंजर ठरलेल्या लाडकी बहिण योजनेसाठी निधी देताना अन्य खात्याचा निधी वळविला जात आहे. त्यामुळे संबंधित मंत्र्याकडून ओरड सुरु आहे. त्यामुळे सरकारने राज्याचा महसूल वाढवण्यासाठ विविध प्रयत्न केले जात आहेत. त्याचाच महत्वाचा भाग म्हणून वाईन शॉप साठी परवाने देण्याचा निर्णय हे घेण्यात येणार आहे. तसेच राज्यात जुना मद्यविक्री परवाना विकत घेण्यासाठी १० कोटी रुपये मोजावे लागणार आहेत. तर नवीन परवाना घेण्यासाठी कंपन्यांना राज्य सरकारला एक कोटी रुपये द्यावे लागणार आहेत. तसेच विदेशी मद्यनिर्मिती परवाने देण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाचे मंत्री असलेल्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली एक समिती स्थापन करण्यात आली आहे. सरकारच्या या धोरणबाबत विरोधकांकडून सरकारवर टीकेची झोड उठवली राष्ट्रवादी शरद पवार गटाचे मुख्य राष्ट्रीय प्रवक्ते आ. जितेंद्र आव्हाड म्हणाले की, 'लाडक्या बहिनींच्या नावाखाली त्यांचा संसार उद्धवस्त करण्यचा काम सुरू आहे. या सरकारला सत्तेची मस्ती असून बहिनींना पैसे देण्यासाठी त्यांच्या पती, भाऊ यांना बेवडे करण्याचं काम सुरू आहे. महाराष्ट्र वारकऱ्यांचा, साधू संतांचा आहे की बेवड्यांचा आहे? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. ठाकरे गटाचे नेते खा. संजय राऊत म्हणाले की, एका भुमरेचे घरात ७,८ मद्य विक्रीचे परवाने दिले आहेत.ठराविक जणांना त्याचे वाटप केले जात आहे.



## आनंद मार्ग आश्रम जुळे सोलापूर येथे वृक्षारोपण

**सोलापूर, दि. १३ जुलै-**

आनंद मार्ग आश्रम जुळे सोलापूर येथे वृक्षारोपण करण्यात आले. सोलापूर महानगरपालिका शिक्षण विभागाचे केंद्रप्रमुख व मुख्याध्यापक परमेश्वर सुतार, महिला व बालकल्याण पर्यवेक्षक अधिकारी नितीन जाधव आचार्य व पर्यावरण दूत डॉ. मनोज देवकर, डॉ लब्बा व आनंद मार्ग भक्तवर्ग श्री नारायणकर व शिक्षक वर्ग यांच्या उपस्थितीत वृक्ष लागवड झाली.

यापूर्वी या भागात २५ झाडे लावलेली आहेत. उर्वरित २५ झाडे लावण्यास सुरुवात झालेली आहे. सर्व देशी वृक्ष लागवड होत आहे. रोपामध्ये बकुळी, नारळ, बिट्टी फुलांची व फळझाडे लावण्यात येत आहेत.



## सामाजिक समस्येवर नाटक सादर करणारे राजा बागबान : डॉ. दलाल

**सोलापूर, दि. १३ जुलै-**

येणाऱ्या काळात समाजात जे लोकांसमोर जे समस्या निर्माण होणार आहे त्या अनुषंगाने नाटक सादर करणारे हे राजा बागबान आहे. त्यांनी आपल्या जीवनात एक उत्कृष्ट अभिनेता, नाटककार, दिग्दर्शक, लेखक या रूपात उर्दू, हिंदी आणि मराठी या तिन्ही भाषेत आपले नाटक सादर करून लोकांमध्ये जनजागृतीचे कार्य करण्याचा प्रयत्न केला म्हणूनच त्यांना राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय वेगवेगळ्या क्षेत्रात पुरस्कार मिळाले आहे, असे उद्गार सोलापूर बागबान जमातचे अध्यक्ष डॉ. एम. ए. दलाल यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले.

राजा बागबान यांना उर्दू, मराठी, हिंदी रंगभूमीच्या संवर्धनासाठी त्यांनी दिलेल्या उत्कृष्ट सेवेबद्दल ''व्होग थिएटर मुंबई''कडून ''लाइफटाइम अचिव्हमेंट अवॉर्ड २०२५'' प्रदान करण्यात आला. त्यानिमित्त सोलापूर उर्दू घर सांस्कृतिक समितीतर्फे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी सोशल महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. एम.ए. दलाल, प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ नाटककार प्रा. बी. एच. करजगी, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद उप नगरीय शाखा सोलापूरचे अध्यक्ष विजय दादा साळुंके, ज्येष्ठ नाट्यलेखक शिरीष देखणे, सत्कारमूर्ती राजा बागबान आदी उपस्थित होते.

उर्दू घरचे सदस्य डॉ. शफी चोबदार यांनी प्रास्ताविक केले. सदस्या डॉ. सुमैय्या बागबान यांनी राजा बागबान यांनी केलेल्या कार्यावर प्रकाश टाकला. यावेळी पानगल हायस्कूलचे मुख्याध्यापक डॉ. हारून रशीद बागबान, ज्येष्ठ साहित्यिक अय्युब नल्लामंदू, ग्रंथपाल जाफर बांगी यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी उर्दू घरचे सदस्य मो. अय्याज शेख, अ. मजीद शेख, सरफराज बल्लोलखान, ग्रंथपाल साहिर नदाफ, मो. इक्बाल बागबान, पथनाट्य रंगकर्मी अशुतोष नाटकर, शरीफ इंडीवाले, महेबुब कुमठे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेमूद नवाज यांनी केले. सरफराज बल्लोलखान यांनी आभार मानले.



### कारवाईनंतरही अतिक्रमण...

**सोलापूर :** विजापूर रोडवरील फुटपाथवरील भाजी विक्रेत्यांवर वारंवार कारवाई करूनही पुन्हा अतिक्रमण दिसून येत आहे. पालिकेचा अतिक्रमण विभाग ठप्प झाले आहे का?, असा नागिरकांतून सवाल होत आहे.



## मोहरम कमिटीतर्फे पोलीस आयुक्त, उपायुक्तांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जुलै-**

मोहरम कमिटीच्या वतीने मोहरम आषाढी एकादशी सण उत्साहात, शांततेत पार पाडल्याबद्दल पोलीस आयुक्त एम. राजकुमार, नूतन पोलीस उपायुक्त गौहर हसन, पोलीस उपायुक्त विजय बकाडे यांचा सत्कार कमिटीचे अध्यक्ष हाजी मकबुलसो मोहोळकर यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी शाह इक्बाल दुर्वेश, सय्यद अहमद काझी, रफिक मोहोळकर, असमी हिरापुरे, सियान मोहोळकर उपस्थित होते.


## तिरंगी मालिकेसाठी न्यूझीलंडचा टी-२० संघ जाहीर

**ख्राइस्टचर्च :** हरारे येथे सोमवारपासून प्रारंभ होणाऱ्या झिम्बाब्वे आणि दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या आगामी तिरंगी मालिकेसाठी न्यूझीलंडचा टी-२० संघ जाहीर करण्यात आला आहे. न्यूझीलंडच्या टी-२० संघात डेव्हॉन कॉनवे, मिच हे, जिमी नीशम आणि टिम रॉबिन्सनचा समावेश करण्यात आला आहे. यष्टिरक्षक-फलंदाज कॉनवे संपूर्ण टी-२० मालिकेसाठी फिन ॲलनची जागा घेईल. ॲलनला दुखापतीमुळे वगळण्यात आले. अमेरिकेत झालेल्या मेजर लीग क्रिकेट स्पर्धेत सॅन फ्रान्सिस्को युनिकॉर्न्सकडून खेळताना ॲलनला पायाची दुखापत झाली, असे न्यूझीलंडचे मुख्य प्रशिक्षक रॉब वॉल्टर म्हणाले. सोमवारी यजमान झिम्बाब्वे आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील सामन्याने या तिरंगी मालिकेला सुरुवात होईल. बुधवारी न्यूझीलंडचा तिरंगी मालिकेतील पहिला सामना दक्षिण आफ्रिकेशी होईल.

# शिंदे गटाच्या पाच मंत्र्यांची एसआयटी चौकशी करा

### संजय राऊत यांची मागणी

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि. १३ जुलै-**



आयकर विभागाची नोटीस आणि बेडरूममध्ये नोटाची बंडले असलेल्या व्हिडीओमुळे वादाच्या भोवऱ्यात सापडलेल्या राज्याचे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांच्यासह एकनाथ शिंदे गटाच्या पाच मंत्र्यांनी मोठा भ्रष्टाचार केला आहे. या सर्वांची एसआयडी नेमून किंवा न्यायालयीन चौकशी करावी, अशी मागणी ठाकरे गटाचे नेते खा. संजय राऊत यांनी रविवारी केली.

संजय राठोड, संदिपान भुमरे, संजय शिरसाट, उदय सामंत, योगेश कदम यांच्यावर त्यांनी आरोप केले आहेत. दोन दिवसापूर्वी राऊत यांनी शिरसाट यांचा यांचा एक व्हिडिओ ट्विट केला होता. त्यामध्ये शिरसाट हे बनियनवर बेडवर असलेले असून बाजूला त्यांचा कुत्रा आणि नोटांनी भरलेली बॅग दिसत आहे. त्याबाबत सर्व स्तरावरून टीकेची झोड उठत असताना मंत्री शिरसाट यांनी हा व्हिडिओ मार्फ केला असल्याचा आरोप करीत याबाबत राऊत यांच्यावर अब्रुनुकसानीचा दावा करणार असल्याचे म्हटले आहे. त्याबाबत प्रत्युत्तर देताना राऊत म्हणाले की, तो व्हिडिओ मार्फ केला की काय केले, ते फॉरेन्सिक लॅब ठरवणार आहे. त्यासंदर्भात विधानसभेत वक्तव्य येऊ द्या, मी विरोधी पक्षनेता आणि एका वर्तमानपत्राचा संपादक आहे. त्यांचे उघड करणे हे माझे कर्तव्य समजतो. अब्रूनुकसानीच्या दाव्याला आपण भीक घालत नाही, असल्या अनेक प्रकरणाना सामोरे गेलेलो आहे. शिरसाट यांच्यासह शिंदे गटाच्या अन्य चार मंत्र्यांच्या भ्रष्टाचाराची प्रकरणे आपल्याकडे आहेत. मुख्यमंत्र्यांनी धाडस दाखवून याबाबत या पाच मंत्र्यांची एसआयडीची स्थापना करून किंवा न्यायालयीन चौकशी करावी, असे सांगून ते म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेल्या १२ किल्ल्यांना युनेस्कोने जागतिक वारसा स्थळांचा दर्जा दिला आहे. ही अभिमानास्पद बाब आहे. मात्र त्याबाबत भाजपाकडून सोहळे साजरे करून श्रेय घेण्याचा प्रयत्न केला जात आहे वास्तविक यापूर्वी महाराष्ट्रातील वस्तूंना जागतिक वारसाचा दर्जा मिळाला नाही का? तुम्ही ते किल्ले बांधले आहेत का? यासंदर्भात राजकारण करु नका, असे सांगितले.

### धारावीच्या माध्यमातून भूखंड घोटाळा

मुंबई लुटली जात आहे. मुंबईतील मराठी माणसाला हद्दपार केले जात आहे. मराठी माणसाला येथून हाकलले जात आहे. मुंबई तोडण्याचे कारस्थान आहे. धारावी त्याचे उदाहरण आहे. आज उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असते तर त्यांनी धारवीतील प्रकल्पाला स्थगिती दिली असती. त्या ठिकाणी भ्रष्टाचार आहे. धारावीच्या निमित्ताने मुंबईत भूखंड घोटाळा झाला आहे. भ्रष्टाचारास मुक्त रान देणारे जे जे प्रकल्प होते, त्यालाही आम्ही स्थगिती दिली असती. शक्तीपीठ महामार्गालाही आम्ही स्थगिती दिली असती. हा रस्ता उद्योगपती अदानी यांच्यासाठी तयार होत आहे. कारण हे सर्व प्रकल्प अदानी यांच्यासाठी केले जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

## आयसीसी अध्यक्ष जय शाह यांच्याकडून स्टार्कचे कौतुक

**दुबई, १३ जुलै**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष जय शाह यांनी ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्कचे १०० कसोटी सामन्यांच्या टप्पा गाठल्याबद्दल अभिनंदन केले आणि म्हटले की २०११ मध्ये पदार्पण केल्यानंतरही डावखुरा वेगवान गोलंदाज त्याच्या खेळात अजूनही अव्वल आहे.

रविवारी सबिना पार्क येथे वेस्ट इंडीजविरुद्धच्या तिसऱ्या कसोटी सामन्यात मैदानात उतरताना स्टार्क १०० कसोटी सामने खेळणारा १६वा ऑस्ट्रेलियन आणि ग्लेन मॅकग्रा यांच्यासोबत हा विक्रम करणारा दुसरा ऑस्ट्रेलियन वेगवान गोलंदाज ठरला. 'ऑस्ट्रेलियाच्या मिचेल स्टार्कचे १०० कसोटी सामने खेळल्याबद्दल अभिनंदन, ही कोणत्याही क्रिकेटपटूसाठी मोठी कामगिरी आहे पण वेगवान गोलंदाजासाठी त्याहूनही मोठी कामगिरी आहे. २०११ मध्ये कसोटी सामन्यांमध्ये पदार्पण झाले होते आणि तो अजूनही त्याच्या खेळाच्या अव्वल स्थानावर आहे, असे शाह यांनी एक्स वर शेअर केले. मिचेल स्टार्क १०० कसोटी सामने जिंकणाऱ्या १५ इतर ऑस्ट्रेलियन खेळाडूंच्या गटात सामील झाला आहे. तो एकूण १५ वा वेगवान गोलंदाज बनला - ज्यामध्ये जॅक कॅलिस आणि बेन स्टोक्स सारख्या अष्टपैलू खेळाडूंचा समावेश आहे - ज्याने १०० कसोटी बळी आणि १०० कसोटी सामने खेळण्याचा दुहेरी टप्पा गाठला.

स्टार्कने त्याच्या कारकिर्दीच्या १४ व्या वर्षात १०० वा कसोटी सामना गाठला, डिसेंबर २०११ मध्ये न्यूझीलंडविरुद्ध पदार्पण केले. तेव्हापासून, त्याने ऑस्ट्रेलियाच्या १४१ कसोटी सामन्यांपैकी ९९ सामन्यांमध्ये खेळले आहे, २७.३९ च्या सरासरीने आणि ३९५ बळी घेतले आहेत. या वेगवान गोलंदाजाला १०० कसोटी सामन्यात ४०० बळी पूर्ण करण्यासाठी आणखी चार बळींची आवश्यकता आहे ज्यामुळे तो हा दुहेरी टप्पा गाठणारा आठवा वेगवान गोलंदाज होईल.

### जाहीरात प्रसिध्दीकरण

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक नियम) २०१४ मधील तरतुदीनुसार सोलापूर जिल्ह्यातील क वर्गातील सहकारी संस्थेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी निवडणूक कार्यक्रमाचे जाहीर प्रसिध्दीकरण करण्यांत येत आहे.

**निवडणूक कार्यक्रम प्रसिध्दी**

| अ. क्र. | सहकारी संस्थांची नांवे |
|---|---|
| १ | श्री कल्याणराव पवार ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या पोफळज, ता. करमाळा, जि. सोलापूर |
| २ | लोकनेते स्वर्गीय दिगंबररावजी बागल नागरी सहकारी पतसंस्था मर्या करमाळा, ता. करमाळा, जि. सोलापूर |

**वरील संस्थांची निवडणूक कार्यक्रम**

| अ. क्र. | नामनिर्देशन पत्र विक्री व दाखल करण्याचा शेवटचा दिनांक | नामनिर्देशन पत्र छाननी दिनांक | नामनिर्देशन पत्र माघार दिनांक | मतदान दिनांक | मतमोजणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | दि.१४/०७/२०२५ ते १८/०७/२०२५ | दि २१/०७/२०२५ | दि०५/०८/२०२५ | दि.१६/०८/२०२५ | दि.१६/०८/२०२५ |

**टीप :-** उपरोक्त निवडणूक कार्यक्रम तालुका निवडणूक अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, करमाळा ता. करमाळा जि. सोलापूर, यांचे कार्यालय, व संस्थेचे कार्यालय यांचे नोटीस बोर्डावर रितसर प्रसिध्द करण्यांत आलेला आहे याची नोंद घेण्यांत यावी.

**सही /-**
**(एम.एल.शिंदे)**
**तालुका सहकारी निवडणूक अधिकारी, तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, करमाळा ता. करमाळा जि. सोलापूर.**

### पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर

**ई- निविदा सूचना क्र.०१ सन २०२५-२६**

नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) योजने अंतर्गत पंढरपूर शहर मलनिस्सारण प्रकल्प टप्पा क्र. ०४ या कामाची निविदा पंढरपूर नगरपरिषदे कडून मागविण्यात येत आहे. या कामाची अंदाजित किमंत रु. ९७,८६,८८,१४४ असून कामासंबंधीचा सविस्तर तपशील www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. यापुढील सर्व सुचना व शुध्दीपत्रके इत्यादी वरील संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

दिनांकः १४/०७/२०२५

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, पंढरपूर**

### खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः खांडवी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील व आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :

डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे खांडवी हद्दीतील शेतजमीन याचा गट नं.४९३/१० चे क्षेत्र १ हे.६० आर, आकार ३ रु.२० पैसे यासी चतुःसिमाः पुर्वेस- गट नं.४४४, दक्षिणेस - गट नं. ४९५, पश्चिमेस गट नं. ४९३/९, उत्तरेस- रावसाहेब गव्हाणे यांची जमीन येणेप्रमाणे चतुः सिमापुर्वक शेतजमिन आतील सर्व झाडझुडूपे वगैरे सर्व तदंगभुत वस्तुसह व वहिवाटीचे हक्कासह.

उपरोक्त वर्णन केलेली शेतजमीन ही रेणूका बाजीराव पाटील यांची मालकी व कब्जेवहिवाटीची होती व आहे व आजरोजी प्रत्यक्ष मालकी हक्कात व कब्जेवहिवाटीत आहे. विद्यमान मालकांनी सदरची शेतजमीन त्यांचे कायदेशीर गरजेपोटी विक्रीस काढलेली आहे. सदर शेतजमीन मिळकत खरेदी घेण्याबाबत आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्या दरम्यान सदर शेतजमीनी मिळकतीबाबत खरेदी घेणेबाबत बोलणे झालेले असून खरेदी देणाऱ्यांनी आमचे अशिलाकडून इसार म्हणून काही रक्कमेचा मोबदला स्वीकार केलेला आहे. सदर शेतजमीन मिळकत निर्वेध, निजोखमी, बिनबोजाची खरेदी देण्याची ग्वाही व भरवसा शेतजमीन मालकांनी आमच्या अशिलास दिलेला आहे.

तरी वर नमुद शेतजमीनीवर कोणाचा हक्क अधिकार, हितसंबंध असल्यास सदर शेतजमीन संदर्भात कोणी साठेखत, खरेदीखत, गहाणखत, बँक बोजा, वाटणीपत्र, मृत्यूपत्र, कोर्ट केसेस, बँक केसेस किंवा तत्सम स्वरुपाचा दस्त केला असल्यास किंवा सदर शेतजमीनवर कोणाचा बोजा हक्क, हितसंबंध असल्यास तसेच मोजणी संबंधी काही तक्रारी, हरकती असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात हरकत खालील पत्यावर कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर शेतजमीन निर्वेध निजोखमी, बिनबोजाची आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर कोणाचीही तक्रार, हरकत आल्यास ती आमचे अशिलाचे खरेदीहक्कावर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही खरेदी पुर्व जाहीर नोटीस दिली असे.

ता.१३/०७/२०२५

**सही/-**
**रोहित राजेंद्र घोडके**
ॲडव्होकेट
वैराग नगरपंचायत जवळ,
वैराग ता. बार्शी, जि. सोलापूर
मो. ९८८१८४१५९५
अशिलातर्फे ॲडव्होकेट

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## चला आयुष्य वाढवूया, फिटनेसकडे वळूया

भाग - २०

## व्हीओ २ मॅक्सचे रनिंगमधील महत्त्व

व्हीओ२ मॅक्स म्हणजे तुमचं शरीर एका मिनिटात किती प्रमाणात ऑक्सिजन वापरू शकतं याचं म ोजमाप. हे तुमच्या ऐरोबीक क्षमता (श्वासोच्छ्वासावर आधारित ताकद) आणि एकंदर फिटनेसचं सर्वोच्च सूचक आहे. रनिंगमध्ये जितकं जास्त, तितकी तुमची गती, सहनशक्ती आणि कामगिरी चांगली असते.

व्हीओ२ मॅक्स रनिंग म्हणजे अशा गतीने धावणं, जिथे तुम्ही तुमच्या शरीराच्या जास्तीत जास्त ऑक्सिजन क्षमतेच्या जवळ धावता. या प्रकारात रनिंग इंटेंस असतं, पण लहान-लहान सत्रांमध्ये (इंटरवल्स ) केलं जातं. उदा. ३ ते ६ मिनिटांचे जोरदार इंटरव्हल्स आणि त्यामधून विश्रांती.

अथलेटिक किंवा प्रोफेशनल ॲथलीट्ससाठी सर्वात अचूक आणि मान्यताप्राप्त म्हणजे: व्हीओ २ मॅक्स. लॅब-बेस व्हीओ२ मॅक्स टेस्ट (सीपीईटी कॉर्डीओपिलोमनरी एक्सरसाईज टेस्ट). ही टेस्ट विशेषतः ॲथलीट्स, रनर्स, सायकलिस्ट, ट्रायथलिट्स यांच्यासाठी घेतली जाते कारण: ती अत्यंत अचूक आणि वैज्ञानिक पद्धतीने केली जाते. ऑक्सिजन आणि कार्बनडाय ऑक्साइडचे मापन थेट श्वसनातून केलं जातं (मास्क आणि गॅस आणलंयझर वापरून). एकाच वेळी हृदयगती, लॅक्टेट थ्रेशोल्ड, रेस्पिरेटरी थ्रेशोल्डसुद्धा मोजता येतात.

**कुठे केली जाते?**

स्पोर्ट्स सायन्स लॅब काही म ल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल्स सरकारी स्पोर्ट्स इंस्टिट्यूट.

**टेस्ट दरम्यान काय होतं?**

ट्रेडमिलवर धावायला लावतात . चेहऱ्यावर मास्क असतो (O2-CO2-मापनासाठी) हळूहळू गती वाढवली जाते, शेवटी थकवा येईपर्यंत चालू ठेवतात तिथून तुमचं मॅक्स हार्ट रेट, व्हेंटिल्टरी थ्रेशोल्ड, अनाइरॉबिक थ्रेशोल्ड, आणि व्हीओ२ मॅक्स ठरवलं जातं

**योग्य कारणांमुळे ॲथलीट्ससाठी ही टेस्ट:**

१. ट्रेनिंग झोन अचूक ठरवता येतात
२. परफॉर्मन्स इम्प्रोव्हमेन्ट मोजता येतो
३. ओव्हरट्रेनिंग/अंडरट्रेनिंग समजतं
४. स्पेसिफिकेश ऐरोबीक ट्रैनिंग प्लॅन्स तयार करता येतात.

**व्हीओ२ मॅक्स रनिंगचे फायदे:**

ऑक्सिजन वापरण्याची क्षमता वाढते, त्यामुळे शरीर जास्त काळ जास्त गतीने धावू शकतं. हृदय-फुफ्फुसांची ताकद वाढते, ज्यानं थकवा उशिरा येतो. स्पर्धेतील गतीत सुधारणा होते, विशेषतः ५के ते मॅरेथॉनमध्ये. रिकव्हरी आणि ओव्हरऑल एनडोरन्स सुधारते.

**कसे करतात:**

९0-१००% व्हीओ२ मॅक्स इफेर्टने धावणं (अत्यंत जोरात, पण पूर्ण वेग नाही). एक इंटरव्हल सत्र साधारणतः ३-६ मिनिटं चालतो. दर इंटरव्हलनंतर समान किंवा थोडी कमी विश्रांती घ्यायची. वर्कआउट उदाहरण: ४ बाय ८00 मीटर @ ५के स्पर्धा गतीने, प्रत्येक राउन्डमध्ये विश्रांती २ मिनिटे अंदाजे जसे कोचिंग शेड्युल असेल तसें.

व्हीओ२ मॅक्स ट्रेनिंग केल्याने केवळ वेग नाही तर रनिंगची कार्यक्षमता (रनींग इकॉनॉमी) पण सुधारते. त्यामुळे जो धावपटू आपल्या सर्वोत्तम मर्यादेवर पोचायचं स्वप्न पाहतो, त्याच्यासाठी व्हीओ२ मॅक्स रनिंग अत्यंत आवश्यक आहे

**(क्रमशः)**

**-अतिश शहा**
फिटनेस ट्रेनर आणि अल्ट्रा मॅराथॉनर
चॅलेंजर स्पोर्ट्स फौंडेशन,
सोलापूर.
मो.९१७५८२८२०३

# भारताला विजयासाठी १९३ धावांची गरज

◆ **लंडन, १३ जुलै**

लॉर्ड्स मैदानावर सुरु असलेल्या तिसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारताने इंग्लंडच्या ३८७ धावांना तुल्यबळ झुंज दिल्यानंतर चौथ्या दिवशी भारतीय गोलंदाजांनी जबरदस्त कामगिरी करत इंग्लंडचा दुसरा डाव ६२.१ षटकांत सर्वबाद १९२ धावांत गुंडाळला. त्यामुळे आता भारतासमोर विजयासाठी १९३ धावांचे सोपे आव्हान आहे.

वॉशिंग्टन सुंदरने चौथा बळी घेत इंग्लंडचा डाव संपुष्टात आणला. इंग्लंडला १९२ धावांत गुंडाळताना वॉशिंग्टन सुंदरने २२ धावांत ४ बळी, जसप्रीत बुमराहने ३८ धावांत २ बळी, मोहम्मद सिराजने ३१ धावांत २ बळी, नितीश कुमार रेड्डीने २० धावांत १ बळी, तर आकाश दीपने ३० धावांत १ बळी मिळविला.

सुंदरने बेन स्टोक्सच्या रुपात आपला महत्त्वपूर्ण तिसरा बळी मिळविला, तर बुमराहने ब्रायडन कार्सेला (१) बाद केले.

त्यामुळे भारताला हा कसोटी सामना जिंकून मालिकेत आघाडी मिळवण्याची उत्तम संधी आहे. चहापानापर्यत इंग्लंडची स्थिती दुसऱ्या डावात ५२ षटकांत ६ बाद १७५ धावा अशी होती.

इंग्लंडने बिनबाद २ धावांवरून पुढे चौथ्या दिवसाच्या खेळाला सुरुवात केली. झॅक क्रॉली व बेन डकेटने २२ धावांची सलामी भागीदारी केली असताना मोहम्मद सिराजने डकेटला (१२) बुमराहकडून झेलबाद केले. नंतर ऑली पोपलाही (४) खेळपट्टीवर स्थिरावण्याआधीच पायचित करून तंबूत परत पाठविले. नंतर सलामीवीर झॅक क्रॉली नितीश कुमार रेड्डीच्या गोलंदाजीला बळी पडला. अशा रीतिने इंग्लंडने १४.४ षटकांत ५० धावांत तीन मोहरे गमावले व भारताने सामन्यावर आपली पकड मजबूत करण्याचा प्रयत्न केला, मात्र पुढे जो रूट व हॅरी ब्रुकने संघाची धावसंख्या वाढवण्याचा प्रयत्न केला. या दोघांनी चौथ्या गड्यासाठी ३७ धावांची भागीदारी केली असताना आकाश दीपने ब्रुकचा त्रिफळा उडविला. ब्रुकने १९ चेंडूंत २३ धावा केल्या. उपहारापर्यंत इंग्लंडची स्थिती २५ षटकांत ४ बाद ९८ धावा अशी होती.

जो रुटला बेन स्टोक्सची चांगली साथ मिळाली, भारतीय गोलंदाजांनी खेळपट्टीवर ही जमलेली जोडी फोडण्यासाठी कसोशीने प्रयत्न केले, एकेवेळी मोहम्मद सिराजने जो रुटविरुद्ध जोरदार अपील केली, परंतु पंचांनी फेटाळून लावली. पुढ वॉशिंग्टन सुंदरने भारतासाठी एक महत्त्वपूर्ण कामगिरी केली. जो रूटला स्वीपवर गोलंदाजी करताना त्याचा एक चेंडू बॅटखाली सरकला व तो लेग स्टम्पवर आदळला. रूटची बेन स्टोक्ससोबतची पाचव्या गड्यासाठीची भागीदारी ६७ धावांवर तुटली. जो रुटने ९६ चेंडूंचा सामना करीत एका षट्कारसह ४० धावांचे योगदान दिले. पुढे बेन स्टोक्सला साथ देण्यास आलेल्या जेमी स्मिथलाही (८) वॉशिंग्टन सुंदरने तंबूत परत पाठविले, तेव्हा इंग्लंड १६४ धावांनी आघाडीवर होता. बेन स्टोक्स व ख्रिस वोक्सने डाव सांभाळत चहापानापर्यंत इंग्लंडला दुसऱ्या डावांत ५२ षटकांत ६ बाद १७५ धावांपर्यंत मजल मारून दिली. ◀(वृत्तसंस्था)



जो रुटला बाद केल्यानंतर वॉशिंग्टन सुंदरचे कौतुक करताना संघातील खेळाडू. बुमराहचे २ बळी

# क्लब विश्वचषकासाठी पीएसजी, चेल्सी यांच्यात चुरस

◆ **न्यू जर्सी, १३ जुलै**

अमेरिकेत महिनाभर चाललेल्या फिफाच्या ३२ संघांच्या क्लब विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या अंतिम फेरीत पॅरिस सेंट जर्मेन (पीएसजी) आणि चेल्सी एकमेकांविरुद्ध झुंजणार आहे. या स्पर्धेमुळे अमेरिकेत विश्वचषकासारखे नाट्यमय वातावरण निर्माण झाले आहे.

युरोपियन फुटबॉलमधील सर्वात शक्तिशाली आणि श्रीमंत क्लबपैकी दोन फ्रेंच आणि इंग्लिश संघ, क्लब फुटबॉलमध्ये क्रांती घडवून आणण्याच्या आणि उत्तर अमेरिकेत २०२६ च्या विश्वचषकासाठी एक चमकदार सुरुवात म्हणून तयार केलेल्या फिफाच्या विस्तारित स्पर्धेचे पहिले विजेते होण्याच्या सन्मानासाठी स्पर्धा करतील.

न्यू जर्सीमधील मेटलाइफ स्टेडियमवर होणारा अंतिम सामना आश्चर्यचकित करणाऱ्या स्पर्धेत रंगेल, यात मॅन्चेस्टर सिटी आणि इंटर मिलान यांना अल हिलाल आणि फ्लुमिनेन्स यांच्याकडून धक्कादायक पराभवाचा सामना करावा लागला.



पीएसजी चमकदार फॉर्ममध्ये असून त्यांनी गेल्या आठ सामन्यांपैकी सात सामन्यात एकही गोल न गमावता विजय मिळवला आहे. लुईस एनरिकच्या संघाने आक्रमक, वेगवान, उभ्या शैलीचे प्रदर्शन करून उपांत्य फेरीत रिअल माद्रिदचा ४-० असा पराभव केला. गेल्या महिन्यात चॅम्पियन्स लीगमध्ये पहिल्यांदाच विजय मिळवलेल्या पॅरिसच्या संघाने त्यांच्या पहिल्या जागतिक विजेतेपदाचा पाठलाग सुरू केला आहे.

दरम्यान, चेल्सीने अंतिम फेरीपर्यंतचा प्रवास लांब केला आहे. युरोपच्या तिसऱ्या श्रेणीतील कॉन्फरन्स लीगमध्ये विजय मिळवल्यानंतर त्यांनी अमेरिकेत प्रवेश केला आहे. चेल्सीने स्पर्धेत चांगली कामगिरी केली आहे. जोआओ पेड्रोचा समावेश प्रेरणादायी ठरला आहे. चेल्सीने फ्लुमिनेन्सवर उपांत्य फेरीत विजय मिळविला, यात पेड्रोने दोन गोल केले आहेत. त्याने कोल पामरसोबत आक्रमणात चांगली कामगिरी केली आहे, एन्झो फर्नांडिस, रोमियो लाविया आणि मोइसेस कैसेडो या त्रिकुटांनीही उत्कृष्ट कामगिरी केली आहे. ◀(वृत्तसंस्था)



कोलकाता येथे आयोजित एका समारंभर्चीं सामाजिक कार्यकर्त्या भारती मुडी (डावीकडे) यांना बोचोरर बेस्ट २०२५ पुरस्कार प्रदान करताना माजी क्रिकेटपटू झुलन गोस्वामी

# वेळ वाया घालवण्याचा हा एक चांगला प्रकार

### झॅक क्रॉलीच्या रणनीतींवर वॉनचे भाष्य

◆ **लंडन, १३ जुलै**

मी कधीही न पाहिलेला हा वेळ वाया घालवण्याचा एक उत्तम प्रकार आहे, असे मत इंग्लंडचा माजी कर्णधार मायकेल वॉनने झॅक क्रॉलीच्या वेळ वाया घालवण्याच्या रणनीतीवर व्यक्त केले.

भारताचा पहिला डाव ३८७ धावांवर आटोपल्यानंतर, तिसऱ्या दिवशी शेवटच्या सत्रात भारताला दोन षटके टाकण्यासाठी पुरेसा वेळ मिळाला होता, परंतु जसप्रीत बुमराहच्या पहिल्या षटकात दुखापतीचे सोंग घेऊन तीन वेळा माघार घेण्याच्या क्रॉलीच्या रणनीतीमुळे कारवाईला विलंब झाला. परिणामी भारताला केवळ एक षटक खेळण्याची संधी मिळाली. झॅक क्रॉलीच्या वर्तनामुळे भारतीय संघाचा कर्णधार शुभमन गिल व त्याच्या संघाला राग आला. दरम्यान गिलने झॅक क्रॉलीला हटकले. इंग्लंडचा सलामीवीर झॅक क्रॉलीच्या वेळ वाया घालवण्याच्या रणनीतीनंतर भारताला दुसरे षटक टाकता आले नाही. इंग्लंडने तिसऱ्या दिवसाचा शेवट दुसऱ्या डावात एकही बाद न होता २ धावा केल्या.

कसोटीच्या तिसऱ्या दिवसाच्या शेवटी झॅक क्रॉलीच्या वेळ वाया घालवण्याची रणनीती मी यापूर्वी कधीही पाहिल्या नाहीत, इतक्या चांगल्या होत्या. परंतु भारतदानेही दुसऱ्या दिवशी तोच दृष्टिकोन अवलंबला. काल गिलच्या स्नायूंच्या दुखापतीमुळे तो खाली पडला होता म्हणून भारत तक्रार करू शकत नाही म्हणून भारतीय संघ तक्रार करू शकत नाही, असे ते म्हणाले. ◀(वृत्तसंस्था)

# अकलूज येथे २0 जुलैला रत्नाई चषक राज्य बुध्दिबळ स्पर्धा

**अकलूज, दि. १३ जुलै-**

प्रताप क्रीडा मंडळाच्या वतीने श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील यांच्या १0१व्या जयंती निमित्त २0 जुलै रोजी रत्नाई चषक राज्य बुध्दिबळ स्पर्धेचे आयोजन केले असल्याची माहिती मंडळाच्या अध्यक्षा स्वरुपाराणी मोहिते-पाटील यांनी दिली.

सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील स्मृतीभवन शंकरनगर (म हर्षी हॉल) येथे या स्पर्धा होणार आहेत. मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रताप क्रीडा मंडळाने कला, क्रीडा, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रात राज्य व राष्ट्रीय पातळीवर उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या ही वर्षी भव्य प्रमाणात स्पर्धेचे आयोजन केले आहे. ही स्पर्धा सोलापूर चेस असोसिएशन यांच्या सहकार्याने होत असुन ही स्पर्धा १२, १७ वर्षे व खुला गट अशा तीन गटांसाठी होत आहेत. प्रत्येक गटासाठी स्वतंत्र परितोषिके देण्यात येणार आहेत. या स्पर्धेत ६0 रोख रकमेची बक्षिसे, ६0 सन्मानचिन्हे, ६0 पदके असून प्रत्येक गटात २0 पेक्षा अधिक बक्षिसे आहेत. माळशिरस तालुक्यातील खेळाडूंसाठी तालुक्याचा स्वतंत्र गट तयार केला असून या गटासाठीही स्वतंत्र बक्षिसे आहेत. १८ जुलै रोजी सायं. ६ वाजेपर्यंतच ऑनलाईन स्पर्धा नोंदणी स्विकारली जाणार आहे. स्पर्धेची ऑनलाईन नोंदणी करण्यासाठी बारा वर्षे वयोगटाकरिता राजन चिंचकर ८९८३0३७0५५, सतरा वर्षे वयोगटाकरिता जयप्रकाश जगताप ९0९६0५२१९७ व खुल्या गटासाठी रावसाहेब मगर ९१४५७८४५८७ या क्रमांकावर संपर्क करून सहभाग नोंदविण्याचे आवाहनही सचिव बिभीषण जाधव यांनी केले आहे.

या वेळी उपाध्यक्ष पोपटराव भोसले-पाटील, सचिव बिभिशन जाधव, स्पर्धा प्रमुख अभिजित बावळे, डॉ प्रवीण ढवळे, मल्हारी घुले उपस्थित होते.

# भारताने पाचवा सामना गमावला, पण टी-२० मालिका जिंकली

### शेफाली वर्माची ७५ धावांची खेळी व्यर्थ

### सामनावीर चार्ली डीन, मालिकावीर श्री चरणी

◆ **बर्मिंगम, १३ जुलै**

भारतीय महिला संघाने येथे इंग्लंडविरुद्ध झालेल्या पाचव्या व शेवटच्या टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात ५ गड्यांनी पराभव पत्करला, परंतु पाच सामन्यांची टी-२० मालिका ३-२ ने जिंकली.

शेफाली वर्माच्या जलद ७५ धावांच्या जोरावर भारताने ७ बाद १६७ धावा केल्या, हे लक्ष्य इंग्लंडने शेवटच्या चेंडूवर पाच गडी शिल्लक असताना गाठले. २३ धावांत ३ बळी टिपणारी चार्ली डीन सामनावीर, तर भारताची श्री चरणी (१०) बळी) मालिकावीर पुरस्काराची मानकरी ठरली.

भारतीय संघाची उपकर्णधार स्मृती मंधानाने आक्रमक सुरुवात केली. तिने पहिल्या षटकात एम आर्लॉटला सलग चौकार मारले, मात्र शेवटच्या चेंडूवर स्मृतीला स्मिथकडे पॉइंटवर झेल सोपवण्यास भाग पाडले. जेमिमाह रॉड्रिग्जही जास्त काळ टिकू शकली नाही, स्मिथनेतिचा त्रिफळा उडविला. भारताने २.३ षटकांत १९ धावांत दोन महत्त्वपूर्ण मोहरे गमावले. त्यानंतर शेफाली वर्मा (७५) व कर्णधार हरमनप्रीत कौरने (१५) तिसऱ्या गड्यासाठी ४३ चेंडूत ६६ धावा करून भारताला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर ऑफस्पिनर चार्ली डीनने (३-२३) प्रभावी मारा करत तीन गडी बाद केले व भारताला बॅकफुटवर ढकलले. त्यानंतर हरलीन देओललाही काही करता आले नाही. ती सोफी एक्लेस्टोनच्या (२-२८)चेंडूवर पायचित झाली. दरम्यान, शेफालीने केवळ २३ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले. तिचे हे अर्धशतक भारतीय महिला संघाने केलेले दुसरा सर्वात वेगवान अर्धशतक ठरले. यष्टिरक्षक ऋचा घोषने १६ चेंडूत २४ धावा काढल्या, तर राधा यादवने १४ धावा काढल्या.

पाठलाग करताना, सलामीवीर सोफिया डंकले (३० चेंडूत ४६) आणि डॅनिएल व्याट-हॉजने (३७ चेंडूत ५६) इंग्लंडला शानदार सुरुवात दिली. त्यांनी केवळ १०.४ षटकात १०१ धावांची भागीदारी करून संघाला विजय मिळवून दिला. कर्णधार टॅमी ब्यूमोंट (३०) आणि बोचियर (१६) यांनी विजय निश्चित केला.

भारत आणि इंग्लंड आता १६ जुलैपासून साऊदम्पटन येथे सुरू होणाऱ्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत सहभागी होतील. ◀(वृत्तसंस्था)



सामनावीर चार्ली डीनचे ३ बळी

# सदानंद मोहोळ संघाच्या २६२; वसंत रांजणे संघाच्या ३५४ धावा

## डी.बी.देवधर चषक तिसरी फेरी, पहिला दिवस अनिरुद्ध साबळेचे तडफदार शतक, कुणाल थोरातचे ४ बळी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जुलै-**

डी. बी. देवधर चषक क्रिकेट स्पर्धेत रविवारी तिसऱ्या फेरीतील सामन्यांना सुरुवात झाली असून पहिल्या दिवशी खेळ थांबला तेव्हा इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर सदानंद मोहोळ संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना १0 बाद २६२ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल हेमंत कानिटकर संघाने ८ षटकात बिन बाद ४0 धावा केल्या असून अद्यापि २२२ धावांनी पिछाडीवर आहे.

दुसरीकडे दयानंद कॉलेज मैदानावर देखील वसंत रांजणे संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना ८0 षटकात ८ बाद ३५४ धावा केल्या आहेत.

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे वतीने आयोजित आणि सोलापूर जिल्हा क्रिकेट संघटनेच्या सौजन्याने चालू झालेल्या पहिल्या दिवशी अनिरुद्ध साबळे याने सलामीला येत तडफदार असे शतक (१२४ २00, १६४) झळकावले त्याचे सोबत कर्णधार किरण चोरमले (६३)ने संयमी अर्धशतक साजरे केले आणि पार्क स्टेडियमवर कर्णधार अभिषेक पवार ने देखील संयमी अर्धशतक (५७)लगावले तर कुणाल थोरात ने ४ बळी टिपले.

सामन्यात पंच म्हणून नंदकुमार टेळे, पृथ्वीराज गांगजी, नवीन माने, चिराग शहा तर गुणलेखक म्हणून मिलिंद गोरे, नागप्पा सुरेगीहल्ली हे काम पाहत असून सोलापूर जिल्हा क्रिकेट संघटनेचे सर्व पदाधिकारी हे सामने यशस्वी पार पाडण्यासाठी कष्ट घेत आहेत. रणजी निवड समिती प्रमुख अक्षय दरेकर यांच्या नेतृत्वात सलील आगरकर, रोहित जाधव हे जातीने मैदानावर उपस्थित राहून प्रत्येक खेळाडूंचा खेळ पारखत आहेत.

**संक्षिप्त धावफलक :**

**इंदिरा गांधी पार्क स्टेडियम सदानंद मोहोळ**

(१) : २६२/१0 (७४.३) अभिषेक पवार ५७, योगेश चव्हाण ३८, सत्यजीत बच्छाव ३६, सचिन धस २९, कुणाल थोरात ४0/४ बळी, जगदीश झोपे ४९/२ बळी, आयुष बिरादार, नचिकेत ठाकूर, सुमित मारकली व कुणाल त्रिपाठी प्रत्येकी १ बळी.

**हेमंत कानिटकर (१):** ४0/0 (८) अनिकेत नलावडे नाबाद १६, ओम भोसले नाबाद २0

**दयानंद कॉलेज ग्राउंड वसंत रांजणे**

(१): ३५४/८ (८0) अनिरुद्ध साबळे १२४, किरण चोरमले ६३, साहिल नाळगे ४५, शमशूझमा काझी ४४, सूरज शिंदे २६, हर्षल काटे २४ निमिर जोशी, अथर्व चौधरी, अक्षय वाईकर प्रत्येकी २ बळीरवींद्र जाधव, वैभव विभुते प्रत्येकी १ बळी.

### आज अर्शिनची फलंदाजी पाहता येणार

१९ वर्षाखालील भारतीय क्रिकेट संघातून गेल्या वर्षी विश्वचषक खेळलेले सोलापूरचा अर्शीन कुलकर्णी, बीडचा सचिन धस तसेच किरण चोरमले यांचा खेळ पाहण्यासाठी युवा खेळाडूंनी मैदानावर गर्दी केली असून उद्या सामन्याचा दुसरा दिवशी अर्शिनची फलंदाजी पाहता येणार आहे.



# राज्य टेबल टेनिस स्पर्धेत सोलापूरच्या मनीष रावत अजिंक्य

**सोलापूर, ति. १३ जुलै-**

राज्य टेबल टेनिस स्पर्धेत येथील मनीष रावत यांनी अजिंक्यपद पटकाविले.

नवी मुंबई येथे झालेल्या पहिली महाराष्ट्र राज्य मानांकित टेबल टेनिस स्पर्धेत रावत यांनी ५0 वर्षे वयोगटात मुंबईच्या शरद ग्रोवर यांचा ३-२ ने पराभव केला. त्यांचे सोलापूर ज़िल्हा टेबल टेनिस संघटनेचे अध्यक्ष डॉ राजीव प्रधान व सर्व खेळाडूंनी अभिनंदन केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# वारी परिवारामुळे मंगळवेढा स्मशानभूमी ठरतेय परिवर्तनाची नांदी

## घास शिवण्यासाठी गाईची सोय

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा, दि. १३ जुलै -**

संत विचारातून सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या वारी परिवारामुळे मंगळवेढा स्मशानभूमी परिवर्तनाची नांदी ठरत आहे. सद्यस्थितीत मंगळवेढा स्मशानभूमीत (मातीवेळी) तिसऱ्या दिवशी घास शिवण्यासाठी कावळ्याची फार मोठी समस्या निर्माण झाली आहे. लोकांना स्मशानभूमीत ताटकळत बसावे लागत आहे. ही समस्या लक्षात घेऊन कायम स्वरूपी घास शिवण्याचा प्रश्न संपविण्यासाठी स्मशानभूमीत राहणाऱ्या उप्पेवाड कुटूंबाला वारी परिवाराच्या वतीने एक गीर गाय देण्यात आली आहे.

भारतीय संस्कृतीत आईनंतर मातेचा दर्जा हा गाईला दिला जातो त्यामुळे सदर गोमातेचा आशीर्वाद देखील मृत व्यक्तीच्या आत्म्यास व त्यांच्या परिवारास मिळणार आहे. घरातील गेलेल्या मृत व्यक्तीची रक्षा (राख) व अस्थी नदीतील



पाण्यात, तिर्थक्षेत्री किंवा विहरीत विसर्जन न करता शेतात टाकून त्यावर वृक्षारोपण करणे म्हणजे त्या व्यक्तीबरोबरच निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासारखे आहे. रक्षा (राख) नदीमध्ये विसर्जन करण्याऐवजी आपल्या शेतात किंवा योग्यस्थळी विसर्जित करून त्यावर आंबा, वड, पिंपळ, कडुलिंब किंवा कुठलेही फळझाड वृक्ष लावावेत. हा निसर्ग अविरतपणे आपल्याला ऑक्सीजन पुरवण्याचं काम करतो. ऑक्सीजनमुळेच आपल्या मृत व्यक्तीच्या जीवनाचा प्रवास मंगळवेढा स्मशानभूमी पर्यंत पोहचला आहे. पुढील अनेक पिढ्याना शुद्ध प्राणवायू मिळावा या भावनेने मृत व्यक्तीच्या स्मरणार्थ वृक्षारोपण कले आहे. पर्यावरणाला हानी होऊ नये यासाठी रक्षा गोळा करून आणि वृक्ष लावून आपण खऱ्या अर्थाने श्रद्धांजली वाहिल्यासारखी आहे. मरावे परी वृक्षरूपी उरावे असा संदेश देणारा डिजिटल बोर्ड लावून मंगळवेढेकराना आवाहन करण्यात आले आहे. याआगोदरही वारी परिवाराने स्मशानभूमी परिसरात झाडी लावून, संवर्धन करून हरित केला आहे. स्मशानात राहणाऱ्या महिलेचा महिला दिनानिमित्त सत्कार करून वेगळा आदर्श उभा केला आहे. खरोखरच वारी परिवाराने वैज्ञानिक दृष्टीकोण ठेवून काळाची पाऊले ओळखून संत विचारांचे बिजारोपण करीत स्मशानभूमीचा कायापालट केला आहे. यावेळी अजित शिंदे, ॲड रमेश जोशी, विष्णू भोसले, विजय हजारे, रतिलाल दत्तू, राजेंद्र नलवडे, रितेश मोरे, रविराज जाधव, स्वप्निल टेकाळे, प्रफुल्ल सोमदळे, अविराज जाधव, अरुण गुंगे, परमेश्वर पाटील, दत्तात्रय भोसले, विठ्ठल बिले, पांडुरंग नागणे, विक्रम माने, अजय आदाटे, नानासाहेब चेळेकर, सिद्धेश्वर डोंगरे, प्रा विनायक कलुबर्मे, सतिश दत्तू यांचेसह उप्पेवाड कुटुंब आदीजण उपस्थित होते.

## महत्वाचे...

### सांगोल्यातील पाटील बालरुग्णालय हॉस्पिटलमध्ये मिळणार मोफत उपचार

**सांगोला,दि.१३ जुलै-**



सांगोला शहरातील पाटील हॉस्पिटल बालरुग्णालयात महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना, प्रधानमंत्री आयुष्यमान भारत योजना, बांधकाम कामगार योजना, राज्य शासन कर्मचारी योजना सुरू झाली असून आता नागरीकांना या योजनेअंतर्गत मोफत उपचार मिळणार आहेत. तरी केसरी, पिवळे व पांढरे रेशनकार्ड असणाऱ्यांना या योजनेचा लाभ घेता येणार असल्याची माहिती डॉ. बसवेश्वर पाटील यांनी दिली. डॉ.बसवेश्वर पाटील यांच्या पाटील हॉस्पिटल बालरुग्णालय येथे सध्या एन.आय.सी.यु विभाग सुरू असून यामध्ये कमी दिवसाच्या, कमी वजनाच्या बाळावर, कावीळ असलेल्या, जन्मता न रडलेल्या बाळांवर उपचार केले जातात. सुसज्ज व सर्व सुविधायुक्त असा पी.आय.सी.यू हा विभाग असून यामध्ये झटके येणाऱ्या, सर्पदंश, विषबाधा, बेशुद्ध झालेल्या बाळांवरती उपचार केले जातात. वय वर्ष झिरो ते अठरा वर्षापर्यंत सर्व मुलांवरती उपचार तसेच सर्व प्रकारचे लसीकरण सुद्धा हॉस्पिटलमध्ये उपलब्ध आहेत.

### अजित पवार यांचे जनसंपर्क अधिकारी संजय देशमुख यांचे हृदयविकाराच्या धक्क्याने निधन

**मुंबई, दि. १३ जुलै :**

माहिती व जनसंपर्क विभागातील वरिष्ठ सहाय्यक संचालक आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे जनसंपर्क अधिकारी संजय देशमुख (वय ५५ वर्षे) यांचे शनिवारी रात्री हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने निधन झाले. त्यांच्या निधनाने पत्रकारिता आणि शासकीय जनसंपर्क क्षेत्रातील शांत, संयमी, संवेदनशील आणि अभ्यासू व्यक्तिमत्त्व हरपले आहे. देशमुख हे गेल्या पंधरा वर्षांपासून अजित पवार यांच्याकडे जनसंपर्क अधिकारी म्हणून कार्यरत होते. आपल्या संयमित आणि प्रभावी कामकाजामुळे त्यांनी प्रशासन व प्रसारमाध्यमांमध्ये दुवा म्हणून महत्त्वाची भूमिका पार पाडली.पत्रकारितेतील कारकिर्दीची सुरुवात त्यांनी मुंबई दिनांक आणि दैनिक सकाळ या माध्यम समूहातून केली होती. माध्यमांतील अनुभवामुळेच त्यांच्या शासकीय जनसंपर्क कार्यात व्यावसायिकता आणि सुसूत्रता होती. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी व मुलगी असा परिवार आहे. सोमवारी (दि १४ ) दादर येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

### ओंकार कारखान्यामार्फत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**पिलीव, दि. १३ जुलै-**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लक्ष्मीनगर कुसमोड (ता.माळशिरस) येथे ओंकार साखर कारखाना चांदापुरीचे चेअरमन बाबुराव बोत्रे-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी कारखान्याचे कार्यकारी संचालक वाघमोडे, घोडके, अवताडे, रामचंद्र मगर उपस्थित होते कारखान्याकडून शाळेतील सर्व विद्यार्थ्यांसाठी वह्या, पेन्सिल, खोडरबर तसेच पाण्याची बाटली, खाऊ म्हणून बिस्कीट व चॉकलेट देण्यात आले. शाळेला शालेय साहित्य मिळवून देण्यासाठी माजी उपसरपंच संजय पाटील यांनी पाठपुरावा केला. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शशिकांत घड्याळे, सदस्य नंदकिशोर पाटील, ज्ञानेश्वर मदने, मनोज मदने, विजय मदने, मारुती पवार माजी सदस्य नबाजी मदने तसेच नूतन उपाध्यक्षा अनिता लवटे, उपसरपंच स्वाती मदने, सुशीला मदने, पल्लवी मदने हे उपस्थित होते. याप्रसंगी रामचंद्र मगर प्रा. संजय पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. आभार मुख्याध्यापक सुहास कोल्हे यांनी मानले.




## निधन वृत्त...

### माधुरी धोत्रे



**मोहोळ,दि. १३ जुलै-**

येथील आदर्श चौकातील माधुरी शैलेश धोत्रे (वय ४२) यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. येथील पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्ते शैलेश धोत्रे यांच्या त्या पत्नी होत्या. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, चार दीर, भावजया, पुतणे पुतणी, सासू असा परिवार आहे.

### बाजीराव विभुते



**वैराग, दि. १३ जुलै-**

तडवळे येथील प्रसिद्ध ज्योतिष विशारद बाजीराव विभुते (वय ८५ वर्ष) यांचे शनिवारी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी, सुना व नातवंडे असा परिवार आहे.

### अंदप्पा पाटील



**सोलापूर, दि. १३ जुलै -**

श्रीक्षेत्र तीर्थ (ता. दक्षिण सोलापूर) येथील शेतकरी अंदपा चन्नप्पा पाटील यांचे वयाच्या ९६ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांना श्री रामलिंगेश्वर शिक्षण समूह, सार्वजनिक वाचनालय, व ग्रामस्थ्यांच्या वतीने तसेच नंदगाव येथील विरक्त मठाच्यावतीने श्री.म.नि. राजशेखर महास्वामींजींनी आदरांजली वाहिली.

### चनबसय्या हिरेमठ



**वळसंग, दि.१३ जुलै-**

येथील रहिवासी चनबसय्या रेवणसिद्धय्या हिरेमठ (वय ९३) यांचे अल्पशा आजाराने रविवारी १३ जुलै रोजी रात्री ८.३० च्या सुमारास लिंगैक्य झाले. अफजलपुर व वळसंग मठाचे मठाधिपती श्री ष.ब्र.प्र. विश्वाराध्य मळेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांचे वडील आहेत. त्यांचे पश्चात तीन मुले, पाच मुली, सुने व नातवंड असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा सोमवारी त्यांच्या निवासस्थानापासून सोमवार (दि.१४ जुलै) रोजी सायंकाळी ४ वा निघणार असून मठामध्ये अंत्यसंस्कार होतील.

# करमाळ्याच्या माध्यमिक शिक्षक व सेवक पतसंस्थेतर्फे दहा टक्के लाभांश

## ४४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि. १३ जुलै -**

माध्यमिक पतसंस्था १०% दराने लाभांश देणार असल्याचे पतसंस्थे च्या चेअरमन मनिषा तनपुरे यांनी सांगितले यावेळी व्यासपीठावर ज्येष्ठ संचालक व उपाध्यक्ष कांतीलाल बदे सर संचालक सुनिल जाधव दत्ता भागडे किरण परदेशी साहेबराव आरकिले नानासाहेब निळ श्रीकांत नलबे श्रीम ज्योती चव्हाण सुहास गायकवाड माजी चेअरमन बाळासाहेब भिसे आदि मान्यवर उपस्थित होते.

जेऊर ता.करमाळा येथे भारत महाविद्यालयात माध्यमिक शाळा शिक्षक व सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित करमाळा या संस्थेची ४४वी वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात



आले होते. सदर सभे वेळी संस्थेचे ज्येष्ठ सभासद विठ्ठल रोडगे सर आणि श्रीम. छाया बरडे हे सेवा निवृत्त झाल्याने त्यांचा सत्कर करण्यात आला. तसेच इयत्ता दहावी आणि बारावी व शिष्यवृत्ती परीक्षेत यशस्वी झाले बद्दल सभासद पाल्यांचा प्रथम क्रमांक १००१रू. द्वितीय क्रमांक ७००रूव तृतीय व ५०१रुपये देऊन गौरव करण्यात आला. संस्था अहवाल वाचन सचिव पांडुरंग वाघमारे यांनी वाचून दाखविला. सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांची समर्पक उत्तरे दिली. सर्व सभासदांनी पतसंस्थे च्या पारदर्शक आणि काटकसरी च्या कामाचे कौतुक केले. ज्येष्ठ सभासद विठ्ठल रोडगे सर यांनी आपले विचार व्यक्त केले. सभेसाठी शिवशंकर फुलारी बागवान सर रमेश भोसले सर गलांडे सर मंगेश अभंग संजय केकान हरी शिंदे प्रमोद गायकवाड महेश कांबळे बाळासाहेब शिंदे मारुती जाधव संदीप पुजारी मारुती किरवे जगदाळे सर शेलार सर शिंदे सर काझी सर लहू तनपुरे रविंद्र सपकाळ प्रकाश कांबळे विजय धनवे विकास पवार सुरेश बरडे कोरडे सर बाळासाहेब सरक नारायण मोटे हजर होते. सदर सभेचे नेटके आयोजन केले होते. सूत्र संचालन अंगद पठाडे यांनी तर आभार दत्ता भागडे यांनी केले



### शिष्यवृत्ती परीक्षेत नाझरा विद्यामंदिरचे यश

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१३ जुलै-**

पाचवी व अठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत नाझरा विद्यामंदिर प्रशालेने घवघवीत यश संपादन केले. पाचवीतील अनुष्का निंबाळकर, वेदांत धायगुडे, ओंकार पाटील यांनी जिल्हा गुणवत्ता यादीत तसेच आठवीतील आदर्श बाबर याने राज्यात १३ वा क्रमांक मिळवला. बाबर सुशांत, आडसूळ मानसी, राऊत विराज, बंदवडे रामेश्वर, यादव सुरज, काझी अलफाज, पाटील वेदिका, शेळके मयूर, वलेकर रोहित, पोरे सृष्टी, गोडसे ओम, बाबर श्रेयशी, बंदवडे सानिका यांनी जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळवले. वसंत गोडसे, दिलीप सरगर, सुनील जवंजाळ, महालिंग पाटील, मंजुश्री ओतारी, अतुल बनसोडे, मारुती सरगर, लक्ष्मी कुकडे यांचे मार्गदर्शन लाभले. अध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, प्रशुद्धचंद्र झपके, विश्वेश झपके, मुख्याध्यापक बिभीषण माने, विनायक पाटील यांनी अभिनंदन केले.

# डोंगरगाव यात्रा कमिटीच्या अध्यक्षपदी ग्रा.पं. सदस्य विशाल साखरे यांची निवड

## शेकडो वर्षापूर्वीची जाती प्रथा काढली मोडीत

## भाजपा नेते विवेक खिलारे यांच्या प्रयत्नाला यश

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.१३ जुलै -**

तालुक्यातील डोंगरगाव येथील ग्रामदैवत पांचबीबी देवी यात्रा उत्सव कमिटीच्या अध्यक्षपदी विद्यमान ग्रामपंचायत सदस्य विशाल अभिमान साखरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

तहसील कार्यालय मंगळवेढा येथे शुक्रवारी (दि.११ जुलै) रोजी झालेल्या बैठकीत तहसीलदार मदन जाधव व पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरिगिड्डे तसेच डोंगरगाव लोकनियुक्त सरपंच सारिका खिलारे यांच्यासह शेकडो गावकऱ्यांच्या उपस्थितीत ही निवड जाहीर करण्यात आली. दरम्यान सकाळी ११ वाजता तहसील कार्यालयात होणाऱ्या



बैठकीत अध्यक्ष कोण होणार ? याकडे फक्त डोंगरवासीयांचेच नव्हे तर संपूर्ण मंगळवेढा तालुक्याचे लक्ष लागून राहिले होते. यापूर्वी कधीही मागासवर्गीय समाजातील व्यक्तीला अध्यक्षपदाची संधी मिळाली नव्हती. परंतु सर्व जुनाट जाती प्रथा झुगारून भारतीय जनता पक्षाच्या ओबीसी मोर्चाचे सोलापूर जिल्हा अध्यक्ष विवेक खिलारे यांनी विशाल साखरे यांना अध्यक्ष करण्याची सूचना मांडली त्यास उपस्थित यात्रा कमिटीच्या सदस्यांनी व गावकऱ्यांनी सर्वानुमते मान्यता दिली. याप्रसंगी माजी सरपंच शंकर मेटकरी, सचिन आकळे, ड.दत्ता खडतरे, शहाजन सय्यद, निसार पठाण, दादासाहेब पठाण, अस्लम मुजावर, शब्बीर सय्यद, समाधान हेंबडे, मधुकर मोरे, दत्ता शिंदे, संगम खडतरे, माजी उप सरपंच प्रदिप चौगुले, संगमेश्वर मस्के, रामचंद्र खडतरे, तात्यासाहेब खडतरे, शिवा साखरे, विजय साखरे, अमोल मेटकरी, संभाजी सलगर, म्हाळप्पा चौगुले, सत्यवान शिंदे, गुणवंत मेटकरी व मदन चौगुले, बजरंग मेटकरी, रोहित नरले, शरद नागने यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. या ऐतिहासिक निवडीनंतर यात्रा उत्सव कोणतेही गालबोट न लागता शांततेने पार पाडण्याचे आवाहन तहसीलदार मदन जाधव व पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरिगिड्डे यांनी उपस्थित ग्रामस्थांना केले. ही बैठक अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

## ऐन लंपीच्या काळातच

# पिलीव येथील पशुवैद्यकीय दवाखाना पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांविना

**तभा वृतसेवा**
**पिलीव, दि. १३ जुलै -**

पिलीव (ता. माळशिरस) येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात बदली झालेल्या पशुवैद्यकिय अधिकाऱ्यांच्या जागी नविन अधिकारी नियुक्त न झाल्याने नवीन सुसज्ज अशी प्रशस्त इमारत असूनही दवाखाना डॉक्टरविना आहे.

याठिकाणी पिलीव, झिंजेवस्ती व सुळेवाडी या तीन गावाचा समावेश होतो. तीनच गावे असली तरी या तिन्ही गावातील पशुधनाची संख्या फार मोठी आहे. सध्या या तिन्ही गावात लंपीचे थैमान सुरु आहे. मात्र याठिकाणी असणारे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. शेंडगे यांची बदली झाल्यानंतर याठिकाणी अद्यापही नवीन पशुवैद्यकीय अधिकारी आलेच नाहीत. याठिकाणची जागा रिक्तच आहे. यामुळे याठिकाणी ऐन लंपीच्या काळातच पशुवैद्यकीय अधिकारी नाही. यामुळे या तिन्ही गावात सध्या शासकीय पशुवैद्यकीय सेवा देणारा स्वतंत्र अधिकारीच नाही. याठिकाणी पशुवैद्यकीय अधिकारी नसल्यामुळे शिंगोर्णी येथील पशुवैद्यकीय अधिकारी वरकुटे यांना याठिकाणचा तात्पुरता पदभार दिला आहे. पण त्यांना शिंगोर्णी, बचेरी व काळमवाडी या तिन गावात सेवा देऊन पुन्हा पिलीव अंतर्गत येणाऱ्या गावात सेवा देणे जिकरीचे झाले आहे. त्यातच पिलीव, झिंजेवस्ती व सुळेवाडी या तिन्ही गावात सध्या मोठ्या प्रमाणात लंपीची साथ सुरू आहे. यामुळे या तिन गावातील जनावरांवर जास्त वेळ देऊन उपचार करणे आवश्यक आहे. पण पिलीव पशुवैद्यकीय दवाखान्यात पशुवैद्यकीय अधिकारी नसल्यामुळे पशुवैद्यकीय सेवा ऐन लंपीच्या काळातच कोलमडली आहे. सध्या माळशिरस तालुक्यात पाच - सात पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या जागा रिक्तच आहेत नवीन भरती झाल्याशिवाय या जागा भरणे सध्या तर दुरापास्त आहे. शासनाने ताबडतोब पिलीव येथे नवीन पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनची नेमणूक करण्याची मागणी पशुपालकांमधुन होत आहे.



> याबाबत माळशिरस तालुक्याचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. प्रवीण शिंदे यांना विचारले असता पिलीव येथे नवीन पशुवैद्यकीय अधिकारी न आल्यामुळे जागा रिक्तच राहीली आहे. यामुळे याठिकाणी तात्पुरता शिंगोर्णी येथील पशुवैद्यकीय अधिकारी वरकुटे यांना पदभार देणयात आला आहे. तरी पिलीव पशुवैद्यकीय दवाखान्याअंतर्गत येणाऱ्या गावातील पशुपालकांनी त्यांच्याशी संपर्क साधावा.

# स्काऊट गाईडतर्फे पंढरपुरात महास्वच्छता अभियान

## दोन हजार सीडबॉलचे रोपण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.१३ जुलै-**

महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट गाईड शहर जिल्हा संस्था सोलापूर यांच्यामार्फत समुदाय विकास प्रकल्प अंतर्गत पंढरपुर येथे महास्वच्छता अभियान व दोन हजार सीडबॉल रोपण हे उपक्रम राबविण्यात आले.या उपक्रमात जिल्ह्यातील ३५ प्रशालेतील स्काऊट गाईड विद्यार्थ्यांनी उस्तुर्फुपणे सहभाग घेतला.

आषाढी एकादशी निमित्ताने विठ्ठल रखुमाईच्या दर्शनासाठी लाखो भाविक आले होते. दरम्यान चंद्रभागेच्या वाळवंटात पडलेल्या प्लास्टिक, कागद, कपडे, हार, फळे, साली, निर्माल्य काढण्यासाठी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. स्काऊट गाईडचे जिल्हा मुख्य आयुक्त तथा प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांच्या नेतृत्वाखाली हे स्वच्छता अभियान राबविण्यात आले.नदी किनारी पडलेले कचरा, प्लास्टिक, बाटल्या, कपडे, फुले, कागदाचे तुकडे, निर्माल्य असे साहित्य



संकलित करुन नगरपरिषदेच्या स्वच्छता विभागाकडे सोपविण्यात आले. तसेच माळरानावर व रस्त्याच्याकडेला दोन हजार सीडबॉलचे रोपण करण्यात आले.

याप्रसंगी सोलापूर जिल्ह्याचे स्काऊट संघटक श्रीधर मोरे, गाईड संघटक अनुसया शिरसट, पंढरपूरचे गटशिक्षणाधिकारी मारुती लिगाडे, ट्रेनर रशिद पठाण, अशोक खपाले, नामदे, सलगर, अर्जुन सुरवसे, महेश कोरे व कार्यालयाचे कर्मचारी आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी योगेश उपळकर, परमेश्वर चांदोडे, महादेव पुजारी, प्रसन्न काटकर, प्रमोद जाधव, संदिप इवरे, विलास डाखोळे, सुधाकर कांबळे, तानाजी क्षीरसागर, तृप्ती खोबरे, वैशाली जाधव, नामदे, लक्ष्मी शिंदे, अनिता हवदे आदींनी परिश्रम घेतले. श्री स्वामी समर्थ प्रशाला अरळी., न्यू इंग्लीश स्कुल करकंब, मल्लिकार्जुन हायस्कूल हत्तूरे वस्ती, दिंगबर जैन गुरुकुल, बाळीवेस, निर्मलाताई ठोकळ प्रशाला, राजर्षी शाहु माध्यमिक विद्यालय सोलापूर, गंगाई सपाटे प्रशाला तारापूर नाला, माध्यमिक प्रशाला वडवळ, राष्ट्रमाता इंदिरा कन्या प्रशाला मोहोळ, राजनंदिनी माध्यमिक विद्यालय कौठाळी, रोव्हर रेंजर ग्रुप, प्राथमिक शिशू विहार इसबावी, माध्यमिक विद्यालय फुलचिंचोळी, महाराष्ट्र विद्यालय बार्शी, नारायण काका आगाशे कनिष्ठ महाविद्यालय श्रीपूर, कर्मवीर माध्यमिक विद्यालय चारे, आर्या पब्लिक स्कूल पिंपळनेर, नूतन माध्यमिक विद्यालय, कुर्डुवाडी, रामभाऊ जोशी हायस्कूल करकंब, शिक्षण विभाग पंचायत समिती पंढरपूर आदी शाळेतील स्काऊट गाईड पथक सहभाग घेतले. स्वच्छता कार्य संपल्यानंतर विनोद शिंदे यांच्याकडून अल्पोपहार देण्यात आले. नामदेव पायरी व पांडुरंगाच्या शिखराचे दर्शन करुन सेवा कार्याची सांगता करण्यात आली.

# तू मला खूप आवडतेस असे म्हणत विवाहितेचा केला विनयभंग

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि. १३ जुलै-**

तू मला खूप आवडतेस असे म्हणून जवळ ओढून एका ३५ वर्षीय विवाहित महिलेचा विनयभंग करुन तिच्या पतीस लोखंडी रॉडने डोक्यात मारुन जखमी केले. तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी उमेश शिवाजी पवार,कुमार (पुर्ण नाव माहित नाही) या दोघा विरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे.




पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी, यातील पिडीत महिला दि. ११ जुलै रोजी रात्री ११.३० सुमारास राहते घरासमोर फिर्यादी व तिचा पती अंगणात झोपले असताना पिडीतेच्या ओळखीचे वरील आरोपी यांनी येऊन पिडीतेस झोपेतून उठवून हात धरुन तू मला खूप आवडतेस असे म्हणत जवळ ओढून मिठीत घेण्याचा प्रयत्न केला. तू माझ्या बरोबर बाजूला चल असे म्हणून मनास लज्जा वाटेल असे वर्तन केले. यावेळी पिडीतेचे पती यांना आरोपी उमेश पवार यांनी पाठीमागून घट्ट मिठी मारुन दुसरा आरोपी कुमार याने लोखंडी रॉडने डोक्यात मारुन गंभीर जखमी केले. तसेच शिवीगाळी करीत जीवे मारण्याची धमकी दिली असल्याचे सदर पिडीतीने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस हवालदार काळे हे करीत आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# जिल्हाधिकारी या आठवड्यात अभ्यागतांना भेटणार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ जुलै-**

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद हे दि. १४ जुलै ते १८ जुलै २०२५ या एकाच आठवड्यासाठी दररोज दुपारी ४ ते सायंकाळी ६ या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालय येथे अभ्यागतांना भेटणार आहेत. तरी जिल्ह्यातील नागरिकांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे. आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद हे पंढरपूर येथील नियोजनात व्यस्त असल्याने प्रत्येक आठवड्याच्या सोमवार व शुक्रवार रोजीच्या अभ्यागतांच्या भेटी रद्द करण्यात आलेल्या होत्या. तरी दि. १४ ते १८ जुलै या कालावधीत दररोज ते नागरिकांना भेटणार आहेत.

# मंगळवेढ्यात एकाच रात्री दोन घरफोड्या

- **चोरटे सापडत नसल्यामुळे मंगळवेढा पोलीस निष्क्रीय ठरत असल्याचा नागरिकांमधून आरोप**


**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा, दि. १३ जुलै**

मंगळवेढा शहरातील धर्मगाव रोडवर अज्ञात चोरटयाने दोन घरफोड्या करुन घरातील रोख रक्कम व सोन्याचे दागिने पळविल्याचा प्रकार घडला असून तक्रारदाराने अर्ज दिला आहे.

मागील महिन्यात दोन घरफोड्या होवून त्यामधील २ लाख ८० हजाराचा मुद्देमाल चोरुन नेल्याची घटना घडली होती. याचाही तपास सदर तपास अधिकाऱ्याला लागत नसल्यामुळे मंगळवेढ्यात घरफोडीचे सत्र सुरु असल्याने नागरिक भितीने हवालदिल झाले आहेत.

मंगळवेढा शहरातील धर्मगाव रोडवरील मेटकरी कॉलनीत तक्रारदार परमेश्वर आनंदा कोळी व अभिजीत शिवाजी लोखंडे यांचे दि.१२ रोजी पहाटे १ ते ४ या वेळी अज्ञात चोरट्याने दरवाज्याचे कोयंडे तोडून घरात प्रवेश केला. परमेश्वर कोळी यांचा टि.व्ही. चोरुन नेला. तसेच अभिजीत लोखंडे यांचे घरातील कपाटात ठेवलेले सोन्याचे बदाम, कर्णफुले, पैंजण व एक हजार रुपये रोख चोरीला गेले असल्याचे अर्जात नमूद करण्यात आले आहे. अन्य एका व्यक्तीच्या बंगल्याचे कुलूप न तुटल्याने चोरीचा प्रयत्न फसला गेला असल्याचे सांगण्यात आले. पोलीसांनी घरफोडीचा गुन्हा न नोंदवता केवळ अर्जावर भागविल्याने तक्रारदारामधून पोलीस प्रशासनाविरुध्द नाराजी व्यक्त केली आहे. याच परिसरात मागील महिन्यात इकबाल मुलाणी यांचा बंगला फोडून फिर्यादीचा एक लाखाचा मुद्देमाल चोरुन नेला. त्याचबरोबर पांडुरंग नागणे यांच्या बंद घराचे कुलूप तोडून कपाटात ठेवलेले पन्नास हजार रुपये रोख व विविध सोन्याचे दागिने असा १ लाख ८० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल दोघांचा मागील महिन्यात चोरुन नेला होता.

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या समोर एका चार चाकी चालकाने दहा लाखाची बॅग गाडीत ठेवली होती. ती हातोहात चोरल्याने गुन्हाही दाखल आहे.



**मंगळवेढा : चोरट्याने बंगल्याचे कडी कोयंडा तोडून छायाचित्रात कपाटातील अस्ताव्यस्त टाकलेले कपडे.**

दामाजी चौकातील राणी कापरे यांचे दुकान फोडून चोरट्याने २० ते २५ हजाराची कपडे चोरुन नेले होते. या सर्व चोरीचा तपास अद्यापही पोलीसांना लागत नसल्यामुळे पोलीस प्रशासन निष्क्रीय ठरत चालल्याच्या संतापजनक प्रतिक्रीया नागरिकामधून व्यक्त होत आहेत. सक्षम अधिकारी नसल्यामुळे अशा चोरीच्या घटना घडून नागरिकांना नाहक त्रास सोसावा लागतो आहे. ग्रामीण भागातील चोरांचाही तपास अद्याप पोलीसा अधिकाऱ्यांना लागलेला नसल्यामुळे मंगळवेढ्याचे पोलीस करतात तरी काय? असा सवाल सुज्ञ नागरिकामधून केला जात आहे. सतत होणाऱ्या चोऱ्या व पोलीसांना न लागणारा तपास मंगळवेढा शहरवासीय भयभीत आहेत.

कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी अतुल कुलकर्णी यांनी गांभीर्यपुर्वक मंगळवेढ्यात लक्ष घालून तात्काळ झालेल्या चोऱ्यांचा तपास लावून नागरिकांना दिलासा दयावा, अशी मागणी जोर धरत आहे. दरम्यान शहराजवळील बायपास रोड जवळ परवा चोरी करण्याच्या उद्देशाने नागणेवाडी परिसरात चोरटे आले होते. मात्र, तेथील नागरिक जागे झाल्याने आठ चोरटे पळुन गेल्याचेही सांगण्यात आले. मेटकरी कॉलनीतील चोरट्याने जाताना एका घराबाहेर असलेल्या पाच हजाराचा रनींग बुट चोरुन नेला.

# महत्वाचे...

## बहिणीशी फोनवर का बोलतो म्हणून युवकावर खुनीहल्ला

**सोलापूर, दि. १३ जुलै-**



बहिणीशी फोनवर का बोलतो म्हणून एका तरुणावर धारदार शस्त्राने वार करून गंभीर जखमी केल्याची घटना मंद्रूप येथे घडली. या प्रकरणी एकाविरुद्ध मंद्रूप पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. सिद्धाराम मधुकर ख्याडे (रा. मंद्रूप, तालुका दक्षिण सोलापूर) असे गंभीर जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, मंद्रप-टाकळी रस्त्याने सिद्धाराम ख्याडे हा मोटारसायकलवरून शेताकडे जात असताना सातप्पा म्हेत्रे यांच्या शेताजवळ तो आल्यानंतर तरूणांनी त्याला अडवले. तू बहिणीशी फोनवर का बोलतो, तुला सोडणार नाही, असे म्हणत मारू लागला. तेव्हा संशयित आरोपीने त्याच्याजवळील धारदार शस्त्राने डोक्याच्या पाठीमागील बाजूला व खांद्यावर वार करून गंभीर जखमी केले. जखमी ख्याडे यांनी आरडाओरडा करताच आरोपीने तेथून पळ काढला. ओरडण्याचा आवाज ऐकून जवळील वस्तीवरील लोक धावत आले. त्यांनी ओळखून जखमी ख्याडे यांच्या भावास याची माहिती दिली. त्यानंतर त्याला गंभीर जखमी अवस्थेत रुग्णवाहिकेतून सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. त्याचा भाऊ मळसिद्ध ख्याडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून एका तरुणाविरुद्ध मंद्रूप पोलिस ठाण्यात गंभीर जखमी करून खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पीएसआय राजकुमार डांगे करीत आहेत.

## येणकी येथे पूर्ववैमनस्यातून मारहाण

**सोलापूर, दि. १३ जुलै-**

येणकी (ता. मोहोळ) येथे पूर्व वैमनस्यातून तरूणास लाकडाने मारहाण करून जखमी करण्यात आले. दिपक सिताराम जाधव (वय २६) असे जखमीचे नाव आहे. १३ जुलै रोजी सकाळी दहाच्या सुमारास राहत्या घराजवळ मागील भांडणाचा राग मनात धरून संघर्ष खरात याने लाकडाने व लाथाबुक्क्याने मारहाण केली. त्यामध्ये दिपक याच्या सर्वांगास मार लागल्याने त्यास उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## पाण्याच्या मोटरीचे बटण दाबताना करंट लागून महिला जखमी

**सोलापूर, दि. १३ जुलै-**

पाण्याच्या मोटरीचे बटण दाबताना करंट लागून महिला जखमी झाली. शबाना हसन मुल्ला (वय ४०, रा. हंजगी, वळसंग, ता. अक्कलकोट) असे उपचारासाठी दाखल झालेल्या महिलेचे नाव आहे. १३ जुलै रोजी सकाळी आठच्या सुमारास शबाना या राहत्या घरी पाणी भरण्यासाठी पाण्याच्या मोटरीचे बटन चालू करताना उजव्या हातास करंट लागून त्या जखमी झाल्या. त्यामुळे त्यांना उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.


## दुचाकीवरून मागच्या मागे पडून जखमी झालेल्या महिलेचा मृत्यू

**सोलापूर, दि. १३ जुलै-**

दुचाकीवरून जाताना चक्कर आल्याने मागच्या मागे पडून जखमी झालेल्या महिलेचा मृत्यू झाला. सुमन विलास गायकवाड (वय ५८, रा. खानापूर, ता. तुळजापूर) असे मरण पावलेल्या महिलेचे नाव आहे. १२ जुलै रोजी रात्री सव्वा नऊच्या सुमारास सुमन गायकवाड या दुचाकीवर बसून शेतातून घराकडे जात होत्या. त्यावेळी खानापूर टोल नाक्याजवळ त्यांना अचानक चक्कर आल्याने त्या दुचाकीवरून मागच्या मागे पडल्या. त्यात सुमन गायकवाड या गंभीर जखमी होऊन बेशुध्द पडल्याने त्यांना उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असता सुमन यांचा मृत्यू झाल्याचे डॉ. अक्षय इमडे यांनी घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## घरगुती कारणावरून महिलेस मारहाण

**सोलापूर, दि. १३ जुलै-**



देगाव येथे घरगुती कारणावरून महिलेच्या घरात घुसून तिला मारहाण करण्यात आली.माधुरी दत्तात्रेय बंडगर (वय ३०, रा. देगाव) असे जखमी महिलेचे नाव आहे. १२ जुलै रोजी रात्री माधुरी बंडगर यांच्या घरात घुसून लक्ष्मण वाघमोडे व इतर तीन लोकांनी माधुरी यांना घरगुती कारणावरून लाथाबुक्क्याने मारहाण केली. त्यामध्ये जखमी झाल्याने माधुरी यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# राज्यभर महात्मा फुले समता परिषदेचे जाळे विणणार

## माजी खासदार समीर भुजबळ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जुलै-**



गेल्या २ आठवड्यापासून महात्मा फुले समता परिषदेचे संघटन वाढविण्यासाठी मी राज्यभर फिरतो आहे. विदर्भ आणि मराठवाड्याचा दौरा पूर्ण केला असून, आता पश्चिम महाराष्ट्राचा दौरा सुरु केला असून, आज सोलापूर जिल्ह्यात पोहोचलो आहोत. या दौऱ्यात विविध जिल्ह्यात समता परिषदेच्या नव्या निवडी करुन आगामी निवडणुकांसाठी आणि ओबीसी समाज एकवटून महात्मा फुले समता परिषदेचे जाळे विणण्याचा माझा प्रयत्न असल्याची माहिती माजी खासदार समीर भुजबळ यांनी आज (दि. १३) पत्रकार परिषदेत दिली.

ते पुढे म्हणाले की, विदर्भ-मराठवाड्यात आमच्या संघटनेला चांगला प्रतिसाद मिळाला. आज सोलापूर जिल्ह्याचा मी आढावा घेवून काही निवडीही जाहीर केल्या आहेत. यामध्ये महिला अध्यक्षा म्हणून सीमाताई एकतपुरे, तर महात्मा फुले समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष म्हणून आबासाहेब खारे, बापूजी भंडारे यांच्यावर जबाबदारी टाकली आहे. आगामी काळात हे पदाधिकारी तालुकानिहाय कार्यकारिणी जाहीर करणार असून, जिल्ह्याचे ते संघटन मजबूत करणार आहेत.

सोलापूर शहराध्यक्ष आणि कार्यकारिणीबाबत मात्र काही अडचणी निर्माण झाल्याने काही दिवसांनंतर वरिष्ठ नेते छगन भुजबळ यांच्या चर्चा करून त्या निवडी जाहीर करणार असल्याचेही माजी खा. समीर भुजबळ यांनी स्पष्ट केले. आजतागायत या संघटनेच्या माध्यमातून भारतभर मेळावे घेतले आहेत, ओबीसींवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्याचे काम आम्ही केले आहे. जातनिहाय जनगणना करावी ही मागणी मी खासदार असताना २००९ मध्येच संसदेत केली होती. मात्र या आमच्या मागणीला आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी न्याय दिला असून, आता लवकरच जातनिहाय जनगणना होणार आहे. या जनगणनेसाठी येणाऱ्या शासनाच्या कर्मचाऱ्यांना महात्मा फुले समता परिषदेच्या नवनियुक्त पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी सहकार्य करावे, असेही आवाहन भुजबळ यांनी केले.

### ओबीसीमधून मराठा समाजाला आरक्षण मागू नये

मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत बोलताना समीर भुजबळ म्हणाले की, मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण मागू नये; त्यांनी स्वतंत्रपणे मराठा आरक्षणाची मागणी करावी. कारण ओबीसीला दिलेल्या आरक्षणामध्ये अगोदरच ३५० ते ४०० जातींचा समावेश आहे. ओबीसींना दिलेल्या २७ टक्के आरक्षणामध्ये १९ टक्केच आरक्षण ओबीसींना मिळते आणि उर्वरित आरक्षण व्हिजेएनटी व इतर जातींना मिळते. मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत वारंवार शासनाने जीआरही काढले मात्र त्याचा फायदा होत नाही. तरीही लोकशाही मार्गाने जरांगे पाटील यांचा लढा सुरू असल्याने आमचा त्यांना विरोध नाही.

# पैसे, सोन्यासाठी विवाहितेचा छळ करणाऱ्यांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जुलै-**

पैसे व सोन्यासाठी विवातिचा छळ करणाऱ्या पतीसह तिघांविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अंजली मेघराज मिरजकर (वय ३१, रा. प्रसाद नगर २, जुळे सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती मेघराज, सासू सुमित्रा, सासरे ईरप्पा (रा. थर्ड क्रॉस, शरावती नगर, शिमोगा, कर्नाटक) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२९ डिसेंबर २०१६ ते १८ जून २०२५ या कालावधीत अंजना या पती मेघराज यांच्यासोबत सासरी नांदण्यास होत्या. त्यावेळी सासू सुमित्रा यांनी सतत सोने दागिने बद्दल टोमणे मारून अंजली काम करत नसल्याबाबत इतरांना सांगून मानसिक त्रास देत होती. सासरे ईरप्पा यांनी अंजलीस फोनवर आई वडीलांना जास्त बोलत जाऊ नको असे म्हणून घालून पाडून बोलत होते. तर पती मेघराज याने अंजलीस तु व तुझे बाळ मला नको असे म्हणून तसेच मला दुसरे लग्न करायचे आहे असे म्हणून त्रास दिला. सासरच्या लोकांनी नांदायचे असेल तर घर बांधायला माहेरकडून १० लाख रुपये व सोने आण म्हणून शारीरीक व मानसिक छळ करून त्रास दिला. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात पती मेघराज, सासू सुमित्रा, सासरे ईरप्पा यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार गावडे पुढील तपास करीत आहेत.



# विकास बँकेच्या मोबाईल बँकिंग सेवेचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जुलै-**

विकास सहकारी बँकेने ४५व्या वर्धापन दिनी ग्राहकांसाठी मोबाईल बँकिंग सेवेचा शुभारंभ केला. न्यूरो फिजिशियन डॉ. प्रसन्न कासेगावकर यांच्या हस्ते व अॅड. उमेश मराठे यांच्या प्रमुख उपस्थितीत या सेवेचा शुभारंभ करण्यात आला.

डॉ. कासेगावकर म्हणाले, विकास सहकारी बँक ही योग्य वेळी कर्जदारांना सहाय्य करते व ग्राहक सेवेमध्ये सातत्य राखून नवनवीन सेवा प्रदान करते. अॅड. मराठे यांनी बँकेच्या आर्थिक सक्षमतेविषयी समाधान व्यक्त करून बँकेने केलेली प्रगती नेत्रदीपक असल्याचे नमूद केले. चेअरमन कमल किशोर राठी व व्हाईस चेअरमन राजगोपाल चंडक यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. बोर्ड ऑफ मॅनेजमेंट चे चेअरमन सीए राजगोपाल मिणियार यांनी बँकेच्या आजपर्यंतचा कार्याचा आढावा सादर केला. मोबाईल बँकिंग सेवेचे प्रात्यक्षिक दाखवताना सुरक्षेचे सर्व उपाय योजलेले असल्याचे व रिझर्व बँकेने आर्थिक सक्षम बँकांनाच हा परवाना दिल्याचे नमूद करण्यात आले. या सेवेमुळे बँकांशी निगडित अनेक कामेआपल्या घरातून करता येणार असल्याने वेळ आणि पैसा या दोन्हीची बचत होणार आहे.

परमपूज्य स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज यांनी व्हिडिओद्वारे या आपले आशीर्वचन प्रदान केले. यावेळी बंकाई सॉफ्टवेअर कंपनीचे प्रतिनिधी व बँकेचे मॅनेजर सीए पांडुरंग मंत्री यांचा सत्कार करण्यात आला. पाहुण्यांची ओळख संचालक राजेंद्र आसावा यांनी केली. संचालक मनीष बलदवा यांनी आभार मानले. सूत्रसंचालन श्रेया काबरा यांनी केले. यावेळी बँकेचे सर्व संचालक, सोलापूर बँक असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश वाले व सर्व संचालक तसेच विविध बँकांचे अध्यक्ष संचालक व ग्राहक उपस्थित होते.

# रिक्षा पलटी होऊन तरूणी जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जुलै-**

केगाव ते बाळे या रस्त्यावर रिक्षा पलटी होऊन झालेल्या अपघातात तरूणी जखमी झाली. याबाबत नेहा मधुकर बनसोडे (वय २२, रा. केगाव, ता. उत्तर सोलापूर) या तरूणीच्या फिर्यादीवरुन श्रावण पांडुरंग भालेकर (वय ४५, रा. केगाव) या रिक्षाचालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

१० जुलै रोजी सकाळी साडेदहाच्या सुमारास नेहा बनसोडे या श्रावण भालेकर याच्या प्रवासी रिक्षातून राहत्या घरापासून बाळ्याकडे प्रवास करीत होत्या. त्यावेळी अग्रवाल ऑटोमोबाईल समोर श्रावण भालेकर याने एमएच १३ सीटी ३४१८ क्रमांकाची रिक्षा निष्काळजीपणे चालवून पलटी केली. त्यामध्ये नेहा बनसोडे यांच्या पोटास जबर मार लागून त्या जखमी झाल्या. त्यामुळे याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा श्रावण पांडुरंग भालेकर (वय ४५, रा. केगाव) या रिक्षाचालकाविरुध्द दाखल करण्यात आला आहे. हवालदार ढोबळे पुढील तपास करीत आहेत.


# मद्य दरवाढीबाबत जिल्ह्यातील सर्व परमिट रुम आज बंद!

## परमीट रूमधारकांच्या बैठकीत घेतला निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जुलै-**

विदेशी मद्य विक्रीकर व एक्साईज ड्युटीमध्ये ६० ते ७० टक्के वाढ झाल्या कारणाने विदेशी मद्यांचे भावात वाढ झालेले आहेत. त्यामुळे ग्राहकांच्या खिशावर परिणाम होणार व बेकायदेशीर दारूच्या विक्रीमध्ये भरमसाठ वाढ होणार असल्याने सोलापूर जिल्हा परमिट रूम आज दिवसभर बंद ठेवण्यात येणार असल्याची माहिती असोसिएशन अध्यक्ष संजीव इंदापूरे यांनी दिली.

यासाठी जिल्ह्यातील परमीट रूम धारकांच्या बैठकीचे त्यांनी आज आयोजन केले होते. दिलेल्या पत्रकात त्यांनी पुढे म्हटले आहे की, विदेशी मद्य दरवाढ झाल्यामुळे प्रत्येक परमिट रूम बारच्या व्यवसायावर परिणाम होऊन विक्रिमध्ये मोठी घट होऊन, बेकायदेशीर दारू विक्रित वाढ होणार आणि स्वस्त दारू वाईनशॉपमध्ये खरेदी करून रस्त्यावर दारूचे सेवन करणाऱ्यांमुळे सामान्य नागरिकांना त्याचा त्रास भोगावा लागेल व तसेच परमिट रूमच्या विक्रीवर अगोदर व्हॅट ५% होता आता ते १० टक्के झाला असल्याकारणाने देखील भाव वाढ झालेली आहे. परमिट रूममध्ये दारूचे भाव वाढल्याकारणाने गावातील ढाबे आणि इतर खानावळीत बेकायदेशीर दारू विक्री होऊन शासनाचा कर बुडण्याचे प्रमाण वाढण्याची भीती या बैठकीत त्यांनी व्यक्त केली आहे. यामुळे मद्य विक्रीकर व एक्साईज ड्यूटीमध्ये झालेली वाढ कमी करण्यासाठी शासनाचे लक्ष वेधण्याकरिता सोलापूर जिल्ह्यातील सर्व परमिट रूम धारकांनी दि. १४ जुलै २०२५ रोजी बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आल्याचेही त्यांनी नमूद केले. या बैठकीला अजय काळे, हरिभाऊ चौगुले, संजीव इंदापुरे, उमाकांत साळुंके, आकाश हाके, पुनित बचुवार, सागर कुरापाटी, निलेश धोत्रे, अमर पाटील, सीताराम शिखरे, धुळोबा नरोटे आदींची उपस्थिती होती. आजच्या बंदमुळे सोमवारी जिल्ह्यासह राज्यातील परमिट रूम आणि बार पूर्णपणे बंद राहणार आहेत, यामुळे राज्याच्या महसुलावर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे.





सरकारने काही दिवसांपूर्वी दारूवरील व्हॅट दुप्पट केला आहे. त्यामुळे हॉटेल आणि बार उद्योगावरील आर्थिक भार वाढला आहे. त्याचबरोबर परवाना शुल्कात १५% आणि उत्पादन शुल्कात ६० % वाढ करण्यात आली असल्याने व्यापाऱ्यांना त्रासाचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे बंदची घोषणा करण्यात आली आहे.

**- संजीव इंदापुरे,** अध्यक्ष,
सोलापूर जिल्हा परमीट रूम असोशिएशन.

# जैन समाजातील विवाहांसाठी तीन नवीन उपक्रम

- **शांतीलाल मुथा यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि, १३ जुलै-**

भारतीय जैन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शांतीलाल मुथा यांनी जैन समाजाच्या युवक युवतींसाठी तीन नविन कार्यक्रमाची घोषणा संघटनेच्या पदाधिकारी व समाजाशी संवाद साधताना ऑनलाइन झूम टीम द्वारे केली. ऑनलाइन मीटिंग मध्ये राज्यभरातून १२६ जणांची उपस्थिती होती. प्रास्ताविक व स्वागत राज्य अध्यक्ष केतन शाह यांनी केले.

शांतीला मुथा म्हणाले, सध्या सामाजिक परिस्थिती बदललेली आहे या बदललेल्या सर्व गोष्टींच्या सखोल अभ्यास करून युवक युवतींच्या विवाहासंबंधी नवीन कार्यक्रम हाती घेण्यात आले आहे. विवाह फक्त एका घराशी संबधित नाही. जेव्हा युवक युवती विवाह योग्य होतात तेव्हा ही समस्या येते. युवक युवतींच्या विचारांमध्ये अमुलाग्र बदल झाले आहेत. मुला मुलींची चॉईस वेगवेगळी झाली आहे. यामुळे विवाह योग्य जोडीदार मिळवुन देण्यासाठी संघटनेच्या मुख्य कार्यालयातून मॅनेजिंग डायरेक्टर कोमल जैन व माजी अध्यक्ष प्रफुल्ल पारख यांच्या पुढाकाराने विवाहा संबंधी नविन तिन कार्यक्रम हाती घेतले आहे.



मेट्रोपोलिटीयन सिटीसाठी दिल का जिकशा, इतर शहरांसाठी परिणय पथ व तिसरा कार्यक्रम स्वाईप राईट. ३ ऑगस्ट ला पुणे येथे अविवाहित डॉक्टर युवक युवतींसाठी दिल का जकशा तर २६ ते ३० वयाच्या मुलींसाठी व २८ ते ३२ वयाच्या मुलांसाठी संभाजीनगर येथे १६ ऑगस्टला तर अहिल्यानगर येथे १७ ऑगस्टला २२ ते २६ वयाच्या मुलींसाठी व २४ ते २८ वयाच्या मुलांसाठी परिणय पथ हा कार्यक्रम विवाह घडवून आणण्यासाठी आयोजीत केला आहे. यात विवाह योग्य फक्त २५ युवक युवतींनी सहभागी होण्याचे आवाहन मुथा यांनी केले. या झूम मीटिंग मध्ये राष्ट्रीय अध्यक्ष नंदकिशोर साकला, राष्ट्रीय सचिव दीपक चोपडा आदीं उपस्थित होते. ट्रस्टी सुदर्शन जैन, राज्य सचिव प्रविण पारख, गौतमचंद संचेती, आदेश चंगडीया यांनी मनोगत व्यक्त केले.

# वडील रागावल्याने १६ वर्षीय मुलाचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. १३ जुलै -**

वडीलांनी रागावल्याने आंदेवाडी (ता. अक्कलकोट) येथे एका १६ वर्षिय मुलाने विषारी औषध प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. अमित गिरीष कलमणी (वय १६) असे उपचारासाठी दाखल केलेल्या मुलाचे नाव आहे.

१३ जुलै रोजी सकाळी दहाच्या सुमारास अमित कलमनी याने राहत्या घरी वडीलांनी रागावल्याने रागाच्या भरात पिकावर फवारणी करण्याचे औषध प्राशन केले. त्यामुळे अमित यास त्रास होऊ लागल्याने उपचारासाठी भाऊ कल्याणी याने सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.






## महत्वाचे...

### प्रा. बी.एस. कोरे-नवले यांना पीएच.डी.

**सोलापूर, दि. १३ जुलै-**

मंद्रूप येथील संतोष भीमराव पाटील महाविद्यालयातील वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. बी. एस. कोरे-नवले यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाची पीएच.डी. पदवी जाहीर झाली. त्यांनी पश्चिम महाराष्ट्रातील गारमेंट उद्योगातील मानव संसाधन व्यवस्थापनाचा अभ्यास या विषयावर छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालयाचे निवृत्त प्राचार्य डॉ. ए. एन. बारबोले यांच्या मार्गदर्शनाखाली शोधप्रबंध सादर केला.त्यांचे सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळ संस्थेचे पदाधिकारी व प्राचार्य डॉ. एम.एन. जगताप आदींनी अभिनंदन केले.



### अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव अध्यक्षपदी सचिन अडसुळे

**सोलापूर, दि. १२ जुलै-**

जीवन संघर्ष प्रतिष्ठान आयोजित साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती उत्सव अध्यक्षपदी सचिन अडसुळे यांची निवड करण्यात आली. अॅड. शैलेश पोटफोडे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच अॅड. राहुल रुपनगर, रमेश बोराडे, विजय अडसुळे यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक पार पडली. यावेळी रोहन कामने, संतोष हटकर, आदित्य आडगळे, ऋषीकेश हजारे, आदित्य आडगळे, अनिकेत शिंगाडे, अविष्कार हजारे, सचिन हजारे उपस्थित होते. बैठकीचे सूत्रसंचालन संस्थापक अध्यक्ष हिरालाल आडगळे यांनी केले.इतर पदाधिकारी असे : उपाध्यक्ष देवा चांदणे, क्रिश अडसुळे, सचिव सागर कांबळे, सहसचिव संतोष एकपोटे, कार्याध्यक्ष अक्षय आडगळे, कोषाध्यक्ष सनी आडगळे, जयंती नियोजन प्रमुख संतोष हटकर, अभिषेक आडगळे, मिरवणूक प्रमुख संजय अडगळे.



### मार्केट यार्डातून ८० हजारांची दुचाकी लंपास

**सोलापूर, दि. १२ जुलै-**

शहरातील मार्केट यार्डातून चोरट्याने ८० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत बडुआण्णासाहेब श्रीमंत माने (वय ४२, रा. रविवार पेठ, जोशी गल्ली, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १२ मार्च रोजी सकाळी बडु माने यांनी त्यांची एमएच १३ ईएम ७५६१ क्रमांकाची दुचाकी ही मार्केट यार्ड येथे पार्क करून भाजी आणण्यासाठी गेले होते. ती दुचाकी चोरट्याने चोरून नेल्याची नोंद जेलरोड पोलिसांकडे करण्यात आली आहे. पोलिस हवालदार बाबर पुढील तपास करीत आहेत.

### कारच्या धडकेने दुचाकीस्वार जखमी

**सोलापूर, दि. १२ जुलै-**

कारच्या धडकेने दुचाकीस्वार जखमी झाला. याबाबत संगमेश्वर गुरुनाथ खेडकर (वय ३०, रा. शांती अपार्टमेंट, न्यु संतोष नगर, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन नासीर शौकत मुलाणी (रा. माहिती नाही) याच्याविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ४ जुलै रोजी नासीर मुलाणी याने त्याच्या ताब्यातील एमएच १४ एफएक्स ३८०८ क्रमांकाची कार निष्काळजीपणे चालवून संगमेश्वर खेडकर याच्या एमएच १३ सीएच १९६१ यास धडक दिली. यामध्ये खेडकरला मार लागून फ्रॅक्चर झाले. हवालदार जमादार पुढील तपास करीत आहेत.

### रोनक फॅशन दुकानातून ८० हजारांचा मोबाईल लंपास

**सोलापूर, दि. १२ जुलै-**

शहरातील नवी पेठेतील रोनक फॅशन या दुकानात कपडे खरेदी करण्यासाठी गेलेल्या व्यक्तीचा ८० हजार रुपये किंमतीचा मोबाईल चोरट्याने चोरून नेला. याबाबत नजीर नबीलाल शेख (वय ५२, रा. केशव नगर, चुना भट्टी, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ९ जुलै रोजी सायंकाळी नजीर शेख हे नवी पेठेतील रोनक फॅशन येथे मुलांच्या शाळेचे कपडे खरेदी करण्यासाठी गेले होते. त्यावेळी गर्दीचा फायदा घेत चोरट्याने शेख यांच्या पॅन्टच्या खिशातून ८० हजार रुपये किंमतीचा मोबाईल चोरून नेला. पोलिस नाईक भिमदे पुढील तपास करीत आहेत.

# जनमेजयराजे सहवेदना जाणणारे महामानव

## शिवव्याख्याते शिवरत्न शेटे यांचे प्रतिपादन

## फत्तेसिंह संस्था व सकल मराठा समाजातर्फे नागरी सत्कार







**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट : दि १३ जुलै**

पालखी परिक्रमेतुन जनमेजयराजे भोसले यांनी अवघा महाराष्ट्र पिंजुन काढला. परिणामी आज लाखोंची गर्दी अक्कलकोटमध्ये दिसत आहे. अक्कलकोटमध्ये जन्म होणे महापुण्याई आहे. जनमेजयराजे हे कोटीतील एक नांव आहे. बॉर्न टु वीन म्हणजेच विजयासाठी जन्माला आलेला. पुरग्रस्त, भुंकुपग्रस्तांना मदत करताना सहवेदना जाणवली. ज्याला संवेदना असते तो महामानव असतो. त्यामुळे जनमेजयराजे महामानव असल्याचे प्रतिपादन शिवव्याख्याते शिवरत्न शेटे यांनी केले.

श्री फत्तेसिंह शिक्षण संस्था,अक्कलकोट व सकल मराठा समाज, अक्कलकोट यांच्या संयुक्त विद्यमाने श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांचा भव्य नागरी सत्कार व मानपत्र प्रदान समारंभ प्रियदर्शनी सांस्कृतिक भवन येथे उत्साहात पार पडला. यावेळी शिवव्याख्याते शिवरत्न शेटे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सर्जेराव जाधव चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष अॅड.शरदराव फुटाणे होते. यावेळी व्यासपीठावर श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले, सचिव शामराव मोरे, अन्नछत्र मंडळ उपाध्यक्ष व लायन्स क्लबचे अध्यक्ष अभय खोबरे, भाऊ कापसे, राजीव माने, बाळासाहेब मोरे, दिलीप सिद्धे, लाला राठोड, अमर शिंदे, तानाजी चव्हाण, सुधाकर गोंडाळ, संतोष फुटाणे-जाधव यांची प्रमुख उपस्थितीती होती. श्री. शेटे पुढे म्हणाले, जनमेजयराजे यांनी कोविड काळात रूग्णालय सुरु केले. जनमेजयराजे तुम्ही ३०० निराधारांना जे दररोज दोनवेळचे डबे पुरविताय हे तुम्हाला संत पदाला घेऊन जाते. पुरग्रस्त, भुकंपग्रस्तांना मदत करताना जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांची सहवेदना जाणवली. ज्याला संवेदना असते तो महामानव असतो. दररोज ३०० निराधारांना समर्थ प्रसादाच्या माध्यमातून घरपोच जेवण पोहोचविणारे तुम्ही संत आहात. यामुळे हा सत्कार केला जात आहे असे गौरवोद्गार त्यांनी काढले. अध्यक्षीय समारोप करताना अॅड सर्जेराव जाधव यांनी जनमेजयराजे परीस असल्याने त्यांच्या सानिध्यात आलेल्यांचा उत्कर्ष झाल्याशिवाय राहत नसल्याचे सांगितले. सत्कारमुर्ती जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले म्हणाले, फत्तेसिंह संस्था व सर्जेराव जाधव चॅरिटेबल ट्रस्ट यालाही मदत करू. मराठा मंदिर श्री शहाजी प्रशाला वर्गखोल्या नुतनीकरणासाठी मदत केली आहे. हरित अक्कलकोट साठी प्रयत्न करत असतो. भव्य महाप्रसाद गृह स्वामींच्या कृपेने साकारात आहे. सर्व पदाधिकारी यांची मोलाची साथ असते. यावेळी दहावी परिक्षेत मुलीत प्रथम आल्याबद्दल शेजल जाधव फुटाणे व एमपीएससीत निवड झाल्याबद्दल वैष्णवी गायकवाड यांचा सत्कार करण्यात आला.

स्वागत व प्रास्तविक माजी अध्यक्ष राजीव माने यांनी केले. बाळासाहेब मोरे यांनी मानपत्राचे वाचन केले. यावेळी फत्तेसिंह संस्थेचे उपाध्यक्ष अमर शिंदे, संचालक बाळासाहेब मोरे, तानाजी चव्हाण, स्वामीराव पाटील, शिवाजीराव पाटील, राम गायकवाड, अविनाश मडिखांबे, तम्मा शेळके, सोपान निकते, मुख्याध्यापक शरद जंगाले, सुभाष गडसिंग, मनसे तालुकाध्यक्ष मल्लिनाथ पाटील, रवी कदम, विठ्ठल मोरे, अरूण जाधव, प्रा.प्रकाश सुरवसे, प्रभाकर मजगे, सायबण्णा जाधव, बाबासाहेब निंबाळकर, दत्तात्रय पाटील, विक्रांत गोडसे, शिवराज स्वामी, रवी कदम, विठ्ठल चव्हाण, विलास गव्हाणे, राजेश पडवळकर, ज्योतीबा नवले, ताराबाई हांडे, नितीन मोरे, अरविंद शिंदे, संजय सोनटक्के, महादेव माडेकर, प्रदीप जगताप आदीसह बहुसंख्य नागरिक उपस्थित होते. सुत्रसंचालन श्वेता हुल्ले यांनी केले तर आभार संतोष जाधव-फुटाणे यांनी मानले.


### पुणेरी पगडी अन् चांदीची तलवार

अक्कलकोटच्या इतिहासात अन्नछत्र मंडळाच्या माध्यमातून जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांनी अक्कलकोटचे नाव आता सातासमुद्रापलीकडे पोहोचले आहे. त्यांना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाकडून जीवन गौरव पुरस्काराने गौरविण्यात आले. ही बाब अक्कलकोटकरांसाठी अत्यंत अभिमानास्पद असून, यामुळेच जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांचा सत्कार करण्यात आला. पुणेरी पगडी, चांदीची तलवार, मानपत्र, शाल, हार गुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

# शहरात तिघांच्या आत्महत्या, तिघांचाही मृत्यू

## एकाने तिसऱ्या मजल्यावरून उडी मारली; दोघांनी गळफास घेतली

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ जुलै -**



विजापूर रोडवरील कुबेर कॉम्प्लेक्सच्या तिसऱ्या मजल्यावरून उडी मारून तरूणाने आत्महत्या केली. ही घटना शनिवारी मध्यरात्रीच्या सुमारास घडली. राजपाल बनवारी राजपूत (वय २५, रा. मौलाली चौक) असे आत्महत्या करणाऱ्या तरूणाचे नाव आहे. राजपाल राजपूत याने शनिवारी रात्री दहाच्या सुमारास विजापूर रोडवरील कुबेर कॉम्प्लेक्सच्या कुबेर बिल्डींगच्या तिसऱ्या मजल्यावरून खाली उडी मारली. त्यामध्ये राजपूत याच्या डोक्यास गंभीर दुखापत होऊन तो जखमी झाला. याबाबत विजापूर नाका पोलिस ठाण्याला माहिती मिळताच पोलिस हवालदार व्हि डी गायकवाड यांनी घटनास्थळी येऊन जखमी राजपूत यास शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. अक्षय इमडे यांनी राजपूत यास मृत घोषित केले.

दुसऱ्या घटनेत एमआयडीसीमधील भावनाऋषि नगरात गळफास घेऊन एकाने आत्महत्या केली. नागनाथ सदानंद यलदंडी (वय ४०, रा. प्लॉट नं. ७७, गुरूदेव नगर, एमआयडीसी, सध्या रा. प्लॉट नं. १३, भावनाऋषि नगर, आकाशवाणी केंद्राजवळ) असे आत्महत्या केलेल्याचे नाव आहे. १३ जुलै रोजी सकाळी सव्वा सातच्या पूर्वी नागनाथ यलदंडी यांनी अज्ञात कारणावरून भावनाऋषि नगर येथील राहत्या घरी साडीने लोखंडी अँगलला गळफास घेतला. ही बाब एमआयडीसी पोलिसांना समजल्यानंतर पोलिस हवालदार ए. एस. शिंदे यांनी यलदंडी यास खाली उतरवून बेशुध्दावस्थेत उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. प्रतिक माने यांनी त्यास मृत घोषित केले. तिसऱ्या घटनेत विजापूर रोडवरील मेरा भारत महान नगरात १७ वर्षिय मुलाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. ऐमन मोहमंदशफीक नदाफ (वय १७, रा. मेरा भारत महान नगर, विजापूर रोड) असे आत्महत्या केलेल्या मुलाचे नाव आहे. १३ जुलै रोजी सकाळी आठच्या सुमारास ऐमन याने राहत्या घराच्या स्लॅबच्या लोखंडी हुकाला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेतला. ही बाब निदर्शनास आल्याने नातेवाईकांनी ऐमन यास खाली उतरवून विजापूर नाका पोलिस ठाण्यातील पोलिस हवालदार वाय डी जाधव यांनी बेशुध्दावस्थेत ऐमन यास शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. प्रतिक माने यांनी ऐमन यास मृत घोषित केले. तिन्ही घटनांची सिव्हील चौकीत नोंद झाली आहे.

# शनिवारी गोव्यावरून विमानच आले नाही

## कंपनीने तिकीटाचे पैसे केले परत

## काहींनी रविवारचे काढले तिकीट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जुलै-**

सोलापूर-गोवा विमानसेवा सुरू होवून १ महिना झाला असून, या फ्लाय ९१ कंपनीच्या विमानाला लोकांचा प्रतिसादही चांगला मिळत आहे. दरम्यान, शनिवार, दि, १२ मे रोजीही तब्बल ५९ लोकांनी बुकींग केली होती. मात्र कंपनीच्या काही तांत्रिक कारणामुळे या दिवशी गोव्यावरुन विमानच सोलापूरला आले नाही. यामुळे अनेकांचा गोव्याला जाण्याचा हिरमोड झाल्याने संतापलेल्या काही प्रवाशांनी आपला गोवा दौराच रद्द करून तिकीटाचे पैसे परत घेतले. तर काहीजण रविवारी सकाळीच आलेल्या विमानाने गोव्याकडे मार्गस्थ झाले.




याबाबत सोलापूर विमानतळाच्या सहाय्यक व्यवस्थापिका अंजली शर्मा म्हणाल्या की, फ्लाय ९१ या ही विमानसेवा चालू झाल्यापासून विमानाला चांगले प्रवासी मिळत आहेत. या सेवेमुळे त्या कंपनीचे व्यवस्थापनही समाधानी आहे. मात्र शनिवारी त्यांच्या तांत्रिक कारणामुळे त्यांनी सोलापूरला विमानच पाठविले नाही. यामुळे गोव्यावरून सोलापूरला येणारे आणि सोलापूरहून गोव्याला जाणाऱ्या प्रवाशी बांधवांचे हाल झाले. सोलापूर आणि पंचक्रोशीतील काही नागरिकांनी शनिवारी गोव्याला जाण्यासाठी काही दिवस अगोदरच बुकींग केली होती. शनिवारी सोलापूरला विमान येण्यासाठी उशीर झाल्याने विमान येवू शकले नाही. कारण सोलापूर विमानतळावर रात्रीच्या लँडिंगची सुविधा नाही, ज्यामुळे प्रवाशांना गैरसोयीचा सामना करावा लागला. शनिवारी काही प्रवासी लातूर व विजापूरहून आले होते. तर काही जण स्थानिकचे होते. अचानक विमानसेवा रद्द झाल्याने गोव्यात ऑनलाईन हॉटेल बुकिंगचे पैसे वाया जातात, अशाही काहीजणांनी तक्रारी केल्या. दरम्यान, आम्ही सोलापूरकर समजून घेऊ. मात्र, बाहेरील प्रवाशांची यामुळे गैरसोय झाल्याच्याही प्रतिक्रिया काही प्रवाशांनी नोंदविल्या. तिकीट काढलेल्यांमध्ये कुणी रिफंड तर कुणी पुढील तिकीट घेतले आहे. शनिवारी उड्डाण रद्द झाल्यानंतर काही प्रवाशांनी परताव्याची मागणी केली तर काही प्रवाशांनी रविवारचे तिकीट खरेदी केली. यामुळे आज रविवारीही अनेक प्रवाशी गोव्याच्या टुरवर रवाना झाले.

### रविवारी ३१ प्रवाशी गोव्याला रवाना

शनिवारी तांत्रिक अडचण निर्माण झाल्याने गोव्यावरून सायंकाळी येणारे विमान रविवारी (दि. १३) सकाळीच आले आणि याद्वारे ३१ प्रवाशी गोव्याकडे मार्गस्थ झाले. तर गोव्यावरून सकाळी ५३ प्रवासी सोलापूरला आले. दरम्यान, सध्या या कंपनीच्या विमानसेवेला सोलापूर शहर आणि जवळच्या जिल्ह्यातील नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.

**- अंजली शर्मा, सहाय्यक व्यवस्थापिका**

### 'स्टार' कंपनीही मुंबईसाठी झाली सज्ज

सोलापूर आणि आसपासच्या शहरातील नागरिकांचा फ्लाय ९१ ला चांगला प्रतिसाद मिळत असल्याने ही कंपनी आता गोवा-सोलापूर-तिरूपती अशी सेवा देण्याची तयारी करीत आहे. तर स्टार कंपनीही मुंबई-सोलापूर विमानसेवा देण्यासाठी सज्ज झाली आहे. या कंपनीच्या विमानाला सध्या मुंबईत स्लॉट मिळत नसल्याने ही सेवा थांबली असली तरी ऑगस्ट महिन्यात ही सेवा कार्यान्वित होवून सोलापूरहून मुंबईला जाणाऱ्या प्रवाशांचीही आता लवकरच सोय होणार आहे.

**- केतन शहा, सदस्य सोलापूर विकास मंच**

# शालेय पदकप्राप्त व सहभागी राष्ट्रीय खेळाडूंना शिष्यवृत्ती मंजूर

## कागदपत्रे जमा करण्याचे जिल्हा क्रीडाधिकारी नरेंद्र पवार यांचे आवाहन




**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १२ जुलै-**

गतवर्षातील पदकप्राप्त व सहभागी शालेय राष्ट्रीय खेळाडूंना राज्य शासनाच्या क्रीडा व युवक सेवा खात्याकडून शिष्यवृत्ती मंजूर झाली आहे. सुवर्ण पदक विजेत्याला ११ हजार २५०, रौप्यला ८ हजार ९५०, ब्राँझला ६ हजार ७५० तर सहभागासाठी ३ हजार ७५० रुपयाची शिष्यवृत्ती मिळणार आहे. संबंधित खेळाडूंच्या वैयक्तिक खात्यात ही रक्कम ऑनलाईनने जमा करण्यात येणार आहे. संबंधित खेळाडूंनी आधार कार्ड, खेळाडूचे बँक पासबुक किंवा कॅन्सल चेक आणि प्राविण्य प्राप्त/सहभाग प्रमाणपत्राची छायांकित प्रत कुमठा नाका येथील कार्यालयात जमा करावी, असे जिल्हा क्रीडाधिकारी नरेंद्र पवार यांनी कळविले आहे.

**शिष्यवृत्तीची रक्कम मिळालेले खेळाडू विद्यार्थी असे :**

**सुवर्ण** : गाथा आनंदराव खडके, गौरी राजेंद्र दावरी, कृष्णा संभाजी शिंदे, प्रगती योगेश घाडगे, रेश्मा सागर लोकरे(२), सायली उज्वल माने, शिवम राजेंद्र चिखले (धनुर्विद्या), श्रीगणेश प्रशांत उडता (डायव्हिंग), गौरी विश्वपुत्र पाटील (तलवारबाजी), आश्विनी गोविंद मांडवे, प्राजक्त सोमनाथ बनसोडे (खो-खो), विक्रम सिद्धेश्वर वाघमारे (रग्बी), नंदिनी सचिन सर्वगोड, स्वरुप सुरेश चव्हाण (शूटींग),केतकी नागेश चौगुले (सॉफ्ट टेनिस), अथर्व संतोष खेंडे, ओम दत्तात्रय बंडगर, ओम जिवलाल खलडकर, श्रीराम जितेंद्र घोडके, यश सचिन कदम (सॉफ्टबॉल), मनस्वी राजशेखर माने(२), रणवीर राजेंद्र खाडे (३), श्रावणी प्रताप सुर्यवंशी (३), श्रीगणेश प्रसाद उडता (जलतरण), शालिनी अण्णासाहेब चंदनशिवे (तायक्वांदो), संजीवनी शिवाजी ढाणे, शिवानी प्रदीप कर्चे (कुस्ती), अमृता विनायक सरगुले (योगासन).

**रौप्य** : रेश्मा सागर लोकरे, सायली उज्वल माने, स्मृती शशिंकात विरपे (धनुर्विद्या), ध्रुव दिनेश पाटील (बुद्धिबळ), श्रीगणेश प्रशांत उडता (डायव्हिंग), अमित महादेव कांबळे, अथर्व बालाजी सुर्यवंशी, पियुष तुकाराम खलसोडे, तसमिया इसाक मुल्ला(कबड्डी), अकबर दावल शेख, अरमान शब्बीर शेख, शंभूराजे विशाल चंदनशिवे (खो-खो), संकेत श्रीशैल लिगाडे (२), विपुल ऋषिकेश कुडक्याल (जलतरण)



**ब्राँझ** : जयहिंद नारायण जगताप, रेहान अकबर मुलाणी, रेश्मा सागर लोकरे (२), स्मृती शशिंकात विरपे (धनुर्विद्या), हर्षवर्धन महेश पाटील (बेसबॉल), रितेष गुरुमुर्ती लिगाडे (डायव्हिंग), सर्वेश नागेश स्वामी (मॉडर्न पेंटॅथलॉन), सायली संतोष सोलनकर, सूजल जयंत रणदिवे, सूयश लहू भोसले(रग्बी), नंदिनी सचिन सर्वगोड (शूटींग), हर्षदा अंबादास गोली, मनस्वी राजशेखर माने (जलतरण), पृथ्वीराज रमेश कोकाटे, सौरभ तानाजी मिस्कीन (कुस्ती),

**सहभाग** : आदित्य अण्णासाहेब पवार, ईशान सुदीप शहा, निखिल अनिल शिंदे, पृथ्वीराज सावता घाडगे, सिद्धार्थ निलेश साखरे, (धनुर्विद्या), पूजा तुळशीराम राठोड, तन्वीर सलीम सय्य्द (अॅथलेटिक्स), आर्यन मंगलसिंग साळुंके, अथर्व संदीप थोरात, दानीश हमीद शेख, ज्योतीरादित्य आनंद देशमुख (बास्केटबॉल), मानस सुमूख गायकवाड (बुद्धिबळ), संचिता सचिन सपाटे (क्रिकेट), आभा उज्वल मलजी, अपुर्वा सुषमा अंधारे (डायव्हिंग), अमृत्ता दत्तात्रय शृंगारपुरे, मधुरा संतोष माळी, प्रांजली राजशेखर कोरे, श्रावणी दिपक शिंदे, श्रेयस दत्ता वाघमारे, ज्ञानेश्वर रमेश पाटील (तलवारबाजी), आकांक्षा महेश मोरे, कोमल चंद्रकांत पाटील, प्रज्ञा बाळासो माने, प्राजक्ता चंद्रकांत सावंत, श्रेया बाळासो माने, विजय नागनाथ जाधव, विव्हान विनोद गरड (हँडबॉल), अंकुश किरण हुक्केरी, झिशान मैनुद्दीन मेलीनमनी (हॉकी), आकृती नारायण सोनकुसरे (लॉन टेनिस), ओम निलेश वरवडकर (मॉडर्न पेंटॅथलॉन), भक्ती प्रभाकर नागणे, समरजित सुमीत कदम (स्पीक टक्रॉव), तनूज अजित संचेती, विपष्यना प्रसाद सोनवणे (सॉफ्ट टेनिस), सर्वेश नागेश स्वामी (जलतरण), अब्दुलशरीफ शब्बीर हर्चीरकर, वैष्णवी चंद्रकांत अदलिंगी (व्हॉलिबॉल), साईराज प्रदीप ननवरे (वुशू).

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ११७७

**तरी आर्जव ते ऐसें । प्राणाचें सौजन्य जैसें ।**
**आवडे तयाही दोषें । एकचि गा ।।**

ज्ञानी भक्त आपल्याला जे-जे चांगले-वाईट प्राप्त झाले असेल, ते-ते सर्व आपलेच मानून तो पोटात घालतो. तो हे सर्व सहन करतो, त्याला या सहन करण्याचे आश्चर्यही वाटत नाही. हे सर्व सहन करणे, हा त्याचा स्वभाव होऊन बसतो. ज्ञानी भक्तांबद्दल तसेच त्याचा स्वभाव, वर्तन यावर चर्चा करुन झाल्यावर आता भगवंत आर्जव म्हणजे काय ? याबद्दल बोलत आहेत. सुर्य तोंड पाहून प्रकाश देत नाही तर तो सर्वांना सारखाच प्रकाश देतो. आकाश सर्व जगाला सारखीच पोकळी देतो. त्याप्रमाणे आर्जवाचे मूर्तिमंत प्रतिक असणाऱ्या व्यक्तिचे मन मित्र, शत्रू आणि उदासी अशा वेगवेगळया माणसांशी प्रेम-व्देष आणि उपेक्षा अशा वेगवेळया भावनांनी युक्त नसते. तसेच त्याचे वर्तन देखील वेगळे वेगळे नसते. त्याला सर्व जगच परीचयाचे, आपले वाटत असते. हा आपला, हा परका ही भाषा त्याच्या मनाला शिवतही नाही. त्याला सर्व समान वाटतात. त्याप्रमाणे आर्जवाचे असते. आर्जवाबद्दल



पुढे बोलतांना भगवंत म्हणाले, तरी आर्जव ते ऐसें । प्राणाचें सौजन्य जैसें । आवडे तयाही दोषें । एकचि गा ।। अर्थात, ज्यास आर्जव संबोधले जाते ते असे की, जसे प्राणाचे प्रेम कोणासंबधीही असेना का? ते सर्वावरच एकसारखे असते.

प्राण्याच्या स्वभावाप्रमाणे तो कोणाशीही, कोणत्याही व्यक्तिशी सहज मिसळून जातो. त्याचे मन कोणाशीही, कोणत्याही व्यक्तीशी सहज मिसळून जाते. त्याचे मन कोणाविरुध्दही विकल्प ठेवत नाही. वाऱ्याची धाव जशी सरळ, त्याप्रमाणे त्याच्या मनाचे धर्म असतात. आई पुढे येण्यास मुलाला जशी शंका वाटत नाही. तसे लोकांसमोर आपली मनोवृत्ती प्रकट करतांना त्याला अवघड वाटत नाही. उमललेल्या फूलांना, कमळांना सुगंध पसरविण्यास जशी मर्यादित जागा नसते, त्याप्रमाणे कोणाशीही गुप्त गोष्टी करण्याकरीता तो कानाकोपरा जाणत नाही. याची दृष्ठी कपटी नसते बोलणे संशयास्पद नसते आणि तो कोणाबरोबरही हलक्या दृष्टीने वागत नाही. अमृतधारे प्रमाणे त्यांचे अंत:करण सरळ असते. या सर्व लक्षणांनी युक्त असणारा व्यक्ति आर्जव म्हणून ओळखला जातो. अशा व्यक्तिच्या ठिकाणी ज्ञान आपले वास्तव्य करीत असते. आपणाला खऱ्या ज्ञानाच्या प्राप्तीची गरज आहे. हे प्राप्त होण्यासाठी आपल्यात उपरोक्त लक्षणांचा शिरकाव होणे आवश्यक आहे. आपल्या दृष्टीत कपट आले नाही, आपली दृष्टी सम झाली, आपल्यातून आप-पर हा भेद निघून गेला तर आपल्यात ज्ञान आपोआप प्रवेश करेल असे ज्ञान आपल्यात आले तर आपणाला व आपल्याबरोबर इतरांना खऱ्या सुखाची अनुभुती येईल. म्हणून संत महात्म्यांच्या सांगण्यानुसार अर्जवांची सर्व लक्षणे आपल्यात येणे आवश्यक असल्याने आपण ही लक्षणे आपल्यात येतील असे पाहू या. मानसिकता सकारात्मक असेल तर हे अवघडही नाही.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : सोमवार | दिनविशेष- चांगला दिवस |
| दि. १४ जुलै २०२५ | संकष्टी चतुर्थी |
| विक्रम संवत् २०८१ | चंद्रोदय : रा. ९.४८ |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - आषाढ | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ.चतुर्थी (२३.५९) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - ग्रीष्म | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - धनिष्ठा (०६.४८) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - आयुष्मान (१६.१३) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - बव (१२.३३) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : मन उत्साही राहिल्यामुळे आजचा दिवस चांगला जाईल. लांब रहात असलेल्या नातेवाईकांकडून फायदा मिळेल. व्यापार चांगला चालेल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**वृषभ** : आपल्याला नवीन संधी मिळतील. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. कार्यक्षेत्रात प्रगती होईल. दुसऱ्याच्या कामात हस्तक्षेप करू नका. प्रवास सुखकारक राहील.

**मिथुन** : आर्थिक फायदा झाल्यामुळे आनंदी रहाल. व्यापारात प्रगती होईल. खाण्या पिण्याकडे लक्ष द्या. कौटुंबिक वातावरण सहकार्याचे राहील.

**कर्क** : मुलांच्या कार्यक्षेत्रातील शुभ बातम्या प्राप्त होतील. नौकरीमध्ये अधिकारी आपल्याला सहकार्य करतील. घाई गडबडीने कोणतेही काम करू नका.

**सिंह** : कौटुंबिक वातावरण आनंदी असल्यामुळे आपले कामात लक्ष लागेल. सामाजिक प्रतिष्ठेत वाढ होईल. पैशाच्या बाबतीत असलेली चिंता दूर होईल. वहान चालवतांना सावधानी बाळगली पाहिजे.

**कन्या** : मनोबल वाढल्याने तणाव कमी होईल. मुलांचे प्रेम मिळेल. व्यापारात नवीन योजनाचा शुभारंभ होईल. आपल्या व्यसनांना चालना देऊ नका.

**तुळ** : चांगल्या लोकांच्या गाठी होतील ते आपले हिंतचिंतक असतील. प्रवास सावधानीने करावा. योजना कार्यान्वयीत होतील. एखादे अवघड काम झाल्याने आनंदी रहाल.

**वृश्चिक** : सकारात्मक विचार कराल. आपल्या कामाचे समाजात प्रशंसा होईल. व्यापारिक कामे यशस्वी होतील. जोखमीचे काम करण्यापासून सावधान रहा.

**धनु** : आनंदी बातमी कळेल. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. स्वत:च्या विचाराने कामे केले तर फायदेशीर रहाल. आर्थिक योजना वेळेत पूर्ण होतील. आळस करू नका.

**मकर** : नवीन कामाशी संबंध येण्याचा योग आहे. कोणत्याही कामात स्पर्धक म्हणून राहण्यातच आपला फायदा आहे. खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

**कुंभ** : सुख समृध्दीत वाढ होईल. अपूर्ण कामे पूर्ण होण्याचे मार्गावर. प्रवासाचा योग आहे. व्यापार व्यवस्याय भरभराटीवर. निष्कारण वाद विवाद टाळा.

**मीन** : आपले स्वप्न पूरे होतील. जुन्या संबंधामुळे कामे यशस्वी पार पडतील. कामाची गती अशीच राहू द्या. व्यापारा निमित्ताने केलेला प्रवास सफल होईल. अश्वासन देऊ नका.

# मराठा आरक्षणाबाबत आवाज उठवण्यासाठी मी कटिबद्ध

## खा. प्रणिती शिंदे यांचे जरांगे पाटील यांना आश्वासन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जुलै-**

मराठा समाजाचा मोर्चा २९ ऑगस्टला निघणार आहे. ५८ लाख नोंदी सापडलेल्या आहेत. यावरून मराठा आणि कुणबी मराठा एकच आहे. त्या अनुषंगाने कायदा पारित करावा. लोकप्रतिनिधींनी आम्हाला कायदा पारित करण्यासाठी सहकार्य करावे. मराठा आरक्षणाबाबत लोकसभेत आवाज उठवावा यासह विविध मागण्यांचे निवेदन मनोज जरांगे पाटील यांनी खा. प्रणिती शिंदे यांना दिले. मराठा आरक्षणाबाबत संसदेत सर्वप्रथम मीच आवाज उठवलेला होता. यापुढेही मराठा आरक्षणाबाबत आवाज उठवेन, मी सदैव कटिबद्ध असेल असे खा. प्रणिती शिंदे यांनी जरांगे पाटलांना सांगितले.

मनोज जरांगे पाटील हे सर्व आमदार आणि खासदारांची संवाद साधत आहेत. याच अनुषंगाने खासदार प्रणिती शिंदे यांनी मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. मराठा आरक्षणासाठी लढणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांच्या भेटीसाठी अंतरवाली सराटी येथे सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी शनिवारी भेट घेतली. मराठा समाज आपल्या पाठीशी उभे राहिल्याने आपण निवडून आलात.

लोकसभेमध्ये मराठा आरक्षणाबाबत आवाज उठवावा. अशा विविध मागण्यांचे निवेदन मनोज जरांगे पाटील यांनी खासदार प्रणिती शिंदे यांना दिले. यावेळी चेतन नरोटे, माऊली पवार, विनोद भोसले, गणेश डोंगरे, श्रीरंग लाळे, महेश पवार, मनोज यलगुलवार, मनोज मोरे व आदी उपस्थित होते.



## मनपा मुलांची मराठी शाळेत गुरुपौर्णिमा साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जुलै-**

मनपा मुलांची मराठी शाळा क्रमांक २९ भवानी पेठ येथे आज गुरुपौर्णिमेनिमित्त एक आगळावेगळा आणि संस्कारमय पाद्यपूजन सोहळा पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात सर्व विद्यार्थ्यांनी पालकांवर पुष्पवृष्टी करत त्यांच्या स्वागताने केली. प्रास्ताविक मुख्याध्यापक नवनाथ माळी यांनी केले. अरुण डोके यांनी पाद्यपूजनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांचे पाय धुवून त्यांना हळदीकुंकू लावले, पुष्प अर्पण केले, मिठाई देऊन गुलाबाचे फूल देत कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी पालक प्रतिनिधी अरुणा सचिन गुळसकर यांनी मनोगत व्यक्त केले. राजश्री शेंडगे यांनी महापालिका शाळांचे वेगळेपण सांगितले. सूत्रसंचालन अविनाश हिंगणे यांनी केले. कांचन गोपाळकर यांनी आभार मानले.



## नूतन प्रशासनाधिकारी विठ्ठल ढेपे यांचा जय भारत शाळेकडून सत्कार

**सोलापूर, दि. १२ जुलै-**

नूतन प्रशासनाधिकारी विठ्ठल ढेपे यांचा जय भारत प्राथमिक शाळेकडून सत्कार करण्यात आला. यावेळी सचिव दिपक फुले, मुख्याध्यापक नारायण सूर्यवंशी, किरण गाटे, लक्ष्मण गोंड, भाऊसाहेब गवळी, शामसुंदर हल्लेनवरु उपस्थित होते. महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या प्रशासन अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार माध्यमिकचे उपशिक्षणाधिकारी विठ्ठल ढेपे यांच्याकडे सोपविण्यात आला.

## सेवासदन प्रशाला येथे शालेय मंत्रीमंडळ निवडणूक व स्थापना उपक्रम



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जुलै-**

सु. रा. मुलींची प्रशाला सेवासदन येथे भारतीय लोकशाही पद्धती, मतदानाचा हक्क, आचार संहिता यांची माहिती विद्यार्थिनींना होण्यासाठी इतिहास विभागातर्फे स्वराज्य सभा निवडणूक घेण्यात आली. इयत्ता ८वी, ९वी व १०वीतील सर्व विद्यार्थिनी व ५ वी ते ७ वी च्या स्वराज्य सभा प्रतिनिधी यांनी पंतप्रधान, उपपंतप्रधान, सभापती, उपसभापती या पदासाठी उमेदवारांना ऑनलाइन गुप्त मतदान केले.

विद्यार्थिनींनी अतिशय व्यवस्थित व शांततेत मतदान केले. संगणकावर विद्यार्थी मतदारांनी मतदानाचा अनुभव घेतला . या उमेदवारांमधून पंतप्रधान पदी तनया संजय देशपांडे, उपपंतप्रधानपदी श्रेया सिध्देश्वर वराडे, सभापती पदी जान्हवी प्रशांत गायकवाड तर उपसभापती पदी स्वरांजली हरिश्चंद्र चव्हाण यांनी मताधिक्याने विजय प्राप्त केला. निवडून आलेल्या विद्यार्थिनींचा इतिहास प्रमुख मीनल उदनूर यांनी सांगितल्या प्रमाणे शपथविधी समारंभ घेण्यात आला. मुख्याध्यापिका राजेश्री रणपिसे यांनी विद्यार्थिनींना शालेय शिस्तीचे महत्त्व सांगितले. या निवडणुकीसाठी रेवणसिद्ध कट्टे, अमित देशपांडे, स्मिता कोर्टीकर, रुपाली पवार, रत्नप्रभा हजारे , स्वप्ना केळकर, स्नेहल बागवडे सतीश घंटेनवरू, जयवंत दुरुगकर, वंदना लामतुरे, मीरा जमादार, प्रीती मेकाले, रोहिणी निराळे, लक्ष्मी कमळे, मेघना देव यांनी सहकार्य केले. यावेळी उपमुख्याध्यापिका नंदिनी बारभाई, पर्यवेक्षिका स्वाती पोतदार, शिक्षक प्रतिनिधी मीरा जमादार आदी उपस्थित होते. सूत्रसंचलन सतीश घंटेनवरू यांनी केले .

## सर्वांगीण प्रगतीसाठी लोकसंख्या नियंत्रण व व्यवस्थापन आवश्यक : डॉ. येळेगावकर




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जुलै-**

भारत जरी जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असली तरी भारत अमेरिका, ऑस्ट्रेलिया, जपान, चीन या प्रगत देशांच्या तुलनेत दरडोई उत्पन्नात, मानव विकास निर्देशांकात, साक्षरतेत, स्त्री पुरुष समानतेत खूपच मागे आहे. कुटुंब नियोजनही जनतेची चळवळ झाली पाहिजे, असे प्रतिपादन प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेचे मार्गदर्शक प्रा डॉ.श्रीकांत येळेगावकर यांनी केले.

ते फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा व संगमेश्वर कॉलेज स्वायत्त यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त आयोजित प्रबोधन शिबिरात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संगमेश्वर कॉलेजचे प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा हे होते. यावेळी व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. सुहास पुजारी, राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख प्रा. डॉ. अण्णासाहेब साखरे, फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड आदी उपस्थित होते. प्रा. डॉ. एन. बी. तेली यांच्या हस्ते मान्यवरांचा बुके सत्कार करण्यात आला.कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजनेचे बहुसंख्य विद्यार्थी, प्रा. राजकुमार मोहरकर, प्रा. डॉ. शिवाजी मस्के, प्रा. डॉ. मंजू संगेपांग, प्रा. डॉ. संगीता कामत उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक प्रा. डॉ. अण्णासाहेब साखरे यांनी केले. सूत्रसंचालन आमदार गायकवाड यांनी केले तर आभार डॉ. सुहास पुजारी यांनी मानले.



## भावसार प्रतिष्ठानतर्फे गुणवंतांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जुलै-**

भावसार प्रतिष्ठान मार्फत भावसार समाजातील दहावी, बारावी, पदवीधर विद्यार्थ्यांचा सत्कार शिवस्मारक येथे नुकताच पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ. विजयकुमार देशमुख हे होते. तर प्रमुख उपस्थिती महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे हे होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते हिंगलजमाता प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

या कार्यक्रमात १२० विद्यार्थ्यांनी नोंदणी केलेली होती. या कार्यक्रमात दहावीमध्ये प्रथम आलेले कृष्णा दुधनकर (९८.८०), सुरज अंबुरे (९८.६०), पावनी हिबारे (९७.४०) तसेच बारावीत प्रथम आलेले शुभम लोकरे (९७.४०), आर्यन महिंद्रकर (९३.३०), हरी अंबरकर (९४.४२) तसेच इंजिनीअरिंग मध्ये प्रथम आलेले निनाद नवले (८४.८०), श्रावणी हिबारे (९०.००), पूनम महिंद्रकर (९०.१२) शीतल रंगदळ (८७.०९) या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी सोलापूर पतसंस्था फेडरेशन अध्यक्ष दिलीप पतंगे भावसार प्रतिष्ठानचे अध्यक्ष गिरीश माळवदकर, सचिव अरुण आकुडे, सुनील डोईजोडे , सतीश हिबारे, उल्हास डोइजोडे, नवीन तपासे, महेश बाबलादी, सुभाष पाखरे दिनेश माळवदकर हे उपस्थित होते.

सूत्रसंचालन गोपीनाथ नवले यांनी केले. कार्यक्रमास अनिल कॅम चे मालक लक्ष्मीकांत रंगदळ उपस्थित होते. तसेच विजय पुकाळे, शशिकांत रंगदळ, हिंगुलंबीका देवी देवालय ट्रस्टचे श्रीकांत अंबुरे तसेच रवि खमितकर, सुभाष वैकुंठे, संतोष आकुडे, राजेंद्र मिरजकर, साई क्षीरसागर, अनील खमितकर, सौ शोभा आकुडे, श्रीमती स्मिता क्षीरसागर, सुनीता क्षीरसागर उपस्थित होते. कार्यक्रमाचे समारोप सचिव अरुण आकुडे यांनी केला.

# शेतकरी हलाखीचे जीवन जगतोय

## प्रकल्पग्रस्तांच्या मेळाव्यात बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मनोज चव्हाण यांचे प्रतिपादन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १३ जुलै-**

ज्या शेतकऱ्यांनी सर्वस्वाचा त्याग करून राज्यात धरणं उभी करण्यासाठी सरकारला आपल्या जमिनी घरे कवडीमोल दराने देऊन राज्य सुजलाम सुफलाम करण्यासाठी मदत केली. आज तोच प्रकल्पग्रस्त शेतकरी सरकारच्या उदासीन धोरणामुळे अत्यंत हलाखीचे जीवन जगत असल्याचे बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटना महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष मनोज चव्हाण यांनी सांगितले. १२ जुलै रोजी उपलप मंगल कार्यालयात जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्तांचा संवाद मेळावा बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेचे वतीने आयोजित केले होते.

### पावसाळी अधिवेशनात मांडणार : आमदार सुभाष देशमुख

आमदार सुभाष देशमुख यांना बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेच्या शिष्टमंडळाने संबंधित विषयातील निवेदन देण्यात आले. सदर मुद्दा चालू पावसाळी अधिवेशनात मांडणार असल्याचे आमदार सुभाष देशमुख यांनी आश्वास्त केले आहे. प्रकल्पग्रस्तांची संघटीत शक्तीच न्याय मिळवून देण्यासाठी आवश्यक असल्याचे मत संघटनेचे प्रवक्ते अरुण पाटील तायडे व्यक्त केले.

उजनी धरणाच्या कालव्यासाठी तत्कालीन सरकारने सब जिल्हा उत्तर सोलापूर मधील मौजे देगाव, बसवेश्वर नगर, प्रताप नगर, नेहरू नगर, सोरेगाव, कुमठे या भागातून उजनी देगाव कालव्यासाठी येथील शेतकऱ्यांचे उदरनिर्वाहाचे एकमेव साधन असलेल्या मौल्यवान जमिनी १८९४चा भूसंपादन कायदा अस्तित्वात असताना सुद्धा ६ जून २००६ला तत्कालीन सरकारने एक परिपत्रक निर्गमित करून अत्यंत कवडीमोल दराने सरळ खरेदी करुन घेतल्यात व येथील शेतकऱ्यांचे न्यायालयात दाद मागण्याचे मुलभूत संवैधानीक अधिकार सुध्दा हिरावून घेतले अशा प्रकारे सरकारने शेतकऱ्यांची कायदेशीर फसवणूक केली. वास्तविक पाहता कालव्याच्या बुडीत क्षेत्रात संपादित करण्यात आलेला ग्रामीण जमीनीचा येरीया हा १९९२ मध्ये सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट करण्यात आला होता. त्यामुळे संपादित जमीला महानगर क्षेत्रासाठी लागु असलेले रेडीरेक्नर (बाजार मुल्य) देणे अपेक्षित होते. परंतु तसे तत्कालीन सरकारने न करता शुध्दपणे शेतकऱ्यांची फसवणूक केली असल्याचे येथील शेतकरी सांगत आहेत. अशाच प्रकारचा अन्याय विदर्भातील शेतकऱ्यांवर झाला होता. विदर्भातील शेतकऱ्यांनी बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मनोज चव्हाण यांच्या नेतृत्वात गेली दहा वर्षे प्रचंड असा संघर्ष केला. त्यांच्या संघर्षाची दखल घेऊन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी हेक्टरी पाच लाख रुपये सानुग्रह अनुदान मंजूर करून १६६३२ हेक्टरसाठी ८३२ कोटी रुपये मंजूर केले आहेत. त्याच धर्तीवर येथील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदान मंजूर करण्याचा घाट सरकारकडे केला आहे.

या मेळाव्याला संघटनेचे प्रवक्ते अरुण पाटील तायडे. जिल्हाध्यक्ष विठ्ठल राठोड, सदस्य राजू लोणकर, शुभम डोणालकर, विजय पाटील, अमोल गायकवाड, शिवराज गायकवाड, नांदुरकर, बोबडे, गोपाळ पवार, अशोक राठोड, संभा जाधव, अशोक कराळे, श्याम जाधव, प्रकाश गायकवाड, दिपक पवार, सातप्पा कोरे करीम शेख आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विठ्ठल राठोड यांनी केले. सूत्रसंचालन रेखाताई टाकळीकर यांनी केले. श्रीय बोबडे यांनी आभार मानले.

# चार महिन्यांपासून जलजीवन मिशनला निधी नाही

## निधीअभावी मक्तेदारांची आर्थिक कोंडी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जुलै -**

जलजीवन मिशन योजनेला गेल्या चार महिन्यापासून शासनाने एक रूपयाचाही निधी दिले नाही. त्यामुळे जलजीवन मिशनचे कामे जैसे थे तर आहेतच, शिवाय काम पूर्ण झालेले जवळपास ७३ कोटी मागणीचे बिले प्रलंबित आहेत . यामुळे मक्तेदारांची आर्थिक कोडीं झाली आहे. निधीअभावी जलजीवनची कामे अर्धवट तर आहेतच शिवाय या कामामुळे गावातील पाणी पुरवठा योजनेचा बट्ट्याबोळ झाला आहे. शासनाने कोट्यावधी रूपये खर्च करून ही योजना आणली असली तरी निधी अभावी सध्या या योजनेला घरघर लागली आहे.

### ७३ कोटी रूपयाची बिले तयार

सोलापूर जिल्ह्यासाठी जलजीवन मिशन योजनेच्या कामासाठी ९ कोटी रूपयाचा निधी मिळाला होता. मार्चनंतर अद्याप निधी मिळाला नाही. त्यामुळे जिल्ह्यातील जलजीवन मिशनची शासनाकडे सुधारित १३४ प्रस्ताव पाठविले आहेत. सध्या आमच्याकडे जवळपास ७३ कोटी रूपयाचे बिले तयार आहेत.

**- संजय धनशेट्टी, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा**

### मक्तेदारांना शिक्षा कशासाठी ?

शासनाने जलजीवन मिशन योजनेसाठी निधी देत नसल्यामुळे मक्तेदार आर्थिक अडचणीत आले आहेत. यासह चौकशीमध्ये अडकलेल्या १८९ कामाचे बिले दिली पाहिजेत. कारण यामध्ये मक्तेदारांना विनाकारण शिक्षा कशासाठी ? अनेक मक्तेदारांनी उसनवारी करून या कामासाठी पैसे गुंतविले परंतु आता निधीच येत नसल्याने बाजारातील पत मक्तेदारांची घसरली आहे. अधिकाऱ्यांकडून कामे करण्यासाठी तगादा लावले असून त्यासाठी दंड देखील दिवसाला लावला आहे. परंतु बिलेच निघत नसल्यामुळे पुढील कामकरणे कठीण झाले आहे. **-मोतीराम राठोड, अध्यक्ष ठेकेदार असोसिएशन**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघातर्फे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचा सत्कार

**पंढरपूर, दि. १३ जुलै-**

आषाढी वारीत २५ लाखापेक्षा जास्त वारकरी भाविकांची संख्या असून देखील वारीमध्ये कुठलाही अनुचित प्रकार न करता योग्य नियोजन करून वारी निर्विघ्न पार पाडल्याबद्दल डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष राजा माने यांच्या मार्गदर्शनात संघाच्या वतीने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद तसेच प्रांत अधिकारी सचिन इथापे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके व नगरपरिषदेचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांचा शाल, पुष्पहार, व पुस्तकांचा संच देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हाध्यक्ष प्रवीण नागणे, शहराध्यक्ष सचिन कुलकर्णी, तालुकाध्यक्ष तानाजी जाधव, तालुका उपाध्यक्ष नामदेव लकडे, अजित देशपांडे, सोहन जयस्वाल, दिनेश खंडेलवाल, उपस्थित होते.



### शिष्यवृत्ती परीक्षेत पिसेवाडी शाळेचे विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत

**वेळापूर, दि. १३ जुलै-**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिसेवाडी येथे इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा शाळा व्यवस्थापनचे अध्यक्ष अण्णासाहेब शेंडे व उपाध्यक्ष अमोल राऊत यांच्या हस्ते पार पडला. जिल्हा गुणवत्ता यादीत आलेली श्रुती पिसे व स्वराज पिसे या दोघांचा फेटा बांधून गोल्ड मेडल देऊन सत्कार करून पुढील शैक्षणिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या व इतर पात्र विद्यार्थ्यांना मेडल देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच मार्गदर्शक शिक्षिका वंदना देशमुख, त्या विद्यार्थ्यांचे माता पालक अमोल पिसे, चैताली पिसे, अश्विनी पिसे आदींचा सन्मान करण्यात आला. अण्णासाहेब शेंडे यांनी ग्रामीण भागातील मुलांना स्पर्धा परीक्षेची आवड निर्माण व्हावी यासाठी स्पर्धा परीक्षेची पुस्तके उपलब्ध करून देण्याचे सांगितले. सरपंच मोहन भाकरे, उपसरपंच भाऊसाहेब पिसे, गटशिक्षणाधिकारी सुषमा महामुनी, केंद्रप्रमुख बापूसाहेब नाईकनवरे यांनी अभिनंदन केले. कार्यक्रमासाठी सदस्या पुष्पा पिसे, शाळेचे मुख्याध्यापक जालिंदर बनकर, सयाजी माने, बिंटू खाडे, संध्या माळी, वंदना देशमुख, प्रशांत पाटील, अवंती सिंदफळकर उपस्थित होते.



### लंम्पीमुळे माळशिरस तालुक्यात पशुधन संकटात; लसीकरणाचे प्रमाण वाढवण्याची मागणी

**वेळापूर, दि.१३ जुलै-**

सध्या माळशिरस तालुक्यात लंम्पी स्किन डिसीज या महाभयंकर विषाणूजन्य आजारामुळे पशुधनावर गंभीर संकट ओढवले आहे. या परिस्थितीत पशुसंवर्धन विभाग मात्र दुर्लक्ष करत असून, शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान वाढत असल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) चे माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे यांनी पशुसंवर्धन विभागावर ताशेरे ओढत, पशुसंवर्धन विभागाने आता तरी गांभीर्याने काम करावे. जर पशुसंवर्धन विभागाने काही दिवसांत ठोस पावले उचलली नाहीत, तर शेतकऱ्यांचे प्रश्न ऐरणीवर आणण्यासाठी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा सरतापे यांनी दिला आहे. सर्व गावांमध्ये लसीकरणाचे व्यापक जाळे निर्माण करून प्रत्येक जनावराला लंम्पी प्रतिबंधक लस देणे अत्यावश्यक आहे. जनजागृतीसाठी शेतकरी मेळावे, मार्गदर्शन शिबिरे आयोजित करून आजाराचे गांभीर्य आणि प्रतिबंधात्मक उपायांची माहिती देणे गरजेचे आहे. प्रशासनाची जबाबदारी ठामपणे पार पाडावी शेतकऱ्यांच्या मते आजारी जनावरांच्या उपचारासाठी वैद्यकीय सुविधा, औषधे, आणि पशुवैद्यकीय पथके वेळेवर पोहोचत नसल्यामुळे त्यांना खासगी उपचारांवर भरमसाठ खर्च करावा लागत आहे. शासनाच्या योजनांचा लाभ प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नाही असे सरतापे यांनी सांगितले.



### बोंडले येथे रविंद्र लोंढे पुण्यतिथीनिमित्त शालेय साहित्य वाटप

**वेळापूर, दि. १३ जुलै-**

बोंडले ता. माळशिरस येथील रवींद्र लोंढे यांच्या तृतीय पुण्यस्मरणा निमित्त शालेय साहित्य रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे व सोलापूर जिल्ह्यातील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे सर्व पदाधिकारी व बोंडले ग्रामस्थ यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वह्या व खाऊचे वाटप करण्यात आले यावेळीजिल्हा अध्यक्ष सोमनाथ भोसले, जितेंद्र बनसोडे, मलिंद सरतापे, किरण धाईजे, प्रविण साळवे, अजित मोर, दशरत नविगिरे, मारुती खांडेकर, पोपट गेजगे, कोळसे सर, गणेश सावंत, गणेश भालशंकर, बि टी शिवशरण, महेद्र लोंढे, उद्धव मोरे, राजू बिले, ऋतिक लोंढे, दिनेश जाधव, गुलाब मुलाणी, रविंद्रभाऊ लोंढे मित्र परिवाराचे कार्यकरते यावेळी उपस्थित होते.

# लाखो भक्तांपर्यंत पोहोचली मदत पुनर्वसन विभागाची वारी

## दोन्ही पालखी मार्ग आणि पंढरपुर यात्रेत राबवले अभियान

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १३ जुलै-**

आषाढी वारीनिमित्त दरवर्षी लाखो वारकरी भाविक भक्त संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यात पायी वारीमध्ये सहभागी होत असतात. याच पायी वारीत मदत व पुनर्वसन विभागाच्या वतीने पहिल्यांदाच प्रचार व प्रसिद्धी अभियान वारी उपक्रम राबविला असून तो यशस्वीपणे पार पडला. पालखी मुक्कामी वारकरी मनोरंजन व प्रबोधनात्मक पद्धतीने जनजगृती करण्यात आली. त्यास वारकरी व भाविक भक्तांनी भरभरुन प्रतिसाद दिली.



मदत व पुनर्वसन कॅबिनेट मंत्री मकरंद आबा पाटील यांच्या संकल्पनेतून विभागाच्या विविध योजनांच्या प्रचार व प्रसिद्धीकरीता हे अभियान राबविण्यात आले. संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज पालखी मार्गावर व पंढरपुर यात्रा कालावधीमध्ये दि. २७ जुन ते १० जुलै २०२५ दरम्यान हे प्रचार व प्रसिद्धी अभियान संपन्न झाले. या प्रचार व प्रसिद्धी अभियान वारीत विविध लोककलांचा समावेश करण्यात आला होता. किर्तन, पारंपारिक वासुदेव, भारुड, पथनाट्य, चित्ररथ व एलईडी व्हॅन्स याव्दारे विभागाने राबविलेले निर्णय आणि योजनांची प्रसिद्धी करण्यात आली. दोन्ही पालखी मार्गांवर १०० हून अधिक कलाकारांनी या अभियानात सहभाग घेऊन जनजागृती केली. या कलाकारांनी मदत व पुनर्वसन विभागाचे निर्णय व काम वारीमध्ये प्रभावी मांडले. तसेच पालखी विसावा व पालखी तळ आणि पंढरपुर शहराच्या विविध प्रवेशद्वारांवर योजनांची माहिती देणारे क्लेक्स लावण्यात आले होते. सेल्फी पॉईंट व माहितीपत्रकांच्या माध्यमातून वारीत सहभागी झालेल्या शेतकरी बांधव व नागरिकांपर्यंत विभागाची माहिती पोहचविण्यात आली. विभागाच्या योजना व निर्णय यावर आधारित माहितीपट, छोट्या फिल्म्स व जिंगल्स यांचेही एलईडी व्हॅन्सच्या माध्यमातून वारीत प्रसारण करण्यात आले.विभागाची माहिती नागरिकांपर्यंत पोहचविण्यासाठी सोशल मिडियाचा प्रभावी वापर करण्यात आला. सोशल मिडियावर प्रचंड प्रतिसाद मिळाला असून काही व्हिडिओज मिलियन लोकांनी पाहिले. लोणंद येथे उभारण्यात आलेले स्वागतपर भव्य व आकर्षक कटआऊट सर्वांचे लक्ष वेधून घेणारे ठरले आहे.

तसेच ईसबावी येथील झिप हॉटेल समोर विभागाने वारीतील वारक-यांचे स्वागत करण्यासाठी व्यासपीठ उभारण्यात आले होते. याठिकाणी वारकरी बांधवांना विभागाच्या वतीने दोन दिवस भाविक भक्तांना मोफत हजारो पाणी बॉटल्सचे वाटप करण्यात आले होते. लोणंद येथे मोफत जेवण व पाणी वाटप करण्यात आले. पंढरपुर यात्रा कालावधीत हे अभियान एसटी स्टॅंन्ड, रेल्वे स्टेशन, चंद्रभागा वाळवंट, गोपाळपुर व ६५ एकर आदी परिसरात सुरु ठेवण्यात आले होते. मदत व पुनर्वसन विभागाच्या प्रचार व प्रसिद्धी अभियानाची सुरुवात विभागाचे मंत्री मकरंद आबा पाटील व सह सचिव संजय इंगळे यांच्या हस्ते लोणंद येथे करण्यात आली होती.

# राजेराय मठात एक लाख भाविकांनी घेतले दर्शन

### दाळ मृदुंगाच्या गजरांत जयघोष; ५८ जणांनी केले रक्तदान

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि.१३ जुलै**

येथील श्री स्वामी समर्थ महाराज यांचे शुभ हस्ते स्थापन केलेल्या श्री राजेराय मठातील पादुकाचे सुमारे एक लाखाहून अधिक भाविक भक्त दर्शन घेऊन टाळ- मृदंगाचा गजरात 'श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ'चा अखंड जयघोष करीत गुरुपौर्णिमा उत्सव मोठ्या जल्लोषात साजरा केली. यावेळी झालेल्या शिबीरात ५८ जणांनी रक्तदान केले.






श्री राजेराय मठाचे अध्यक्ष ॲड. शरद फुटाणे, उपाध्यक्ष विकास दोडके, सचिव डॉ. किसन झिपरे यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या दहा दिवसांपासून विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित केले होते. यावेळी महाराष्ट्र व कर्नाटक राज्यातील हजारो भाविकांनी पहाटेपासून दर्शनाचा लाभ घेतला. पहाटे मठात स्वामी महाराज यांच्या काकडा आरती सोहळ्यानंतर पादुका व सद्गुरू बेलानाथ बाबांच्या मूर्तीची अभिषेक घालून महापूजा करण्यात आली. सकाळी सहा वाजता बंगळुरु येथील पल्लवी, विजय, उद्योगपती वसंतराव रामपूरे (पुणे) व मठाचे सर्व पदाधिकारी यांच्या हस्ते महापूजा, नैवेद्य आरती करण्यात आली. त्यानंतर सुजाता दोडके, ज्योती झिपरे, श्रध्दा मंगरूळे, निला व सरोजा सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत सहस्रनामावली पठण करत 'श्रीं'च्या पादुकावर व बाबांच्या समाधीवर सामुदायिक अभिषेक करण्यात आले. त्यानंतर गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. दुपारी महाप्रसाद वाटप करण्यात आले.मंदिरात केलेली विविधरंगी फुलांच्या माळांची आकर्षक सजावट अशा भक्तिमय वातावरणात पहाटे नगरप्रदक्षिणा, व्यासपूजा आणि पाद्य पूजासह विविध धार्मिक कार्यक्रम करण्यात आला. शुक्रवारी सायंकाळी गोपाळकाला करून दहा दिवसीय गुरुपौर्णिमा महोत्सवाची सांगता मोठ्या मंगलमय वातावरणात संपन्न झाला. या सोहळ्यात सुमारे एक लाखाहून अधिक भाविक सहभागी झाले होते.

सोलापूरच्या डॉ. हेडगेवार रक्तपेढीच्या सहकार्याने आयोजित शिबिरात ५८ जणांनी रक्तदान केले. शतकवीर रक्तदाते अभिजित लोके यांनीसुध्दा १०५ व्यांदा रक्तदान केले. विविध प्रकारच्या फुलांनी सजविलेल्या श्री स्वामी समर्थ महाराज मूर्तीसह मुख्य गाभारा, मंडप आणि श्री बेलानाथ महाराज समाधी स्थळामुळे भाविकांचे मन प्रफुल्लित झाले.

सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मठाचे विश्वस्त ॲड. अनिल मंगरुळे, दत्तात्रय मोरे, विजयकुमार गाजूल, ओमप्रकाश तळेकर, धनंजय गायकवाड, श्रीकांत ग्रामोपाध्ये, सतीश पाटील, रविकांत पाटील,सिध्दाराम पुजारी, विशाल मंगरुळे, शिवराज दिंडोरे, समर्थ होटकर, विक्रम पाटील, महादेव बेंद्रे, संतोष हरवाळकर, शिवप्पा पुजारी आदींसह भक्तगण, सेवाभावी कार्यकर्तेनी परिश्रम घेतले.

## शाळा व्यवस्थापन समितीच्या संचालकपदी प्रा. संजय पाटील

**तभा वृतसेवा**
**पिलीव दि १३ जुलै -**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विदयालय व रमेश खलीपे ज्युनिअर कॉलेजच्या शाळा व्यवस्थापन समितीच्या संचालकपदी पत्रकार व सामाजिक कार्यकरते प्रा संजय ज्ञानेश्वर पाटील यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली.



कर्मवीर भाऊराव पाटील विदयालय व रमेश खलीपे ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य अशोकराव बागल सर यांच्या अध्यक्षतेखाली निवडीसाठी पाचवी ते बारावी पर्यंतच्या सर्व पालकांची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी पालक अतुल नष्टे, नबाजी मदने ,अंकुश भैस,तानाजी लोखंडे, समशेरसिंग रजपुत, प्रमोद भैस यांच्या सह अनेक पालक शिक्षक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रा संजय पाटील यांच्या हया निवडीबद्दल माळशिरसचे माजी आमदार रामभाऊ सातपुते, भाजपचे महाराष्ट्र कार्यकारिणी सदस्य के .के पाटील, कुसमोडचे सरपंच शहाजी लेंगरे,माजी जिल्हा परिषद सदस्य गणेशदादा पाटील, माजी सरपंच तुषार लवटे, पिलीव पत्रकार संघ,भाजपचे जिल्हा अध्यक्ष शिवराज पुकळे, राहुल मदने,माजी विदयार्थी संघटना आठवणी ९५, यांच्यसह विविध क्षेत्रातील मान्यवराकडुन त्यांचे अभिनंदन व कौतुक होत. निवडीनंतर प्रा संजय पाटील यांनी आपण मिळालेल्या संधीचा आपण विदयार्थनची गुणवत्ता वाढ, विद्यार्थनच्या अडी अडचणी, तसेच शाळा ,कॉलेजच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षक ,पालक ,विद्यार्थी यांच्या सहकार्याने विशेष प्रयत्न करणार आहे.

# वटवृक्ष देवस्थानचे कार्य सर्व सांप्रदायांना आदर्शवत

### श्री संत तुकाराम महाराजांचे वंशज हभप अमोल महाराज मोरे देहूकर यांचे मनोगत

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि . १३ जुलै -**

संतांचिये गावी प्रेमाचा सुकाळ । नाहीं तळमळ दुःखलेश ।। तेथें मी राहीन होऊनि याचक । घालितील भीक तेचि मज ।। या संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील ओवीस अनुसरुन श्री स्वामी समर्थांच्या चरणी जो भक्त नतमस्तक होतो त्याचा योग क्षेम स्वामी चालवितात. वारकरी सांप्रदाय व दत्त सांप्रदाय मधील भाविकांची लक्षणीय संख्या लक्षात घेता श्री स्वामी भक्तांना कमीत कमी वेळेत सुलभ स्वामी दर्शन घडविण्याचे मंदीर समितीचे कार्य खुप महान आहे. या अनुशंगाने श्री.वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे कार्य सर्व सांप्रदायांना आदर्शवत असल्याचे मनोगत श्रीक्षेत्र देहू येथील श्री संत तुकाराम महाराजांचे ११ वे वंशज तथा वारकरी संप्रदाय, इतिहास, मूर्ती आणि मंदिरे अभ्यासक ह.भ.प. अमोल महाराज मोरे देहूकर यांनी व्यक्त केले.



ते नुकतेच आपल्या सहकाऱ्यांसमवेत येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदीरास भेट देवून श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मंदीर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी ह.भ.प.अमोल महाराज मोरे देहूकर व त्यांच्या समवेत असलेले ह.भ.प. दिनेश महाराज मोरे, ह.भ.प.निलेश महाराज मोरे, प्रविणजी गायकवाड, संजय सांडभोर-पाटील, सतीश दादा जाधव यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देवून यथोचित सन्मान केला. यावेळी ह.भ.प. अमोल महाराज मोरे देहूकर यांनीही महेश इंगळे यांचा संत तुकाराम महाराजांची मुर्ती देवून सन्मान केला. यावेळी बोलताना ह.भ.प.अमोल महाराज मोरे देहूकर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. मंदिर समितीच्या कार्याला आमची सदैव साथ आणि शुभेच्छा असल्याचे मनोगतही व्यक्त केले. या प्रसंगी मंदीर समितीचे विश्वस्त महेश गोगी, बाळासाहेब एकबोटे, श्रीशैल गवंडी, अंकूश केत, गिरीश पवार, श्रीकांत मलवे आदीसह भाविक उपस्थित होते.

# दर्शन रांगेतील उड्डाणपुलात उतरला विद्युत करंट; तीन कुत्र्यांचा मृत्यू

### वारी ओसरल्याने टळली मनुष्यहानी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१३ जुलै -**

पंढरपुरातील आषाढी यात्रा संपताना एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मात्र विठ्ठलाच्या कृपेने खूप मोठा अनर्थ टळला. दर्शन रांगेतील उड्डाणपुलात विद्युत करंट उतरून तीन कुत्र्यांना आपला जीव गमवावा लागला आहे. आषाढी यात्रा संपत आल्याने भाविकांची गर्दी कमी झाली असली तरी देखील अजूनही दर्शन रांग ही गोपाळपूर पत्रा शेडकडे जाणाऱ्या मार्गावर असते. याच दर्शन रांगेत पंचमुखी मारुती मंदिराच्या समोर असणाऱ्या उड्डाण पुलावर सायंकाळी कर्मचाऱ्यांच्या मूर्खपणामुळे वीज प्रवाह असलेली वायर पडली आणि विजेचा प्रवाह या उड्डाणपूल व शेजारील रांगेत उतरला.

विठ्ठलाच्या कृपेमुळे या भागातील दर्शन रांग थोडी पुढे गेली होती आणि यामुळे या उड्डाण पुलावर भाविक नव्हते. मात्र जेव्हा या उड्डाणपुलाला कुत्रे चिटकले आणि काही क्षणातच ते तडफडू लागले. त्याच्या पाठोपाठ इतर दोन कुत्रेही अशाच पद्धतीने विजेचा झटका लागून तडफडल्यावर परिसरातील नागरिकांना हा धक्कादायक प्रकार समजला आणि त्यांनी तात्काळ विद्युत विभागातील कर्मचाऱ्यांना बोलावून घेतलं. या कर्मचाऱ्यांनी तात्काळ आधी हा विजेता प्रवाह खंडित केला आणि नंतर तुटलेल्या धोकादायक वायर बाजूला काढल्या. मात्र हा सर्व प्रकार मंदिराची दर्शन रांग बनविणाऱ्या एका मूर्ख कर्मचाऱ्यांमुळे घडल्याचे समोर आले आहे.

दर्शन रांगेत लावलेले स्पीकर सोडवताना त्याने हिसका देऊन वायर तोडली आणि ती वायर तशीच या उड्डाण पुलावर पडली आणि अडकली. आज पुन्हा विठ्ठलाच्या दर्शनाची रांग या पुलाच्याही पुढे गेली असून काल सायंकाळी विठ्ठलाच्या कृपेने या ठिकाणी कोणताही भाविक रांगेत उभा नव्हता. अन्यथा संपूर्ण आषाढी यात्रा व्यवस्थित झाली असताना एक खूप मोठी दुर्घटना घडू शकली असती. आता या प्रकाराला जबाबदार असणाऱ्या आणि भाविकांच्या जीविताशी खेळ करणाऱ्या सर्वांवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

> **तीन कुत्र्यांचा निष्पाप बळी**
>
> कर्मचाऱ्यांच्या मूर्खपणामुळे वीज प्रवाह असलेली वायर पडली आणि विजेचा प्रवाह या उड्डाणपूल व शेजारील रांगेत उतरला. विठ्ठलाच्या कृपेमुळे या भागातील दर्शन रांग थोडी पुढे गेली होती आणि यामुळे या उड्डाण पुलावर भाविक नव्हते. मात्र जेव्हा या उड्डाणपुलाला कुत्रे चिटकले आणि काही क्षणातच ते तडफडू लागले. त्याच्या पाठोपाठ इतर दोन कुत्रेही अशाच पद्धतीने विजेचा झटका लागून तडफडल्यावर परिसरातील नागरिकांना हा धक्कादायक प्रकार समजला आणि त्यांनी तात्काळ विद्युत विभागातील कर्मचाऱ्यांना बोलावून घेतलं. या कर्मचाऱ्यांनी तात्काळ आधी हा विजेता प्रवाह खंडित केला आणि नंतर तुटलेल्या धोकादायक वायर बाजूला काढल्या. या निष्पाप श्वानांचा जीव गेल्याने हळहळ व्यक्त होत आहे.

# झाडांच्या भिशीमधून दोन हजार झाडांचे वृक्षारोपण

### लाखो झाडे लावण्याचा संकल्प

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर , दि. १३ जुलै -**

उत्तर सोलापूर तालुक्यातील कुमठे येथील पशुराम लांबतुरे यांनी झाडांचे महत्व जाणून झाडांची भिशी व्हॉट्स ग्रुप तयार केला. त्यातून प्रत्येक सदस्यांकडून प्रति महिना शंभर रुपये गोळा करुन एका वर्षात दोन हजार झाडांचे वृक्षारोपण केले . तसेच पुढील काळात ग्रुप मदतीने लाखो झाडे लावण्याचा संकल्प केला आहे.



त्यातून प्रत्येक सदस्यांकडून प्रति महिना शंभर रुपये गोळा करण्यास सुरुवात केली. प्रारंभी भिशी गोळा होताना अनेक अडचणी आल्या. मात्र लांबतुरे यांनी स्वतः एक हजार रुपये भिशी देण्याचे ठरविल्याने ग्रुप मधील सदस्यांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. ग्रुप मधील सर्व सदस्यांकडून प्रति महिना शंभर रुपये देण्यास सुरुवात झाल्याने मागील एका वर्षात दोन हजारांपेक्षा जास्त वृक्ष लागवड करण्यात आली आहे.

दरम्यान, भिशीचे सदस्य हळूहळू वाढत गेले असून, सध्या ४९१ व्हॉट्स ग्रुपचे सदस्य झाले आहेत. त्या सदस्यांकडून प्रति महिना ३० ते ४० हजार रुपयांची रक्कम गोळा होत आहे. त्या रक्कमेतून विविध ठिकाणी लहान मोठी रोपांची लागवड केली जात आहे.

> **येथे झाले वृक्षारोपण**
>
> दिंडोर, आचेगाव, कुंभारी उटगी, बोरामणी, मंद्रूप , मोहोळकर व चिरका तांडा, नळदुर्ग वाहतूक विभाग, मंगळवेढा येथील बाळूमामा मंदिर, पवार सर पोलीस अकॅडमी, जुळे सोलापूर ओम गर्जना चौक परिसर, द्वारकाधीश जवळील सोसायटी, रेणुकानगर, स्मृती उद्यानाजवळील रेल वनविहार, सिद्धेशवर वनविहार, कुमठे व परिसर, सिद्धेशवर कारखाना स्मशान भूमी , तळे हिपरगा, आयरवाडी जवळील इंग्लिश मिडीयम स्कुल येथे वृक्षारोपण करण्यात आले आहे.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## हिंजवडीतील स्वामी समर्थ मंदीरात गुरूपौर्णिमा साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.११ जुलै-**

पुणे येथील हिंजवडी परिसरात श्री स्वामी समर्थ मंदिरात गुरू पौर्णिमा ही मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या मंदिराची उभारणी अक्कलकोटचे माजी उपनगराध्यक्ष स्वामी भक्त राजु क्षिरसागर यांनी केलेली आहे. गुरू पौर्णिमेनिमित्त सकाळी दहा वाजता श्री स्वामी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन, स्तोत्र पठण



व आरती करण्यात आली. तसेच अखंड नामस्मरण करण्यात आले. तदनंतर श्रीपाद लिंबेकर यांच्या किर्तनाचा कार्यक्रम पार पडला. रात्री महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली. एक हजार स्वामी भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. या प्रसंगी संस्थेचे सचिव अशोक हराळे, विजय दर्शले, माजी नगरसेवक सुरेशशेठ भोईर, नवनाथ ढवळे, अप्पा ताजणे,विठ्ठल भुजबळ, गजानन गवळी, प्रमोद डोंगरे, सौ. निता क्षिरसागर, सौ. अर्चना हराळे आदी उपस्थित होते.

## महत्वाचे...



### वेळापूर येथे कृषीकन्यांनी शेतकऱ्यांना केले मार्गदर्शन

**वेळापूर, दि.१३ जुलै-**

वेळापूर (ता. माळशिरस) येथे शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज संचलित रत्नाई कृषी महाविद्यालय,अकलूज येथील कृषी कन्यांनी उसातील बीज प्रक्रियेचे प्रात्यक्षिक सादर केले. यामध्ये कृषी कन्यांनी बायो फर्टीलायझर्स ॲसिटोबॅक्टरचा उपयोग केला.बीज प्रक्रिया केल्यामुळे उसाच्या कांड्यां भोवती जैविक व रासायनिक बुरशीनाशकांचे सुरक्षित कवच तयार होते त्यामुळे जमिनीतून किंवा बियाणं मधून होणाऱ्या रोगांचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी मदत होते,त्याचबरोबर रोगांचा प्रादुर्भाव कमी झाल्यामुळे उत्पादनातही भर पडते याची माहिती कृषी कन्यांनी शेतकऱ्यांना दिली. अकलूज येथील शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्राम सिंह मोहिते- पाटील, रत्नाई कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य.आर.जी नलावडे,कार्यक्रम समन्वयक प्रा.एस.एम एकतपुरे, कार्यक्रम अधिकारी प्रा.एम.एम चंदनकर,कार्यक्रम अधिकारी एच. व्ही.कल्याणी त्याचबरोबर विषय मार्गदर्शक डॉ.डी.एस ठवरे यांच्या मार्गदर्शनाखाली कृषिकन्या आरती मंडले,मोहिनी कानडे,वैष्णवी हिवरकर, योगेश्वरी मदने,अनुपमा गोसावी, प्राजक्ता जाधव,राजनंदिनी डिकोळे, सिद्धी पाटील,अनघा फरांदे इत्यादी कृषीकन्यांनी शेतकऱ्यांना ऊसातील बीज प्रक्रिये बद्दल मार्गदर्शन केले. यावेळी प्रगतशील शेतकरी महादेव ताटे,र मेश बनकर, विठ्ठल म्हेत्रे, चंद्रकांत नवले, भीष्माचार्य कुदळे इत्यादी शेतकरी उपस्थित होते.



### माळशिरस तालुक्यात अनेक इच्छुकांचा होणार अपेक्षाभंग

**पिलीव, दि.१३ जुलै-**

माळशिरस तालुक्यात यावर्षीपासुन जिल्हा परिषद व पंचायत समिती गण रचनेमध्ये अमुलाग्र बदल होणार आहे. पूर्वी तालुक्यात ११ जिल्हा परीषद गट होते यंदापासून ते ९ झाले आहेत. तर २२ पंचायत समिती गणाऐवजी यंदापासून १८ पंचायत समिती गण असणार आहेत. त्यामुळे तालुक्यातील अनेक इच्छूक भावी जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांचा अपेक्षाभंग होणार आहे. महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत असताना त्यांनी त्यांना सोयीस्कर अशी गट व गण रचना केली होती.मात्र सध्या सत्तेत असणाऱ्या महायुती सरकारने पुन्हा नव्याने गट व गण रचना केली आहे. यामुळे सध्या तालुक्यात आगळीवेगळे कट्टर एकमेकांचे विरोधक असणारे मोहिते- पाटील गट व जानकर गट या निवडणुकीत एकत्र लढणार की स्वतंत्र लढणार अशी सध्या चर्चा सुरु आहे. सध्याच्या नवीन गट व गण रचनेत कोणती गावे कोणत्या गटात व गणात जाणार याचीही गावगाडयातील पुढाऱ्यांना उस्तुकता लागली आहे. या नवीन गट व गण रचनेमूळे अनेक मातबरांची मोठी कोंडी होणार आहे. यासाठी १४ जुलैची वाट पाहवी लागणार आहे. कारण १४ जुलै रोजी नवीन गट व गण रचना जाहीर होणार आहे. याकडे गावगाडयातील इच्छुक पुढारी अक्षरशः देव पाण्यात घालुन बसले आहेत. तर काहीजण नक्की गट रचना व गण रचना कसे होणार या चिंतेत आहेत.

### बार्शी शहरात अवैध व्यवसायांवर पोलिसांची कारवाई, तिघांना अटक

**बार्शी, दि.१३ जुलै-**

बार्शी शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध व्यवसायांवर पोलिसांनी धडक कारवाई केली. या कारवाईत कल्याण मटका जुगार खेळणाऱ्या एका व्यक्तीसह दारुची अवैध विक्री करणाऱ्या दोघांना अटक करण्यात आली. या कारवाईत जप्त करण्यात आलेल्या साहित्यामुळे शहरातील अवैध व्यवसायांना चाप बसण्याची शक्यता आहे. पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे, बार्शी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी प्रल्हाद आकुलवार यांच्या नेतृत्वाखालील पथकाने कुडुवाडी रोडवरील गवत गल्ली परिसरात छापा टाकला. या कारवाईत सतीश गोविंद सावळे (वय ५५, रा. सोलापूर रोड, सावळे चाळ, बार्शी) याला कल्याण म टका जुगार खेळताना रंगेहाथ पकडण्यात आले. त्याच दिवशी, दुसऱ्या कारवाईत बार्शी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी अविनाश पवार यांच्या नेतृत्वाखालील पथकाने सोलापूर रोडवरील पारधी कॅम्प परिसरात छापा टाकला. या कारवाईत पिंकीबाई काळे, वय ४५, आणि आप्पा काळे, वय ४०, दोघे रा. पारधी कॅम्प, सोलापूर रोड यांना अवैध दारू विक्री करताना पकडण्यात आले. याप्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. या दोन्ही प्रकरणांचा तपास बार्शी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. कारवाईत सहभागी असलेल्या पथकात पोलीस कर्मचारी उमाकांत कुंजीर, माने, घाडगे, जाधव आणि उदार यांचा समावेश होता. पुढील तपासात अवैध व्यवसायांचे आणखी धागेदोरे उघड होण्याची शक्यता आहे. पोलीस निरीक्षक कुकडे यांनी नागरिकांना अवैध व्यवसायांची माहिती तात्काळ पोलिसांना कळवण्याचे आवाहन केले आहे. अवैध जुगार आणि दारु विक्रीमुळे समाजात अनेक सामाजिक प्रश्न निर्माण होतात. अशा गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी आम्ही कठोर कारवाई करत आहोत, असे त्यांनी सांगितले.

## वारकरी सांप्रदाय प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना निधी देणार

**खा. धैर्यशील मोहिते-पाटील** | **मोडनिंब येथे ३०व्या वैष्णव मेळाव्याची सांगता**

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. १३ जुलै-**

वारकरी संप्रदाय सतत तेवत राहावा त्यासाठी नव्या पिढीला संधी मिळावी म्हणून प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना सांप्रदायिक शिक्षण घेण्यासाठी व निवासासाठी निधी देणार असल्याचे माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी सांगितले. मोडनिंब (ता.माढा) येथे आयोजित केलेल्या दीड दिवसीय वैष्णव मेळाव्याच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते.



यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष वसंत देशमुख, अर्थ बांधकाम खात्याचे माजी सभापती भारत शिंदे, माजी सरपंच बाबूराव सुर्वे, एकनाथ सुर्वे, ह.भ.प. चंद्रहार महाराज, डॉ. सागर गिड्डे, भिलाडे महाराज उपस्थित होते. याबरोबरच शेतकऱ्यांच्या शेतमालासाठी मोडनिंब रेल्वे स्टेशन परिसरात कार्गो सेंटर उभे करून या परिसरातील शेतकऱ्यांच्या फळ पिकांसह अन्य उत्पादित मालाला वाहतुकीची संधी उपलब्ध करून देणार असल्याची ग्वाही दिली.राष्ट्रवादी काँग्रेस वारकरी संप्रदाय माढा तालुका अध्यक्षपदी ह.भ.प. सारंग सुरवसे महाराज यांच्या निवडीचे पत्र जिल्हाध्यक्ष वसंत देशमुख यांनी धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या हस्ते दिले.

दिड दिवसीय वैष्णव मेळाव्याचे हे ३०वे वर्ष असून, दरवर्षीप्रमाणे यंदाही भक्तिभावपूर्ण वातावरणात विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रम संपन्न झाले. या मेळाव्याचे आयोजन संत श्रीपाद बाबा व संत रामदास बाबा यांच्या कृपाशीर्वादाने आणि गुरुवर्य ब्रह्ममूर्ती चंद्रहार महाराज जाधव यांच्या प्रेरणेतून करण्यात आले. माऊली मंदिरात हरिपाठ व ह.भ.प. बालाजी मेटे यांचे कीर्तन संपन्न झाले.मेळाव्याचे उद्घाटन जुन्नर येथील ह.भ.प. सचिन महाराज चकवे यांच्या कीर्तनाने करण्यात आले. राहुरी येथील ह.भ.प. गुरुवर्य विलास महाराज मदने यांचे कीर्तन झाले.मोडनिंब गावातून दिंडी प्रदक्षिणा काढण्यात आली. त्यानंतर ह.भ.प. साईकथाकार विकास महाराज गायकवाड यांचे काल्याचे कीर्तन झाले. साधक बंधू-भगिनींसाठी प्रवचन, हरिपाठ, भोजन व्यवस्था होती. या कार्यक्रमासाठी संत श्रीपाद बाबा साधक मंडळ मोडनिंब तसेच पंचक्रोशीतील साधक बंधू-भगिनींनी संयोजनात सक्रिय सहभाग घेतला. मेळाव्यापूर्वी सर्वसाधारकांनी टाळ-मृदंगाच्या गजरात मिरवणूक राधाकृष्ण गोपाळकृष्ण असा नामघोष करीत मोडनिंब गावातून फेरी काढली.

## अक्कलकोटमध्ये आजपासून ऊस बिलासाठी आंदोलन

- **शिवसेना ठाकरे गटाचा पुढाकार; हलगीनाद, भजन, ढोलवादन अन् करणार रेलरोको**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि. १३ जुलै**

जोपर्यंत थकीत बिल देणार नाहीत तोपर्यंत १४ जुलैपासून तहसील कार्यालय अक्कलकोट येथे तुफान कडाक्याचा हलगीनाद, संगीत भजन, पारिजात भजन, धनगरी ढोल वादन तसेच अक्कलकोट रेल्वे स्टेशन येथे भव्य रेल रोको आंदोलन करणार असल्याची माहिती शिवसेना ठाकरे गट तालुका प्रमुख आनंद बुक्कानुरे यांनी दिली.



अक्कलकोट विधानसभा क्षेत्रात जयहिंद शुगर २५ कोटी ६ लाख रुपये, सिद्धेश्वर कारखान्याने २३ कोटी ५९ लाख रुपये, गोकुळ शुगर धोत्री १७ कोटी २२ लाख रुपये, मातोश्री शुगर रुद्देवाडी ५ कोटी ३८ लाख रुपये असे एकूण ४८ कोटी ७५ लाख रुपये बिल' थकीत आहे. गेल्या गळीत हंगमापासून शेतकऱ्यांची ऊस बिल थकीत ठेवणाऱ्या कारखानादारांनी शेतकऱ्यांचे ऊस थकीत बिल त्वरित द्यावे अशी मागणी करण्यात आली आहे. जो पर्यंत थकीत बिल देणार नाहीत तोपर्यंत तहसील कार्यालय येथे शेतकऱ्यांचे सोमवारी १४ जुलै रोजी सकाळी ११ वा. अबकी बार आर या पार लढाई ऊस बिल मिळेपर्यंत दिवसभर तुफान कडाक्याचा हलगी नाद आंदोलन, मंगळवार १५ रोजी संगीत भजन, पारिजात भजन, धनगरी ढोल वादक आंदोलन करण्यात येणार आहे. बुधवार १६ रोजी अक्कलकोट स्टेशन येथे भव्य रेल रोको आंदोलन होणार आहे. शेतकरी बांधव, सर्व शिवसेना ठाकरे गटाचे पदाधिकारी यांनी मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी व्हावी असे आवाहन तालुकाप्रमुख बुक्कानुरे यांनी केले आहे.

तालुक्यात एखादा शेतकरी झाडे तोडल्यावर अनेक शेतकऱ्यांवर वन विभागाकडून गुन्हा दाखल केला जातो. कोर्टाकडून लवकर जामीनही मंजूर होत नाही. मात्र सोलर कंपनीकडून लाखो झाडे तोडून झाडाची अक्षरशः कत्तल केली असताना या सोलर कंपनी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला नाही. याबाबत अनेक शेतकरी, सामाजिक कार्यकर्तेकडून वन विभागाचे खलाने यांच्याकडे गेल्या वर्षापूर्वी तक्रारी केली असताना अद्याप सोलर कंपनी विरोध लाखो झाडे तोडल्या बद्दल गुन्हा दाखल केलेला नाही. सदर सोलर कंपनी विरोधात विना परवाना झाडे तोडल्या बद्दल गुन्हा दाखल होईपर्यंत आणि एक लाख झाड लावेपर्यंत आंदोलन छेडण्याचाही इशारा देण्यात आला आहे.

## बार्शीत 'गण गण गणात बोते' चा गजर

### परतीची वारी : श्रीसंत गजानन महाराजांच्या पालखीचे भव्य स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१३ जुलै-**

आषाढी वारी करुन पंढरपूरकडून शेगाव येथे प्रस्थान करणारी श्री संत गजानन महारांजांची पालखीचे बार्शीत आगमन झाल्यानंतर, शहरात धार्मिकतेचे व भक्तिभावाचे वातावरण निर्माण झाले. हजारो भाविकांनी गण गण गणात बोते 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या जयघोषात श्रींच्या पालखीचे दर्शन घेतले.

शहरात आगमानावेळी जैन मंदीर कुर्डुवाडी रोड येथे नगरपरिषदेचे मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण, उपविभागीय अधिकारी जालिंदर नालकुल, नायब तहसीलदार संजीवन मुंढे, नगर अभियंता विवेक देशमुख, प्रताप कोरके यांनी स्वागत केले. खांडवी मुक्काम करुन दि. १३ रोजी सकाळी बार्शी येथे येवून थोड्यावेळ कुर्डुवाडी रोडवरील राम मंदीर येथे दर्शनासाठी थांबून नंतर शहरातील प्रमुख रस्त्यांवरुन पालखी निघाली. यावेळी ठिकठिकाणी पालखीच्या स्वागतासाठी रस्त्यांवर, चौकांमध्ये तसेच इमारतींवरुन फुलांची उधळण करण्यात आली. पालखी मार्गावर विविध ठिकाणी मंडप उभारुन बार्शीकरांनी महाप्रसाद, पाणी, लिंबूपाणी, औषधीपेय व फराळाचे वाटप करत वारकऱ्यांचे स्वागत केले. अनेकांनी ढोल-ताशा पथक, लेझीम, भगवे झेंडे आणि रांगोळ्यांनी



स्वागत करत पारंपरिक पद्धतीने श्रद्धा व्यक्त केली. पालखी बार्शी शहरातून मार्गस्थ होत असताना पोलीस प्रशासनाने योग्य बंदोबस्त ठेवत वाहतूक व्यवस्थाही चोख ठेवली. अनेक ठिकाणी विद्यार्थी, महिला मंडळे आणि सामाजिक संस्था यांचाही उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. यानंतर पंचक्रोशीतील भाविकांच्या दर्शनासाठी श्रींच्या पालखी दर्शनसाठी नगरपालिकेनजीक शेडमध्ये ठेवण्यात आली होती. यावेळी मोठ्या संख्येने महिला, पुरुषन व आबालवृद्धांनी दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या. अनेकांनी मोबाईलमध्ये व्हिडिओ व फोटो काढून हा सोहळा आपल्या आठवणीत कायमस्वरुपी जपून ठेवला. हजारो भाविकांसह राजकीय पुढारी आमदार दिलीप सोपल, माजी आमदार राजेंद्र राऊत, विश्वास बारबोले, रमेश पाटील, भारत पवार, विलास रेणके आदींनी श्रींच्या पालखीचे दर्शन घेतले.

## अडचणीतील शेतकऱ्यांना एकरी ५० हजार द्या

### आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचे सोलर कंपनीस आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि १३ जुलै -**

निसर्गाच्या लहरीपणामुळे अक्कलकोट तालुक्यातील शेतकरी अडचणीत आले आहेत.परंतु सोलर कंपनीस शेती भाडेतत्त्वावर दिलेल्या अडचणीतील शेतकऱ्यांना एकरी वार्षिक भाडे ५० हजार देण्याची मागणी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केली आहे.

चपळगाव (ता.अक्कलकोट) येथील ८०० एकर शिवारात उभारलेल्या १५० मेगावॅट वीजनिर्मिती क्षमता असलेल्या ज्युनिपर सोलर प्लँटचे लोकार्पण आमदार कल्याणशेट्टी यांच्या हस्ते पार पडले. यावेळी त्यांनी ही मागणी केली.

यावेळी व्यासपीठावर कंपनीचे लँड मॅनेजर सर्वजीतसिंग, डेप्युटी मॅनेजर चेतन जाधव, प्रोजेक्ट हेड दिपक कटियाल, शैलेंद्र सिंग, विजय तिवारी, अक्कलकोट कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती



### आणखी १०० मेगावॉटचा प्रकल्प

दरम्यान चपळगाव भागात विविध संस्थांनी सोलर प्लँटचे जाळे निर्माण केले आहे.हजारो एकरची शेतजमीन स्थानिकांनी भाडेतत्त्वावर दिली आहे.ज्युनिपरची आणखी १०० मेगावॅट वीजनिर्मिती प्रकल्प हाती घेण्यात आल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली.

अप्पासाहेब पाटील, सरपंच वर्षा भंडारकवठे, हन्नुरचे उपसरपंच सागर कल्याणशेट्टी, सरपंच प्रदीप पाटील, माजी सरपंच उमेश पाटील, डॉ.काशिनाथ उटगे, सिध्दाराम भंडारकवठे, अभिजीत पाटील, सी.ए.ओंकारेश्वर उटगे, मल्लिनाथ सोनार, राजा कोळी यांच्यासह पंचक्रोशीतील ग्रामस्थ उपस्थित होते. पुढे बोलताना कल्याणशेट्टी म्हणाले की, सौर ऊर्जेमुळे देशाच्या पर्यावरणाला पुरक चालना मिळणार आहे. देशहित लक्षात घेऊन चपळगाव भागातील हजारो शेतकऱ्यांनी शेती भाडेतत्त्वावर दिलेल्या आहेत. यामुळे वाढीव भाडे तसेच भागातील जास्तीत जास्त स्थानिक तरुणांना या ठिकाणी रोजगार मिळावा,ही अपेक्षा आहे.

## अन्नछत्र न्यास हे आम्हा गोवेकरांचे श्रद्धेय स्थान

**खा. सदानंद तानावडे : अनन्छत्र मंडळातर्फे सत्कार**

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. १३ जुलै**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली अन्नछत्र हे एक धार्मिक पीठ असून, याठिकाणी आम्ही येण्याचा पुष्पामृत योग आहे. न्यास हे आम्हा गोवेकरांचे श्रद्धेय असल्याचे



मनोगत राज्यसभा खासदार सदानंद तानावडे (पणजी) यांनी व्यक्त केले. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे आले असता न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे व सचिव शामराव मोरे यांच्या उपस्थितीत विश्वस्त भाऊ कापसे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी न्यासाचे बाळासाहेब घाटगे, निखील पाटील, प्रवीण घाडगे, गोटू माने,, कुमार सलबत्ते, शहाजी यादव, नामा भोसले, पिंटू हळ्ळूरे, संभाजीराव पवार, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, लक्ष्मण बिराजदार, राजू पवार, रमेश हेगडे, शरद भोसले, अनिल बिराजदार, एस के स्वामी, महांतेश स्वामी, शिव स्वामी, श्रीकांत स्वामी, स्वामिनाथ बाबर, रोहन शिर्के, शावरेप्पा माणकोजी, विशाल घाडगे, तानाजी जाधव, रोहित कदम, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी आदी उपस्थित होते.

## समीर भुजबळ यांनी घेतले संत सावता महाराजांच्या संजीवन समाधीचे दर्शन

**माढा, दि.१३ जुलै-**

अखिल भारतीय समता परिषदेचे कार्याध्यक्ष तथा माजी खासदार समीर भुजबळ यांनी अरण येथील मंदीर परिसराची पाहणी केली. त्याचबरोबर मंदीराचा गाभारा, तटभिंत विहीर, मंदीरालगतचा परिसर याची पाहाणी करुन राज्य सरकार राबवत असलेल्या विकास आराखड्यातील विविध विकासकामे तातडीने करण्याच्या दृष्टीने लक्ष घालणार असल्याचे सांगितले. भुजबळ यांनी मंदीराची माहिती घेतली. याप्रसंगी संत सावता महाराजांचे वंशज सावता महाराज वसेकर, रविकांत वसेकर, संतोष महाराज वसेकर, नितीन महाराज वसेकर, दादा महाराज वसेकर, विठ्ठल महाराज वसेकर, समता परिषदेचे आबासाहेब खारे, माजी समाजकल्याण सभापती शिवाजीराजे कांबळे, नागेश राऊत, हरि गांवधरे,दिगंबर मामा माळी उपस्थित होते.

## माधवबागद्वारे डॉ.कोळी पती-पत्नींचे काम कौतुकास्पद : डॉ.यादव

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.१३ जुलै-**

गेली १३ वर्षे माधवबागच्या माध्यमातून डॉ. पवन व क्रांती कोळी या पती-पत्नींनी केलेली वाटचाल कौतुकास्पद असून हृदयरोग निवारणमध्ये आयुर्वेदिक उपचारांची मोठी गरज आहे, असे प्रतिपादन श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष व ज्येष्ठ शल्यकर्मी डॉ. बी. वाय. यादव यांनी केले.

येथील डॉ. कोळी यांच्या माधवबाग शाखेच्या नूतन वास्तूमध्ये स्थलांतर सोहळ्यात उद्घाटनपर भाषणात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माधवबागचे झोनल हेड डॉ. सचिन पाटील, माजी नगराध्यक्ष विश्वासभाऊ बारबोले, रमेश पाटील, बार्शी निमाचे अध्यक्ष प्रदीप जाधव, होमिओपॅथी संघटनेचे अध्यक्ष डॉ. राहुल ताटे आदी मान्यवर उपस्थित होते .यावेळी डॉ. यादव





यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन झाल्यानंतर प्रास्ताविकामध्ये माधवबागच्या बार्शी संचालक डॉ. क्रांती कोळी यांनी आपण महानगरांमध्ये काम केले. वैद्यकीय क्षेत्रामध्ये आयुर्वेदाचे महत्त्व प्राचीन काळापासून आहे. या ज्ञानाचा उपयोग ग्रामीण भागामध्ये सर्वसामान्य लोकांसाठी झाला पाहिजे यासाठी आपण बार्शी शहरांमध्ये माधवबागच्या माध्यमातून हृदयरोग निवारण उपचारास सुरुवात केली असे त्यांनी सांगितले. या उपचारांना बार्शी तालुका व परिसरातील हजारो रुग्णांनी अतिशय चांगला प्रतिसाद दिल्यामुळे आता बार्शी शहरांमध्ये सर्व सोयीसुविधायुक्त अशा वास्तूमध्ये माधवबागचे काम स्वतंत्रपणे सुरु करत असल्याचे सांगितले. यावेळी उद्घाटनपर भाषणांमध्ये माजी नगराध्यक्ष विश्वास भाऊ बारबोले यांनी आयुर्वेदिक उपचारांमुळे कायमस्वरुपी रोगांचे निराकरण होते. त्यामुळे आयुर्वेदाचा प्रसार होण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. यावेळी माजी नगराध्यक्ष रमेश पाटील यांनी आपल्या भाषणांमध्ये डॉ. कोळी पती-पत्नी यांनी समाजामध्ये आयुर्वेदिक उपचारांची चांगली विश्वासार्हता निर्माण केली असल्याचे सांगितले.

डॉ. सचिन पाटील यांनी अनेक वेळा हृदयरोग निवारणाच्या बाबतीमध्ये आयुर्वेदिक उपचारांची नितांत गरज असते. माधवबागच्या माध्यमातून अनेक असाध्य रोग पूर्णपणे बरे झाले असल्याची तसेच शस्त्रक्रीया टाळल्या गेल्या असल्याची उदाहरणे दिली. डॉ. पवन कोळी यांनी माधवबाग शाखेला बार्शीमध्ये तसेच धाराशिव जिल्ह्यामध्ये अतिशय चांगला प्रतिसाद मिळाल्याचे सांगितले. यावेळी हेमंत शिंदे, माधुरी शिंदे तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.